


ना.धों. महानोर



डॉ. शशिकांत अहंकारी

# शब्द रुची

४८

सप्टेंबर २०२३ । मूल्य १० रु.। पृष्ठे ५२

## चंद्रावरचा दक्षिणदिग्विजय!



**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# शब्द रुची ४८

**सप्टेंबर २०२३, वर्ष दहावे**
**अंक पाचवा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**

कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**

मुखपृष्ठ : **सतीश भावसार**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
shabdruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे**
**वेबसाइट डिझाइन व डिजिटल एडिटिंग**
**सचिन पिळणकर, समीर कदम**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ४०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

BHIM UPI
SCAN & PAY
1000210529000008.9821032830@idbi

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माहीम (प.), मुंबई ४०००१६
फोन : २४२१६०५० **(वेळ : दुपारी १ ते ६.३०)**

**अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवर पाठवावी.**
**shabdruchee@gmail.com**

**ऑफिस वेळ : दुपारी १ ते सायं. ७**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

## अनुक्रम

**प्रदीप नायक** / ५
भारताचा चांद्रविजय

**रामदास भटकळ** / ७
नामदेवराव

**अतुल देऊळगावकर** /१०
गावातील आरोग्याच्या पायवाटेचे 'डॉक्टर'

**प्रवीण बर्दापूरकर** / १४
अरुवार कवी आणि माणूसही...

**प्रा. डॉ. अजय देशपांडे** / १७
सकारात्मक ऊर्जेचा निखळ झरा

**संजीवनी खेर** / २०
भावनिक गुंतागुंत कुशलतेने उलगडणारी लेखिका

**शरद काळे** / २४
दुर्मिळ मूलद्रव्यांचे प्रश्न

**राजीव श्रीखंडे** / ३०
ड्रॅक्युला - ब्रॅम स्टोकर

**किरण येले** / ३४
रिद्धी म्हात्रे

**वृत्तांत** / ३७

**सुधा हुजूरबाजार-तुंबे** / ४४
सरकारमावशी...

ग्रंथपरिचय - **डॉ. निर्मोही फडके** / ४६

ग्रंथपाने - **चांगदेव काळे** / ४७

# संपादकीय...

ज्याबद्दल उत्सुकता शिगेला पोहोचली होती ते चांद्रयान-३, २३ ऑगस्ट २०२३ रोजी सायंकाळी ६ वाजून ४ मिनिटांनी चंद्रावर उतरलं. हे अभूतपूर्व यश भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं मिळवलं. भारतीयांच्या मनावर अभिमानाचे क्षण कायमचे कोरले गेले. चंद्राच्या दक्षिणध्रुवावर पहिल्यांदा न पुसल्या जाणाऱ्या खुणा उमटल्या त्या भारताच्या चांद्रयान-३च्या. आपल्या शास्त्रज्ञांच्या, तंत्रज्ञांच्या आणि सहकाऱ्यांच्या ध्यासातून चंद्रावरचा हा दक्षिणदिग्विजय साकारला. त्याची वाटचाल नेमलेल्या उद्दिष्टांप्रमाणे होत आहे. या यशापाठोपाठ २ सप्टेंबर २०२३ रोजी ठरल्यानुसार सकाळी बरोबर ११ वाजून ५० मिनिटांनी श्रीहरीकोटा इथल्या अवकाशयान प्रक्षेपण केंद्रातून आदित्य एल-वन हे यान सूर्याभ्यासासाठी प्रस्थान करतं झालं. पृथ्वीपासून पंधरा लाख किलोमीटर अंतरावरील कक्षेतून ते सूर्याबद्दल निर्धारित माहिती मिळवेल. असा हा आचंद्रसूर्य अवकाशगाथेचा पहिला अध्याय लिहिला गेला आहे. यासाठी इस्रोच्या सर्व सहभागींचं अभिनंदन आणि त्यांनी योजलेल्या साध्यासाठी शुभेच्छा.

चांद्रयान-३ मोहिमेला खर्च आला तो केवळ ६१५ कोटी रुपये! वांद्रे इथून वरळीला जोडणाऱ्या सागरी सेतूचा खर्च किती झाला हे आपण जाणतो. अशा अन्यत्रही होणाऱ्या वारेमाप खर्चापुढे इस्रोनं अत्यल्प खर्चात बजावलेल्या कामगिरीचं कौतुकच करायला हवं. त्यांचं अवकाशाला गवसणी घालणारं यश नेत्रदीपक आहे. त्यांच्या अथक संशोधन आणि परिश्रमांमुळे काळाच्या पटलावर भारतीय बुद्धिमत्तेची मुद्रा उमटली आहे.

हे घडवणारे चेहरे पाहिले तेव्हा त्यांची साधी राहणी, सौम्य भाषा आणि यश सहजतेनं घेण्याची वृत्ती, साऱ्याचं मन जिंकून गेली. यातला स्त्रियांचा सहभाग उल्लेखनीय आहे. 'द वॉशिंग्टन पोस्ट'मध्ये सँडर्स असं लिहितो, 'या मोहिमेतील स्त्री-इंजिनीयरची संख्या लक्षवेधी आणि प्रेरणादायी होती. कपाळावर कुंकू आणि केसांत फुलं माळलेल्या, स्पेलिंगच्या चुका न करता ब्रिटिश इंग्रजी बोलणाऱ्या या महिला समालोचनही करत होत्या आणि स्टेटस रिपोर्टही सांगत होत्या.' या शब्दांनीच अर्धं आकाश; नव्हे अवकाशही व्यापणाऱ्या या शक्तीचा झालेला गौरव उचितच आहे.

आजवर अनेक उपग्रह प्रक्षेपित करून आपण विविध क्षेत्रांतील माहितीसाठी त्यांचा उपयोग करतच आहोत. अनेक देशांच्या उपग्रहांचं प्रक्षेपण करून परकीय चलन मिळवत आहोत. त्यामुळे प्रगत अमेरिका, रशिया अथवा अन्य युरोपीय देश याकडे कसेही बघोत, अनंत अमुची ध्येयासक्ती... वैश्विक राहणार, हे आपण जगाला दाखवून दिलं आहे. या चांद्रविजयाबाबत प्रदीप नायक यांचा लेख अंकात आहे.

संकल्पनाकोशाचे पाच खंड, कालिदासकोशाचे चार खंड आणि आगामी दागिने कोश याद्वारा सुरेश वाघे यांनी कोशवाङ्मयात मोलाची भर घातली. त्यांच्या अनेक वर्षांच्या संशोधनाचा 'एबीपी माझा' वाहिनीनं 'माझा सन्मान' देऊन गौरव केला. त्यांचं अभिनंदन.

आपल्या कर्तृत्वाची अमीट छाप सोडून आपलं जीवन समृद्ध करणारे ना.धों. महानोर,
डॉ. शशिकांत अहंकारी, प्रा. मदन धनकर,
लेखिका अंबिका सरकार याच काळात काळाच्या पडद्याआड गेले. त्यांच्या आठवणी रामदास भटकळ, अतुल देऊळगावकर, प्रवीण बर्दापूरकर, प्रा. डॉ. अजय देशपांडे आणि सुधा हुजूरबाजार-तुंबे यांनी लिहिल्या आहेत. लेखक, अभ्यासक हरी नरके आणि
अभिनेत्री सीमा देव यांचं निधन मन विषण्ण करणारं आहे.

डॉ. शरद काळे यांच्या संपादनात जून महिन्यातील पर्यावरणदिनापासून ग्रंथाली प्रसिद्ध करत असलेल्या 'विज्ञानधारा' या मासिक पुस्तिकेचं चांगलं स्वागत होत आहे. तिचा दिवाळी अंक ऑक्टोबर-नोव्हेंबर असा जोड अंक असेल.

या अंकात नियमित सदरं आहेतच.

**- अरुण जोशी**



**प्रदीप नायक**

# भारताचा चांद्रविजय

**आधुनिक** काळात मानवाला चंद्रावर स्वारी करण्याची स्वप्ने पडू लागली. दुर्बिणीचा शोध लागल्यानंतर चंद्रावर असलेली विवरे, डोंगर, दऱ्या पाहून कविमनाचा विरस झाला असला तरी वैज्ञानिक विचार करणाऱ्या माणसांना चंद्राच्या पृष्ठभागाचे कुतूहल वाटू लागले. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ज्यूल्स व्हर्न या फ्रेंच लेखकाने १८६५ मध्ये 'फ्रॉम अर्थ टू द मून' हे चांद्रप्रवासाचे वर्णन करणारे पुस्तक लिहिले. प्रचंड आकाराच्या एका तोफेच्या साहाय्याने तीन प्रवासी असलेली एक कुपी (कॅप्सूल) चार दिवसांच्या प्रवासानंतर चंद्रावर पोहोचली. ज्या काळात कोणी अग्निबाणांचा विचारही केला नव्हता, त्या काळात ज्यूल्स व्हर्नने लिहिलेली ही विज्ञान कादंबरी संपूर्णपणे विज्ञानावर आधारित आहे.

जसजशी वैज्ञानिक प्रगती होत होती तसतसे खरोखरच्या चांद्रप्रवासाची स्वप्ने माणसाला पडू लागली. दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान जर्मनीने व्ही-टू अग्निबाण तयार केल्यानंतर हे स्वप्न प्रत्यक्षात उतरणे शक्य झाले. रशियाने १९५७ मध्ये 'स्पुटनिक' हा पृथ्वीभोवती फिरणारा उपग्रह अग्निबाणाच्या साहाय्याने अवकाशात सोडला, तेव्हा जगभर एकच खळबळ उडाली. त्यानंतर केवळ दोन वर्षांतच १९५९ मध्ये लूना-२ हे रशियाचे यान चंद्रावर यशस्वीपणे आदळवण्यात आले. १९६६ मध्ये लूना-९ हे यान अलगदपणे चंद्राच्या पृष्ठभागावर उतरवण्यात रशियन शास्त्रज्ञांना यश मिळाले. त्याच वर्षी रशियाचे लूना-१० हे यान चंद्राभोवती कक्षेत फिरणारे पहिले यान ठरले. १९६८ मध्ये झोंड-५ या यानातून दोन कासवे चंद्राभोवतीच्या कक्षेत भ्रमंती करून पृथ्वीवर सुखरूप परत आणण्यात रशियाला यश मिळाले.

रशिया चांद्रविक्रमाची एकापाठोपाठ एक शिखरे पादाक्रांत करत असताना अमेरिका काही स्वस्थ बसली नव्हती. १९५८मध्ये रशियाच्या स्पुटनिकपाठोपाठ अमेरिकेने 'एक्स्प्लोरर' हे यान यशस्वीपणे अवकाशात पाठवले. नंतर चंद्रावरही अनेक याने पाठवण्याचा अमेरिकेने प्रयत्न केला. त्यातली बरीचशी उड्डाणे अयशस्वी झाल्यानंतर १९६४ मध्ये 'रेंजर-७' हे अमेरिकेचे यान चंद्राच्या पृष्ठभागावर यशस्वीपणे आदळवण्यात आले. अवकाशात गेलेला पहिला मानव, पहिली स्त्री, पहिला प्राणी, चंद्रावरील उड्डाणे या सर्व बाबतींत एक पाऊल पुढे असलेल्या रशियावर मात करण्याच्या ईर्ष्येने अमेरिकेने पहिला मानव चंद्राच्या पृष्ठभागावर उतरवण्यासाठी जोरदार तयारी सुरू केली. 'अपोलो' मोहिमेअंतर्गत १९६८ मध्ये अपोलो-८ या यानातून तीन अंतराळवीर चंद्राभोवती दहा प्रदक्षिणा घालून पृथ्वीवर सुखरूप पोहोचले. १६ जुलै १९६९ या ऐतिहासिक दिवशी अपोलो-११ या यानातून नील आर्मस्ट्राँग आणि एडविन आल्ड्रिन या अंतराळवीरांनी चंद्राच्या पृष्ठभागावर पहिले पाऊल टाकले.

रशिया आणि अमेरिका या देशांव्यतिरिक्त जपान, चीन, युरोपीयन युनियन आणि भारत यांसह एकूण अकरा देशांनी यशस्वीपणे चांद्रमोहिमा राबवल्या. यापैकी मानवी मोहीम राबवणारा अमेरिका हा एकमेव देश आहे. चांद्रपृष्ठभागावर अलगदपणे यान उतरवणारे केवळ चार देश आहेत. रशिया, अमेरिका, चीन या देशांनंतर चांद्रयान-३च्या यशामुळे भारत हा चौथा देश ठरला आहे.

भारताच्या इस्रो या अवकाशसंस्थेने अद्याप अनेक अवकाश-उपग्रह पृथ्वीभोवती यशस्वीपणे पाठवले. भारतात झालेली दूरसंचार आणि दळणवळण क्षेत्रातील क्रांती केवळ उपग्रहांमुळेच शक्य झाली. पृथ्वीच्या वातावरणाचा, जमिनीतील खनिजांचा, पृथ्वीच्या पृष्ठभागाचा अभ्यास करणारे अद्याप जवळजवळ १५० उपग्रह आपल्या अवकाशसंस्थेने पाठवले आहेत. या उपग्रहांना अवकाशात पाठवण्यासाठी पी.एस.एल.व्ही., जी.एस.एल.व्ही. आणि एल.व्ही.एम. या अग्निबाणांचा वापर केला जातो.

अवकाश विज्ञानात आपले पाय घट्ट रोवून इस्रोने आपले

लक्ष पृथ्वीबाहेरच्या अवकाशात रोखले. आपले पहिले लक्ष्य अर्थातच चंद्र ठरले. पृथ्वीपासून केवळ तीन लाख ८४ हजार किलोमीटर अंतरावर असलेल्या चंद्राचा वेध घेणे तुलनेने सोपे होते. २००० मध्ये चांद्रमोहिमेच्या आखणीला सुरुवात झाल्यानंतर केवळ आठ वर्षांत, ऑक्टोबर २००८ मध्ये चांद्रयान-१ हे अवकाशयान चंद्राजवळ पाठवण्यात आपण यशस्वी झालो. आपल्याला पहिल्याच चांद्रमोहिमेत १०० टक्के यश मिळाले. पीएसएलव्ही अग्निबाणाच्या साहाय्याने, तुलनेने अत्यंत कमी खर्चात, म्हणजे ३९० कोटी रुपयांत चांद्रयान-१ हे चंद्राभोवतीच्या कक्षेत पाठवण्यात आले. चंद्राच्या ध्रुवीय कक्षेत फिरणाऱ्या चांद्रयानाने दक्षिण ध्रुवावर पृष्ठभागावरील मातीच्या थराखाली बर्फयुक्त पाणी असण्याच्या शक्यतेचा शोध लावला. या अत्यंत महत्त्वपूर्ण शोधामुळे चांद्रयान-१ या मोहिमेला खूप महत्त्व प्राप्त झाले आणि जगभर इस्रोचे कौतुक झाले. चांद्रयान-१ मोहिमेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या यानातून आपण एक छोटासा 'आघातक' (इम्पॅक्टर) चंद्राच्या पृष्ठभागावर आदळवला. चंद्राच्या पृष्ठभागावर एखादी मानवी वस्तु पाठवणारा भारत हा चौथा देश ठरला. जवळजवळ वर्षभरानंतर चांद्रयान-१ निकामी झाले.


यानंतर अकरा वर्षे उलटल्यानंतर जुलै २०१९ मध्ये चांद्रयान-२ यशस्वीपणे चंद्राच्या दिशेने पाठवण्यात आले. चांद्रयान-१ या मोहिमेत आपण चंद्राच्या पृष्ठभागाला स्पर्श केला. चांद्रयान-२ या मोहिमेत आपण याचा पुढचा टप्पा गाठण्याचे ठरवले. पृष्ठभागावर अलगदपणे यान उतरवणे ही अत्यंत कठीण आणि महत्त्वाकांक्षी योजना इस्रोने आखली. चांद्रयान-२ सोबत पाठवण्यात आलेला विक्रम लँडर चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरवण्याचे निश्चित झाले. ६ सप्टेंबर २०१९ या दिवशी संपूर्ण भारत श्वास रोखून विक्रम लँडरचे अवतरण पाहत असताना अचानक या लँडरचा पृथ्वीशी संपर्क तुटला. इस्रोच्या केंद्रात आणि भारतभर एकच सन्नाटा पसरला. विक्रम पृष्ठभागापासून दोन किलोमीटर अंतरावर असताना विक्रममधील संगणक प्रणालीमध्ये असलेल्या त्रुटीमुळे विक्रमचे लँडरवरील नियंत्रण सुटू लागले. विक्रम पाचशे मीटर उंचीवर आल्यावर त्याचा पृथ्वीशी संपर्क तुटला. विक्रम लँडर सरळ खालच्या दिशेने येण्याऐवजी त्याने कोलांटी उडी मारली. वेग कमी होण्यासाठी वापरलेले थ्रस्टर लँडरचा वेग वाढवण्यास कारणीभूत ठरले आणि विक्रम लँडर प्रचंड वेगाने पृष्ठभागावर आदळून लँडरचा चक्काचूर झाला. या अपयशानंतर इस्रोने या घटनेची सखोल चौकशी करून पुढच्या मोहिमेत अशी चूक होणार नाही याची काळजी घेतली.

चांद्रयान-२ च्या आंशिक यशानंतर केवळ चार वर्षांत चांद्रयान-३ चे उड्डाण झाले. १४ जुलै २०२३ रोजी नव्या विक्रम लँडर आणि प्रज्ञान बग्गी (रोव्हर) यासह चांद्रयान-३ ने एल.व्ही.एम.-३ या अग्निबाणाच्या सहाय्याने अवकाशात झेप घेतली. तब्बल ३० दिवसांच्या प्रवासानंतर चांद्रयान-३ चंद्राजवळ पोहोचले. १४ ऑगस्टला यान पृष्ठभागापासून शंभर किलोमीटर उंचीवरच्या कक्षेत स्थिरावले. चंद्राभोवती १७ ऑगस्टला चांद्रयान-३ च्या 'प्रॉपेलर सिस्टीम'पासून लँडर विलग झाले. हळूहळू लँडरचा वेग कमी करत कक्षा ३० किलोमीटर पर्यंत आणण्यात आली. अखेरीस २३ तारखेला सायंकाळी ५ वाजून ४८ मिनिटांनी विक्रम लँडरचा वेग विरुद्ध दिशेने चार बूस्टर सुरू करून हळूहळू कमी करायला सुरुवात झाली. लँडर सात किलोमीटरवर असताना केवळ दोन बूस्टर सुरू ठेवण्यात आले. लँडरचा वेग ताशी ६००० किलोमीटरवरून (विमानाच्या वेगाच्या १० पट) ताशी केवळ दहा किलोमीटरवर आणण्यात आला. लँडर ६०० मीटर उंचीवर असताना आतापर्यंत आडवा असलेला लँडर उभा झाला आणि सरळ दिशेने खाली येऊ लागला. ही शेवटची दोन मिनिटे खऱ्या अर्थाने चित्तथरारक होती. सर्व जण जीव मुठीत घेऊन 'टच डाऊन'ची प्रतीक्षा करत होते. जसजसा विक्रम लँडर खाली येत होता, तसतसा त्याचा वेग झपाट्याने कमी होत शून्यावर आला आणि विक्रम लँडर अखेरीस सुस्थितीत चंद्रावर स्थिरावले. सर्वत्र टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. सर्व जण हर्षोल्हासाने भारून गेले.

चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ पोहोचलेला भारत हा पहिलाच देश ठरला. विक्रम लँडर उतरत असताना उडालेले धुळीचे लोट पुन्हा जमिनीवर पूर्णपणे स्थिरावल्यानंतर २४ ऑगस्टला पहाटे लँडरमधून प्रज्ञान बग्गीसाठी तयार केलेली उतरंड उघडली गेली आणि हळूहळू प्रज्ञान बग्गी बाहेर आली. एक सेंटिमीटर प्रति सेकंद या वेगाने या चांद्रबग्गीने आता आपला प्रवास सुरू केला आहे. चंद्राच्या पृष्ठभागावर बर्फाच्या स्वरूपात पाणी असल्याचा प्रत्यक्ष पुरावा शोधणे, चांद्रकंपाचे (भूकंपासारखे मून-क्वेक) मापन, खनिजांचे मापन यासारखे संशोधन पुढील १४ दिवस केले जाईल. १४ दिवसांचाच कार्यकाल असलेला विक्रम लँडर आणि प्रज्ञान बग्गी या कालावधीत जास्तीत जास्त माहिती गोळा करून चांद्रयान-२ या उपग्रहाद्वारे ही माहिती पृथ्वीवर प्रक्षेपित करतील. १४ दिवसांनंतर या प्रदेशावरील सूर्य मावळून चंद्र-रात्रीला सुरुवात होईल आणि तापमान उणे २०४ पर्यंत जाईल. या तापमानाला विक्रम आणि प्रज्ञानवरील सर्व उपकरणे बंद पडतील. अशा तऱ्हेने विक्रम आणि प्रज्ञान यांचा कार्यकाळ समाप्त होईल. इस्रोच्या या अभूतपूर्व यशानंतर आता सर्वांचे डोळे 'गगनयान' या मोहिमेकडे लागले आहेत. या मोहिमेद्वारे भारतीय अंतराळवीर अवकाशात नेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. इस्रोची ही मोहीम ही यशस्वी होईल यात शंका नाही. इस्रोच्या सर्व शास्त्रज्ञांना आणि तंत्रज्ञांना सर्व भावी मोहिमांसाठी शुभेच्छा!

**– प्रदीप नायक**

pradeepsnayakgmail.com



रामदास भटकळ

# नामदेवराव

**मराठी** कवींमध्ये केशवसुत, गोविंदाग्रज, माधव ज्यूलियन ते कसुमाग्रज, विंदा, ग्रेसपर्यंत टोपणनावाने लिहिण्याची परंपरा आहे. ना.धों. महारनोर यांनी कविता लिहिली याच अनाकर्षक नावाने, फक्त त्यांची कविता छापत असता- १९६२च्या सुमारास - मित्रवर्य चंद्रकांत पाटील यांनी किंचित बदल करून त्यांना महानोर केले आणि तेच नाव त्यांना चिकटले.

ते मातीत हात घालून काम करणारे शेतकरी होते. त्यांचा पोषाखही नेहमीचा सदरा-पायजमा असाच साधा राहिला. ते कॉलेजमध्ये जेमतेम गेले असतील. परंतु शेतकीचे आकर्षण त्यांना परत शेतावर घेऊन गेले. त्यांची भाषा ही रोजच्या बोलीतून आणि शेतीच्या अनुभवातून घडत गेली. ते निर्व्यसनी होते. त्यांच्यावर भाविक माळकरी कुटुंबाचे संस्कार होते. ते शाकाहारी होते. कोणत्याही बाबतींत मी त्यांना हपापलेले पाहिले नाही. ते दिसायचे एखाद्या मराठी नटासारखे देखणे; त्यांच्यावर अनेकांनी प्रेम केले असणार, काव्यरसिकांनी आणि ललनांनीही. परंतु त्यांच्याविषयी कोणताही प्रवाद मी ऐकला नाही. प्रत्येक बाबतीत साधेपणा हीच महानोरांची ओळख होती. त्यांना मिळालेले यश आणि अपयश भाबडेपणातूनच उत्पन्न होत असे.

त्यांनी आपला खेडूत भाव जरी अभिमानाने बाळगला तरी महानोरांची प्रतिमा आणि त्यांचे काव्यप्रेम मात्र विलक्षण होते. महानोर शेतावर राखण करतानादेखील विंदाच्या 'त्रिवेणी' सारख्या कविता वाचून पाखरांसारखे मनविभोर होत असत. ते कवितेवर वेड्यासारखे प्रेम करायचे आणि आपले काव्यप्रेम इतरांमध्येही रुजवावे म्हणून धडपडत असत. महानोरांचा विशेष असा की त्यांनी सर्व पिढ्यांतील आणि सर्व प्रकारच्या कवितेला दाद दिली. कविता भावली की ती कोणीही लिहिली असो, शक्य असल्यास कवीच्या शोधात ते महाराष्ट्राच्या कानाकोपर्यात कुठे कुठे फिरले असतील!

कवी केशवसुतांना सगळेच सलाम करतात. परंतु त्यांचे समकालीन कवी एकनाथ रेंदाळकर, भालचंद्र लोवलेकर इत्यादी कवींच्या रचनाही त्यांना महत्त्वाच्या वाटत असत. विद्यापीठीय पद्धतीने त्यांनी संत, पंत किंवा तंत साहित्याचा मुद्दाम अभ्यास केला नसेलही, पण त्यांच्या आजूबाजूच्या वातावरणाचा परिणाम म्हणून त्यांचा ह्या सर्वांशी घरोबा होता. वारकर्यांची भजने, जात्यावरच्या ओव्या किंवा 'वही' म्हणून लोकप्रिय अशा खानदेशातील लोकगीताचेही त्यांना आकर्षण होते.

या सर्वांगीण काव्यप्रेमामुळे त्यांच्या काव्यावर कोणा एकाच कवीचे संस्कार प्रकर्षाने दिसत नाहीत. त्यांची सुरुवातीची कविता त्यांच्या शेतीव्यवसायाच्या प्रेमातून निर्माण झाली. महानोर हे निसर्ग कवी मानले जातात. परंतु निसर्गापेक्षाही शेतीसाठी त्यांच्या कवितेचा अधिक संबंध होता. शेतीची मला काहीच कल्पना नाही. त्यांची अजिंठ्याच्या पायथ्याशी असलेली जमीन बरड होती. महानोरांनी आपल्या मेहनतीने आणि शेतीच्या क्षेत्रातील नवनवीन प्रयोगांच्या साहाय्याने त्या भूमीला आपली सखी केले. केवळ शेतमजुराच्या घरचा जन्म म्हणून ते शेतीकडे वळले नाहीत तर त्यांच्या शेताने म्हणजेच रानाने त्यांना लळा लावला आणि ह्या रानाच्या सुखदु:खाने ते भारावून गेले.

ठिबकसिंचन, जलसंधारण यांसारखे शब्द आम्हा शहरवासियांना फक्त ऐकूनच माहीत होते. त्यांनी हे प्रयोग प्रत्यक्षात कसे वापरले ते मी पाहू शकलो. शेती म्हणजे फक्त पेरणी करून पावसावर विसंबून पुढे पीक घेणे नव्हे. तर त्यासाठी खूप काही योजनाबद्ध करता येते हे त्यांच्या कामावरून लक्षात येते. पाण्याची व्यवस्था चोख व्हावी म्हणून एक विहीर पाण्याने भरली असतानाही दुसरी खणून तयार करणे, पक्ष्यांनी सारे शेत फस्त करू नये म्हणून कुंपणावर त्यांना रुचेल असे बीज पेरणे, फळांचे उत्पादन कसे वाढवता येईल यावर शास्त्रीय प्रयोग करणे या सगळ्यामुळे या कविवर्यांना कृषिमहर्षी हा किताबही मिळाला.

आपल्या रानाला अनुकूल करून घेणे आणि फळबागा



**ना.धों. महानोर आणि रामदास भटकळ**

यशस्वीरीत्या उभ्या करणे यांमुळे अपयशाची पडछाया त्यांच्या काव्यावर बराच काळ पडली नाही. त्यांचे रान हे जसे त्यांच्या कवितेचा एक सुपीक स्रोत तसाच त्यांचा जनसंपर्क. त्यांच्या मित्रपरिवारात जसे काव्यप्रेमी होते तसेच शेतीविषयी प्रगत विचार करणारे होते. काही दूरवर पसरलेले होते, तसेच त्यांच्या परिसरातील सामान्य शेतकरीही होते.

एकदा मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी अचानक झालेल्या भेटीत महानोरांची कविता मुखोद्गत म्हणून दाखवली. त्यामुळे निर्माण झालेल्या परस्परजिव्हाळयातून महानोरांच्या गावाला काही विजेसारख्या सोयी मिळाल्या. त्यांचा फायदा त्या संपूर्ण गावाला मिळाला. साहजिकच त्या समाजाचे आणि परिसराचे नेतृत्व महानोरांकडे आले.

सामान्यांचे लोकजीवन आणि लोककला ह्याही महानोरांच्या काव्यलेखनाला पूरक ठरल्या. त्यांचा पहिला कवितासंग्रह 'रानातल्या कविता', तर दुसरा 'वही'. वही म्हणजे आपण समजतो तसे एकत्र बांधलेले कागद नव्हे. तर विशिष्ट प्रकारची लावणी किंवा लोकगीत. त्याची लय, ती म्हणण्याची पद्धत या सर्वांचा महानोरांच्या शब्दकळेवर प्रभाव होता. या गीतप्रकाराला योग्य उठाव मिळावा म्हणून त्यांनी ही 'वही' मुंबईला येऊन हृदयनाथ मंगेशकर या संगीतकाराला गाऊन दाखवली. त्यातून पुढे महानोर हे एक यशस्वी गीतकार झाले. 'जैत रे जैत' या संगीतमय सिनेमाचे झपाटणारे संगीतदिग्दर्शन हृदयनाथ मंगेशकरांचे असले तरी त्या गाण्यांचा उगम ह्या वहीगायनातच आहे. या प्रवासाचा आलेख त्यांच्या 'कवितेतून गाण्याकडे' या कथनात आहे.

आपल्या परिसराचे, लोकजीवनाचे आणि लोकसंगीताचे ऋण मान्य करण्यासाठी महानोरांनी अनेक गोष्टी केल्या. जवळजवळ प्रत्येक खेड्यात कार्यक्रम केले; फक्त आपल्या कवितेचे नव्हे. त्यांच्याकडे आलेल्या कलावंतांनाही तिथे ते आग्रहाने नेत असत. काही गातून छोटीमोठी सभागृहे बांधायला प्रेरणा आणि अर्थसाहाय्य त्यांनी उपलब्ध करवून दिले. या परिसरातील लोकगीते स्वत:च्या प्रतिभेने उजळून 'पळसखेडची गाणी' या पुस्तकांची योजना केली.

कवितेबद्दलचा त्यांचा उत्साह इतका की पॉप्युलरने जवळजवळ शंभर काव्यग्रंथ प्रकाशित केले आहेत, हे कळल्यावर त्यांनी त्यांच्या स्फुट कवितांचा संग्रह 'पावसाळी कविता' शंभरावा आणि एकशेएकावा 'पळसखेडची गाणी' यांच्या प्रकाशन समारंभासाठी ते मुद्दाम मुंबईला आले आणि विंदा करंदीकर यांच्या हस्ते हा समारंभ झाला.

अजिंठ्याचा परिसर पालथा घालताना त्यांना पारोची समाधी सापडली. त्यांच्या कविमनाने काही संशोधनाच्या आधारावर ती आगळी प्रेमकथा उभारली. ते जणू त्या प्रेमिकांच्या प्रेमात पडले. अनेक कलावंतांना ते पारोची समाधी दाखवत आणि त्या परिकथेत संचार करायला लावत. यांपैकी एक नितीन देसाई यांनी त्यावर चित्रपटही तयार केला. या खंडकाव्याचा हिंदी आणि इंग्रजीतून अनुवादही महानोरांनी करवून घेतला. इतके कवी महानोर त्या कथेने झपाटले होते.

त्यांची कविता फक्त त्यांच्या रानापाशी घुटमळत नव्हती. सामाजिक जाणिवेतील श्रद्धास्थाने हीही त्यांच्या दृष्टीने स्फूर्तिदायक होती. 'तिची कहाणी' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत ते स्पष्ट करतात, 'कविता अशी बिलगून राहिली म्हणजे प्रचंड ओरबाडून टाकणारे दु:ख ताप हलके होत जातात. पुन्हा नव्याने उभे राहण्याची, जगण्याची उमेद राहते.'

शिवाजीमहाराजांच्या पराक्रमाबद्दल किंवा महाराज हे

जाणता राजा म्हणूनही त्यांच्याबद्दल बरेच गद्यपद्यात लिहिले गेले आहे. महानोर सांगायचे की शेतकऱ्याच्या समस्यांबद्दल जाणीव असलेले थोर पुरुष तीन : शिवाजीमहाराज, महात्मा फुले आणि महात्मा गांधी. शिवाजीमहाराजांच्या या योगदानाचे 'गाथा शिवरायाची' या महानोरांच्या खंडकाव्यात दर्शन होते. गांधीजी स्वत:ला शेतकरी म्हणवून घेत असत. त्यांच्या शेतकीविषयक विचारांसंबंधी महानोर लिहिणार होते, ते राहून गेले. गांधीजींचा सत्य म्हणजे प्रेम म्हणजे ईश्वर हेच काव्यरूपाने सानेगुरुजी यांनी सांगितलेला संदेश 'जगाला प्रेम अर्पावे' या कवितासंग्रहात महानोरांनी स्वत:च्या कवितेतून आणला आहे.

महानोरांनी गद्य लेखन केले ते प्रामुख्याने शेतीविषयक किंवा आमदार म्हणून. त्यांनी फक्त एक कादंबरी लिहिली – 'गांधारी'– रझाकारांनी पीडलेल्या अनुभवांविषयी. या कवींनी कादंबरीकारही व्हायला हवे होते अशी चुटपूट लावणारी ही कादंबरी.

त्यांचे सामाजिक व्याप वाढत गेले तसे त्यांचे स्फुट कवितालेखन कमी झाले. 'पक्ष्यांचे लक्ष थवे' या पुस्तकात उत्तम क्षीरसागर यांनी प्रदीर्घ प्रस्तावनेसह निवडलेल्या शंभर कवितांच्या संग्रहातून तेव्हाचे नवेजुने महानोर भेटले. 'पानझड' या संग्रहात त्यांची काही गाजलेली गीते समाविष्ट केली. यापूर्वी निसर्गाबद्दल उत्साहाने लिहिणाऱ्या महानोरांना दुष्काळी अनुभवामुळे काही उदासवाण्या कविता लिहाव्या लागल्या. त्याशिवाय त्यांनी काही पालखीचे अभंग लिहिले. ज्यातून एक वेगळेच वास्तववादी महानोर दिसू लागले. याच 'पानझड' संग्रहानिमित्त त्यांना साहित्य अकादेमीचा पुरस्कार मिळाला.

हे नवे रूप मांडण्यासाठी 'प्रार्थना दयाधना', 'गंगा वाहू दे निर्मळ' या संग्रहांतून दीर्घ कविता अधिक आढळतात. बदलणाऱ्या वास्तवाचे चित्रण अधिक स्पष्टपणे दिसू लागते. महानोरांच्या दीर्घ कवितांचा आशय पाहता त्यांनी बहुतेक कविता उपहास-उपरोधाच्या अंगाने प्रकट झालेल्या दिसतात.

सुरुवातीच्या काळात शेतीबद्दल उत्साहाने लिहिणारे महानोर यांच्या शेतीच्या दुर्दशेविषयीच्या कविता लिहू लागतात. 'प्रार्थना दयाधना' ह्या दीर्घ कवितांच्या संग्रहात पाण्यासाठी केलेली प्रार्थना तीव्र होत जाते. यांत काही दीर्घ कविता एकत्र वाचायला मिळतात.

मध्यंतरीच्या काळात महानोर बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या संमेलनानिमित्त अमेरिकेला जाऊन आले. त्यावेळी हा शेतकरी कसा दिसला असेल याची कल्पना केलेली बरी. तेवढ्यापुरता त्यांचा पोषाखही बदलला असेल. परंतु त्यांचे देशीपण मात्र तसेच राहिले. काही कवितांतून ते स्पष्ट दिसते. 'गंगा वाहू दे निर्मळ' ह्या संग्रहात निम्म्याहून अधिक कविता ह्या दीर्घ कविता आणि स्फुट कविता चिंतनाच्या पातळीवर आहेत.

'रानातल्या कविता'नंतर सेहेचाळीस वर्षांनी प्रकाशित होणारा 'वाहटूळ' हा महानोरांचा बारावा कवितासंग्रह. महनोरांच्या कवितेने अनेक वळणे घेतली, निसर्गात रममाण होणाऱ्या ह्या कवीचे सामाजिक भान कधीच सुटले नाही. त्यांच्या ह्या बदलत्या कवितेची रूपे 'वाहटूळ' ह्या संग्रहात दिसतात. यात काळात लिहिलेल्या चित्रपटगीतांचा समावेश त्याच प्रमाणे स्वातंत्र्यानंतर काही काळ अतिशय सुंदर पद्धतीने उभी राहिलेली खेडी तिथल्या दूषित वातावरणामुळे उद्ध्वस्त झाल्यामुळे खेड्यांचे भकास वास्तव महानोरांनी उभे केले आहे.

वरवर पाहता महानोरांनी विमनस्क व्हावे असे काही नसायला हवे होते. परंतु ते जसे लळा लावलेल्या शेताच्या सुखदु:खामुळे व्यथित व्हायचे तसेच त्यांच्या साहित्य, शेती, समाजकारण या क्षेत्रांतील मित्रपरिवाराच्या अडचणीनीही. त्यातून यश आणि कीर्तीसोबत असूयाही वाढते आणि त्यांना भाऊबंदकीचा फटका बसला. ह्या प्रदीर्घकाळात ज्या मित्रपरिवाराचा त्यांना आधार वाटला त्यांच्या विषयीच्या आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी त्यांनी गद्यलेखनाचा आधार घेतला. 'ऐसी कळवल्यांची जाती' या पुस्तकाचे स्वरूप काहीसे व्यक्तिचित्रणासारखे असले तरी खरा तो पुस्तकरूपी ऋणनिर्देशच आहे. या मन:स्थितीतून ते बाहेर येतात न येतात तोच त्यांना हतबल करणारे आघात होऊ लागले.

पाऊणशे वर्षांपूर्वीच्या ग्रामीण रीतिरिवाजानुसार म हानोरांचे लग्न लहान वयातच झाले. सुलोचनावहिनी आणि नामदेवराव यांचा संसार दीर्घ काळ बहरला. मुले-नातवंडे यांच्यासोबत त्यांची भवरलाल जैन, चंद्रकांत पाटील अशी मित्रमंडळी हाही त्यांचा संसारच होता. प्रत्येक कर्तृत्ववान पुरुषामागे एक स्त्री खंबीरपणे उभी असते असे म्हणण्याचा प्रघात आहे. बहुतेक लेखक आपल्या ऋणनिर्देशात पत्नीचा उल्लेख करतात. परंतु त्यापलीकडे जाणारे असे ह्या दोघांचे नाते होते. सुलोचनावहिनींच्या निधनाने ते हादरले. आणि त्या दु:खाचा दाह शांत करण्यासाठी त्यांना साहित्याचाच आधार घ्यावा लागला. नव्याने काही लेखन होईना परंतु त्यांच्या अनेक कवितांची प्रेरणा सुलोचनावहिनीच होत्या. अशा कवितांचे संकलन आणि एक प्रदीर्घ लेख एकत्र करून 'सुलोचनेच्या पाऊलखुणा' ह्या पुस्तकाची जुळणी झाली. त्यांचे दीर्घकालचे स्नेही समीक्षक-अनुवादक चंद्रकांत पाटील आणि त्यांच्या कवितांचा प्रकाशक मित्र म्हणून माझाही ह्या पुस्तकाला हातभार लागला. सगळयात महत्त्वाचे म्हणजे सुलोचनाबाईंनी आकाशवाणी सोलापूर केंद्राला दिलेली मुलाखत उपलब्ध झाली. त्यांच्या ग्रंथसाराचा शेवट असा त्यांच्या प्रिय व्यक्तीशीच संबंधित राहिला.

**– रामदास भटकळ**
ramdasbhatkal@gmail.com




अतुल देऊळगावकर

# गावातील आरोग्याच्या पायवाटेचे 'डॉक्टर'

**रोगप्रतिबंधासाठी** केलेला एक पैशाचा खर्च उपचाराचा एक रुपया वाचवत असतो, या बेंजामिन फ्रँकलिन (अठराव्या शतकातील अमेरिकी विचारवंत) यांच्या विचारांचा वास्तवात प्रत्यय येणे, ही तुलनेने अवघड गोष्ट. अभूतपूर्व अशा कोविडच्या संकटात ग्रामीण भागातील आरोग्य आणि आरोग्ययंत्रणा सुधारणे आवश्यक असून त्यास अग्रक्रम दिला गेला पाहिजे, असे अनेक तज्ज्ञांचे मत होते. या पार्श्वभूमीवर पाहता, महाराष्ट्रातल्या ग्रामीण भागातील आरोग्यासाठी झटणाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. आपल्याकडे ग्रामीण भागात वैद्यकीय आणि सामाजिक काम करण्याची एक मोठी परंपरा दिसते. त्या परंपरेचा वसा पुढे चालवणाऱ्या डॉ. शशिकांत अहंकारी यांचे अलीकडेच निधन झाले.

'तरुणांचे दशक' म्हणून १९६० च्या दशकाची ओळख आहे. त्या विज्ञानाने भारावलेल्या-भारलेल्या काळात विज्ञानाचा उपयोग सामान्यांसाठी केला पाहिजे, असा आग्रह धरला जात होता. विज्ञानक्षेत्रातील भ्रष्टता उघड करणारी डॉ. अरुण लिमये यांचे 'क्लोरोफॉर्म', डॉ. आनंद नाडकर्णी यांचे 'वैद्यकसत्ता'ही पुस्तके या काळात आली. हा काळ विविध स्तरांवरील घडामोडींचा होता. १९७८ मध्ये रशियातील अल्मा आटामध्ये झालेल्या जागतिक आरोग्य संघटनेच्या बैठकीने २००० पर्यंत 'सर्वांसाठी आरोग्य' हे ध्येय जाहीर केले. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या घोषणेला दुजोरा देत या घोषणापत्रावर स्वीकृतीची स्वाक्षरी केली. हे ध्येय साध्य करायचे तर डॉक्टर समाजाभिमुख असणे गरजेचे होते. प्राथमिक आरोग्यकेंद्रातील वैद्यकीय अधिकारी हाच आरोग्याबाबतचा सर्वात महत्त्वपूर्ण घटक असतो. त्यामुळे वैद्यकीय शिक्षण घेऊन बाहेर पडून आरोग्यक्षेत्रात कामाची सुरुवात करण्याऱ्या डॉक्टरांपर्यंत ही भूमिका नेण्यासाठी सर्वांना आवाहन करायचे डॉ. शशिकांत अहंकारी यांनी ठरवले.



डॉ. शशिकांत अहंकारी

**'हॅलो'चा श्रीगणेशा**

डॉ. अहंकारी तेव्हा औरंगाबादच्या वैद्यकीय महाविद्यालयात निवासी डॉक्टर होते. विद्यार्थ्यांपर्यंत पोहचण्यासाठी त्यांनी जवळपास १४० प्रश्न काढून ते महाविद्यालयाच्या दर्शनी भागात लावले. डॉ. अहंकारी यांच्या मते, 'पहिल्या वर्षात विद्यार्थी आजारांविषयी शिकतात आणि दुसऱ्या वर्षापासून वॉर्डमध्ये जाऊ लागल्यावर त्यांना रुग्णांची प्रत्यक्ष लक्षणं समजतात. शिकलं ते प्रत्यक्ष अनुभवण्याची ही प्रक्रिया शैक्षणिक समाधान, आनंद देणारी असते. तेव्हा त्यांच्या दृष्टीनं रुग्ण हा केवळ शिक्षणाचं माध्यम असतो. त्यांनी रूग्णातील माणसाकडे पाहायला हवे. वैद्यकीय चिकित्सा करताना माणुसकीच्या संवेदनाही मनात जाग्या असल्या पाहिजेत.' त्यालाच साद घालणाऱ्या प्रश्नांचा समावेश या प्रश्नावलीत होता.

त्या प्रश्नांनी विद्यार्थ्यांना विचार करायला भाग पाडले. 'हे प्रश्न महत्त्वाचे वाटले तर आपण हॉलमध्ये भेटू' असे आवाहन डॉक्टरांनी केले होते. त्याला प्रतिसाद देत जवळपास १५०-२०० विद्यार्थी चर्चेसाठी जमले. डॉक्टरांनी मोकळेपणाने सांगितले, की प्रश्न माझे असले तरी त्यांची उत्तरे माझ्याकडेही नव्हती. ती सर्वांनी केलेल्या चर्चेतून शोधायची होती. ती शोधणे आणि अनारोग्यासह गरिबी प्रत्यक्षात बघण्यासाठी आपण लोकांना भेटायला हवे, यावर सगळ्यांचे एकमत झाले. समाजाची चांगली ओळख असणारा आणि समाजाप्रती संवेदनशीलता असणारा डॉक्टर तयार करणे हे ध्येय समोर ठेवले आणि 'हेल्थ अँड ऑटो लर्निंग ऑर्गनायझेशन' अर्थात 'हॅलो'ची सुरुवात झाली. एका परीने हे स्वयंअध्ययन होते.

शहरी-खेड्यातले, विविध आर्थिक स्तरांतले विद्यार्थी खेडेगावात जाऊ लागले. त्यांना तिथली भीषण वास्तव परिस्थिती आणि आहार, पाणी, सार्वजनिक स्वच्छता आदी समस्या समजू लागल्या. अंगावर आजार कसा, का काढला जातो, याची प्रत्यक्ष भेटीमुळे भावी डॉक्टरांना जाणीव होऊ लागली आणि समाजाला काहीसे वैद्यकीय भान येऊ लागले. रोगप्रतिबंधक उपाय, ते समजावण्याची रीत, रोगांबाबतच्या अंधश्रद्धा आदी मुद्द्यांवर या विद्यार्थ्यांमध्ये वाद-विवाद घडू लागले. हे विद्यार्थी खेळ, नाटक, गाणी व वृत्तचित्रे सादर करून सोप्या भाषेत आरोग्याचे शिक्षण देऊ लागले. प्रत्यक्ष अनुभव मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय ज्ञानाचा पाया भक्कम होऊ लागला. विद्यार्थी आणि प्राध्यापकवर्गात 'हॅलो'चा दबदबा निर्माण झाला. आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात 'हॅलो'च्या मुशीतून बाहेर पडलेल्या सुमारे पाचशे डॉक्टरांनी स्वत:चा ठसा उमटवला आहे. डॉ. अशोक बेलखोडे, डॉ. क्रांती व डॉ. माधुरी रायमाने, डॉ. विजय गायकवाड, डॉ. संजय गायकवाड, डॉ. आनंद निकाळजे, डॉ. शिल्पा दोमकुंडवार, डॉ. सरिता स्वामी, डॉ. मिलिंद पोतदार, डॉ. हणमंत वडगावे आदी 'हॅलो'च्या डॉक्टर शिलेदारांनी वैद्यकीय व्यवसायात नैतिकता जोपासून स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले आहे. या सर्वांनी किल्लारीच्या भूकंपानंतर 'हॅलो'च्या कक्षा रुंदावण्याकरता १९९३ मध्ये 'हॅलो मेडिकल फाऊंडेशन'ची स्थापना केली.


**'भारतवैद्य' संकल्पना**

सर्वांसाठी आरोग्य हा विचार रुजवणे किती आव्हानात्मक आहे, हे अहंकारी दाम्पत्याच्या केव्हाच लक्षात आले होते. 'हॅलो मेडिकल फाऊंडेशन'ने गावांत जाऊन महिलांची निवड केली. त्यांच्या प्रशिक्षणासाठी ४२ दिवसांचा अभ्यासक्रम तयार केला. त्याकरता डॉ. श्याम अष्टेकर यांच्या 'भारतवैद्यक' या पुस्तकाचा आधार घेतला. अणदूरमधल्या प्रत्यक्ष प्रशिक्षणात डॉ. श्याम अष्टेकर, डॉ. अनंत फडके, डॉ. दीप्ती चिरमुले, डॉ. ध्रुव मंकड, डॉ. वरेरकर असे जवळपास शंभर डॉक्टर सहभागी झाले होते. त्यामुळे १९९० च्या दशकात डॉ. शुभांगी आणि डॉ. शशिकांत अहंकारी यांनी डेव्हिड वॉर्नरलिखित 'डॉक्टर नसेल तेथे' या पुस्तकातील संकल्पना आणि डॉ. आरोळे यांचे प्रयोग समजू घेऊन अणदूर परिसरात 'भारतवैद्य' प्रकल्प चालू केला. 'हॅलो'ने खेड्यांतील उपेक्षितांमधील उपेक्षित असणाऱ्या एकल महिलांना प्राथमिक आरोग्यसेवा देण्यासाठीचे उत्तम प्रशिक्षण दिले. त्यामुळे गावात कधी मान वर करून पाहून न शकणारी बाई स्टेथोस्कोप लावून हृदयाचे ठोके मोजू लागली. साध्या आजाराचे निदान करून औषध-गोळ्या देऊ लागली. गंभीर आजारासाठी मोठ्या रुग्णालयात पाठवू लागली. गर्भवतीची काळजी कशी घ्यायची हे सांगू लागली. लसीकरणमोहिमेत सहभागी होऊ लागली. परिसरस्वच्छतेची निकड पटवून त्यासाठी पुढाकार घेऊ लागली. गावातल्या अनेक बदलांची ती दूत झाली. (यातूनच पुढे भारत सरकारच्या 'आशा'- ॲक्रिडेटेड सोशल ॲक्टिव्हिस्ट या योजनेचा जन्म झाला) भारतवैद्यांनी क्षय, एड्सचे, इतके काय प्रसंगी कॅन्सरचेही वेळीच व योग्य निदान केले आहे. कोविडकाळात भारतवैद्यांनी शंभर गावांत कोरोनाची तपासणी व आरोग्यसेवा पुरवली. गेल्या दहा वर्षांत सात भारतवैद्यांनी पन्नास हजार रुग्णांवर उपचार केले. दोन हजार रुग्णांना संदर्भ सेवेसाठी पाठवले. सात हजार बाळंतपणे केली. पन्नास भ्रूणहत्या वाचवल्या. 'अनवाणी डॉक्टर'देखील कर्तृत्व दाखवू शकतात, हे त्यांनी सिद्ध केले.

डॉ. अहंकारी यांचे मत होते, की आरोग्यसेवेमध्ये 'फर्स्ट कॉण्टॅक्ट केअर'ला खूप महत्त्व आहे. म्हणून सेवा गावापासून सुरू झाली पाहिजे. आज गावातल्या रुग्णासाठी आरोग्यसेवा देण्यासाठी प्रशिक्षित व्यक्ती नाही. रुग्णाची लक्षणे ओळखणे, त्यांना प्राथमिक सेवा देणे, तातडीची काळजी घेता येणे इतपत ज्ञान असलेली व्यक्ती गावातली असून ती आरोग्ययंत्रणेचा भाग असायला हवी. 'भारतवैद्य मॉडेल' याच विचारांवर आधारित होते. त्यांच्यामार्फत गावातील जवळपास ८०-८५ टक्के आजार बरे करणे शक्य झाले. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत गावपातळीवर 'आशा कार्यकर्ती'ची नेमणूकही याच मॉडेलच्या आधारे झाली. आशाच्या सोबत अंगणवाडी सेविका असून त्या लोकांना माहिती आणि धीर द्यायचे काम करत आहेत. आशा कार्यकर्त्या लोकांची काळजी घेत असताना शासन आणि समाजाने त्यांचीही काळजी घ्यायला हवी. कारण त्या करत असलेले काम पैशांत मोजण्याच्या पलीकडचे आहे.

**आरोग्य आणि समाजबदल**

१९९३ चा भूकंप ते २०२० मधली कोविडची साथ या कालावधीत समाजात झालेले अनेक बदल डॉ. अहंकारी यांना जाणवत होते. पूर्वीपेक्षा आज लोकांतील समज, साक्षरता,



**डॉ. शशिकांत अहंकारी**
**महिला कार्यकर्त्यांचे प्रबोधन करताना**

सजगता वाढलेली आहे. गावपातळीवरची गुंडगिरी आणि दहशत कमी झालेली आहे. आज लोकांची पटलेल्या गोष्टी स्वीकारायची तयारी आहे. चांगल्या प्रकारचे लोकाभिमुख काम करणाऱ्यांचे म हत्त्व लोकांना समजलेले आहे. या सकारात्मक बदलांचा आधार घेत लोकांपर्यंत पोचले तर प्रश्न सुटायला नक्कीच मदत होते, ही डॉक्टरांची तेलाची निरीक्षणे खूप बोलकी आहेत.

डॉ. अहंकारी दाम्पत्याने महिलांचे आरोग्य आणि स्वास्थ्याला प्राधान्य दिलेले दिसते. स्त्रियांच्या आरोग्याशी निगडित समस्या सरकारच्या निदर्शनास आणून देत महिला आणि मुलींमधील लोहसत्त्वाचे प्रमाण वाढवणे, त्यांचे आरोग्यभान वाढवणे यासाठी त्यांनी कार्यक्रम आखला होता. अलीकडच्या काळात सतत ताणतणावाच्या परिस्थितीमुळे मानसिक आजार वाढले असून या रुग्णांना समुपदेशनाची गरज आहे. वैद्यकीय तज्ज्ञांनीही रुग्ण आणि आजारांकडे बघण्याची दृष्टी बदलण्याची गरज असल्याचे डॉ. अहंकारी यांना वाटे. जनआरोग्य अभियान ही खूप काळापासूनची मागणी आहे. सर्वांसाठी आरोग्यसेवा उपलब्ध असल्या पाहिजेत आणि त्यासाठी खाजगी आरोग्यसेवांचे नियमन झाले पाहिजे. शासकीय आणि खाजगी आरोग्यसेवांच्या समन्वयातून सर्वांना आरोग्यसेवा मिळेल, हे सुनिश्चित झाले पाहिजे, असे मत त्यांनी मांडलेले होते.

### आरोग्यविम्याची सुविधा

शहरात 'मेडिक्लेम'साठी विमा कंपन्यांची चढाओढ सुरू आहे. 'थेट रुग्णालयात दाखल व्हा, उपचार घ्या आणि बिल कंपनी देऊन टाकेल,' अशा सुविधा मध्यमवर्गीय आणि नोकरदारांना मिळत आहेत. खरी निकड असूनही असंघटित कष्टकरी मात्र या सोयीपासून वंचित आहेत. याची बोच वाटणाऱ्या डॉ. अहंकारी यांनी 'युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी'च्या सहकार्यातून सहाशे बचतगटांच्या सभासदांचा आरोग्य विमा उतरवला. कुटुंबआरोग्यविमा योजनेत १९९ रुपयांत अपघात विमा, घरासाठीचा आग आणि भूकंपासाठीचा विमा यांचाही समावेश केला. या योजनेत वर्षभरात लाभधारकाला बाळंतपण आणि इतर कुठल्याही आजाराकरता रुग्णालयात दाखल केल्यास पाच हजार रुपयांपर्यंतचा खर्च परत मिळू शकतो. वर्षांतून एकदा संपूर्ण शरीराची तपासणी मोफत करून मिळते. ही योजना गरिबांसाठी संकटकाळी बाहेर पडण्याचा मार्ग ठरली आहे. डॉ. अहंकारी यांनी अनेक व्यासपीठांवरून तिचा पाठपुरावा केल्यामुळे महाराष्ट्र राज्याने उस्मानाबाद, बीड, ठाणे जिल्ह्यांत आरोग्यविमा लागू करण्याचा प्रकल्प हाती घेऊन त्याची सूत्रे 'हॅलो मेडिकल फाऊंडेशन'कडे सोपवली आहेत.

### निरामय समाजासाठी

खेडेगावातच हयात गेल्यामुळे डॉ. अहंकारी यांना गावातील खाचाखोचांची बारकाईने जाण होती. अतिशय मृदू स्वभाव आणि अंगभूत क्षमाशीलतेमुळे सर्वांना सोबत घेऊन जाणे, हे त्यांच्यासाठी सहज शक्य होते. संवाद तुटू न देता विरोधी व नकारात्मक मत असलेल्यांनाही आपल्या बाजूला वळवण्याचे विलक्षण कौशल्य त्यांच्याकडे होते. समग्र ग्रामीण विकास झाला तरच समाज निरामय होईल, याची त्यांना जाणीव होती. म्हणूनच त्यांनी एकाच वेळी अनेक आघाड्यांवर कामे सुरू केली. त्यांनी 'स्वत:च्या वा शेजारच्या घरातील हिंसा सहन करायची नाही. एकत्र येऊन बोलल्यावर दु:ख हलके होते. वेगळे मार्ग सापडतात.' याची प्रचीती अनेक वेळा आणून दिली. वेगवेगळे कार्यक्रम घेऊन 'समजदार जोडीदारा'चा सन्मान केला. पुण्यातील 'विज्ञानवाहिनी'च्या सहकार्यातून 'विज्ञानकेंद्र' चालू केले. तुळजापूर आणि लोहारा तालुक्यांतील अनेक शाळा, विज्ञान समजावून घेण्यासाठी अणदूरला येऊ लागल्या. शाळेतील मुला-मुलींसाठीं निबंधस्पर्धा चालू केली. गावांत किशोरी मेळावे

सुरू केले. मुलींना सायकली दिल्या. या बदलांमुळे घराघरांतून ‘मला शिकू द्या, आताच लग्न नको’ असे निर्धार ऐकू येऊ लागले. घरांतील आणि गावांतील वैयक्तिक व सार्वजनिक जीवनाची गुणवत्ता उंचावत गेली. दुसरीकडे बचतगटातून आर्थिक स्वावलंबन मिळवण्यासाठी महिलांची धडपड सुरू झाली. शेळीपालन, मिरचीकांडप, पिठगिरणी घेऊन व्यवसाय सुरू केले. रोपवाटिका, बियाणे, सेंद्रिय खतासह कीटकनाशकांची निर्मिती, अळंबी, खाद्य व दुग्धजन्य पदार्थाचे उत्पादन यांमध्ये बचतगटांचा संचार सुरू झाला. आता ‘हॅलो’मय गावात कोणताही सरकारी अधिकारी, कुठलीही योजना आखताना, तिथल्या भारतवैद्य व बचतगटाच्या कार्यकर्त्यांचा सल्ला जरूर घेतात. ‘हॅलो’च्या कार्यकर्त्यांना त्यांच्या भागात कमालीची प्रतिष्ठा लाभली आहे. त्या अनेक सार्वजनिक कार्यक्रमांत प्रमुख अतिथी असतात. स्वत:चा ‘स्वर’ गवसलेल्या या महिलांसाठी ‘हॅलो’ हे मुक्त विद्यापीठ आहे. म्हणूनच महिला मेळाव्याला स्वत:चा खर्च करून व सोबत भाजी-भाकरी बांधून चार-पाच हजार महिला सहज जमत. यापैकी प्रत्येकीच्या कहाणीचे साक्षीदार, डॉ. शशिकांत व डॉ. शुभांगी अहंकारी यांचा प्रत्येकीशी थेट आणि जिव्हाळ्याचा संवाद आहे. डॉ. शशिकांत विविध कामांसाठी गावोगावी फिरत असत. रुग्णालयाची कायमस्वरूपी जबाबदारी ही डॉ. शुभांगींवर असे. अणदूर भागातील ५०-६० किलोमीटर अंतरापासून रात्री-अपरात्री बाळंतपण, सर्पदंश व अपघाताचे रुग्ण येतात. हसतमुखाने व आस्थेवाईकपणे प्रत्येकावर उपचार करणाऱ्या शुभांगी म्हणजे या परिसराच्या जणू ‘फ्लोरेन्स नाइटेंगल!’

मृत्युशय्येवर असतानाही डॉ. शशिकांत यांच्या मनात एकल महिला व सार्वजनिक आरोग्याचाच विचार चालू असे. अर्थतत्त्वज्ञ प्रा. अमर्त्य सेन यांच्या शिष्या प्रा. जेनिफर रूगर यांच्या ‘ग्लोबल हेल्थ जस्टिस अँड गव्हर्नन्स’ या संकल्पनेची जगभर विलक्षण चर्चा चालू आहे. प्रा. जेनिफर म्हणतात, ‘‘सध्या अनेक देशांत आरोग्य सुविधा देताना ‘न्याय व समता’ या संकल्पनांचा विचारच केला जात नाही. मानवाची भरभराट करण्यासाठी स्थानिक व जागतिक पातळीवर उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध असणं अतिशय कळीचे आहे.’’ हा विचार पुढे कसा न्यावा, काही संस्थांना सोबत घेऊन १५ ऑगस्टच्या सुमारास महिला मेळावा आयोजित करावा व त्यात अशी मांडणी करावी, असे त्यांच्या मनात चालले होते. त्यानुसार हा मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यात अहंकारी यांच्या स्मरणार्थ ‘हवामानबदल व आरोग्य’ या विषयावर कार्य करण्याचे ठरले. निवडक गावात सर्वेक्षण करून तापमानवाढीमुळे होणारे आजार आणि त्यावरील उपचार यांच्या माहितीचा प्रसार केला जाईल. असा निर्णय घेण्यात आला. डॉ. शशिकांत अहंकारी यांच्या आरोग्यविचारांचा वसा अनेक घरांतून व गावांतून प्रत्यक्ष आचरणात आणला जाईल.

**– अतुल देऊळगावकर**
atul.deulgaonkargmail.com

संकलन
**राधिका कुंटे**

**स्वातंत्र्यसंग्राम संगीतकारांचा**

**माधवी नानल**

**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**




संगीत ही एक जिवंत गोष्ट त्यामुळे त्या कलेचा जगाशी, तेथील घडामोडींशी निकटचा संबंध असतो. संगीत करणाऱ्यांना मात्र संगीत हे बेट आहे, आणि ते स्वायत्त, स्वतंत्र आहे, असे वाटत असते. संगीत आणि भारताचा स्वातंत्र्यसंग्राम हा विषय याच अर्थाने अतिशय महत्त्वाचा असला तरी तो दुर्लक्षितच राहिला. माधवी नानल यांनी त्याकडे संशोधनात्मक दृष्टीने लक्ष देऊन हा ग्रंथ सिद्ध केला, हे म्हणून अधिक महत्त्वाचे. माधवी नानल यांनी या ग्रंथासाठी घेतलेले कष्ट पानोपानी दिसतात. संदर्भासाठी केलेली धडपड आणि त्याची सुसंगत मांडणी करण्यासाठी त्यांनी घेतलेल्या परिश्रमांमुळे या ग्रंथाला संदर्भमूल्य मिळाले आहे.

**– मुकुंद संगोराम**



**प्रवीण बर्दापूरकर**

# अरुवार कवी आणि माणूसही...



**ना. धों. महानोर**

**रानकवी** ना. धों. महानोर यांच्या निधनानंतर समाज आणि मुद्रीत माध्यमात वैपुल्यानं लेखन झालेलं आहे. या बहुतेक लेखनाचा भर महानोरांच्या कवितेवर आहे. आमच्या मुग्धा कर्णिकनं महानोरांच्या शब्दकळेचा उल्लेख 'अरुवार' या चपखल आणि लोभस शब्दांत केला आहे. (फार म्हणजे फारच वर्षांनी हा शब्द अवचित भेटला.) खरं तर, केवळ कवी म्हणूनच नाही तर माणूस म्हणूनही महानोर पूर्णपणे अरुवारच होते असा अनुभव आहे.

बरंच मागे जाऊन सांगायचं, तर १९६७-६८ चे ते दिवस होते. औरंगाबादच्या पांडुरंग कॉलनीत एका छोट्याशा खोलीत आम्ही राहत होतो. वडिलांचं नुकतंच निधन झालेलं होतं. आमच्यासाठी तो काळ कठीणच नाही तर विपन्नावस्थेचा होता. त्या काळात वडिलांचे एक दूरचे मावसकाका उत्तम क्षीरसागर आणि प्रभाकर क्षीरसागर यांचा आम्हाला खूपच आधार मिळाला. या दोघांमुळेच मला शिक्षणाची गोडी लागली. सर्वच क्षीरसागर बंधू उच्चशिक्षित होते. उत्तम क्षीरसागर यांना आम्ही आबा म्हणत असू तर मित्र वर्तुळात त्यांना महाराज म्हणत. ते अभिजात साहित्य प्रेमी,वाचक आणि कलासक्त होते. त्यांची ऊठबस त्या काळात ना. धों. महानोर, भास्कर लक्ष्मण भोळे, चंद्रकांत पाटील, नेमाडे अशा मंडळीत होती. भालचंद्र नेमाडे यांच्या गाजलेल्या 'कोसला' या कादंबरीच्या पहिल्या आवृत्तीचं मुखपृष्ठ महारांजांनीच रेखाटलं होतं. महाराजांकडेच मी या सर्वांना बघितले. महानोर वगळता ही सर्व मंडळी तेव्हा नुकतीच प्राध्यापकी पेशात स्थिरावत होती, तरुण होती आणि तिशीच्या उंबरठ्यावर म्हणजे माझ्यापेक्षा वयाने १२-१४ वर्षांनं ज्येष्ठ होती. यापैकी भोळे आणि महानोरांशी माझी बऱ्यापैकी गट्टी जमली. पुढे या दोघांचंही अपार ममत्व मला लाभलं. १९७७ साली पत्रकारिता करण्यासाठी मी औरंगाबाद सोडलं आणि १९८१ साली नागपूरला पडाव टाकल्यावर भोळे आणि महानोरांची छत्रछाया माझ्यावर पुन्हा पसरली. तेव्हापासून या दोघांच्याही मी अतिशय नियमित संपर्कात आलो आणि प्रसिद्धीच्या झोतात असलेल्या या दोघांतही असलेला माणूस मला सतत दिसत राहिला. तेव्हा आम्ही बजाजनगरमधील 'आनंद मंगल' या फ्लॅटमध्ये राहत असे. तिथल्या टेरेसवर मित्रांच्या मैफलीत काव्यगायनांसाठी महानोर यांना दोन वेळा आमंत्रित केलं. कोणतेही आढेवेढे न घेता ते आले; इतके ते साधे होते, निगर्वी होते. नागपूरची थंडी पण पेटवलेल्या शेकोटीच्या उबेत महानोर रंगले. आधी भास्कर लक्ष्मण भोळे गेले आणि आता ना.धों. महानोरही.

ना.धों. महानोरांना अमाप प्रसिद्धी मिळाली; अनेक मोठमोठे सन्मान लाभले. त्यांची भटकंतीही खूप झाली. पण, त्यांची पावलं, त्यांचं हृदय मात्र पळसखेडच्या भूमीत जखडूनच राहिलं. कवी, आमदार, कथा आणि ललित लेखक, प्रयोगशील शेतकरी यापलीकडे जाऊन महानोरांना व्यसन होतं ते पळसखेडची माती, कविता आणि माणसांचं. त्यांचं हे माणूसवेडेपण जात, धर्म आणि प्रदेशाच्या सीमा ओलांडून

अफाट विस्तारलेलं होतं. राजकारण, समाजकारण, प्रशासन, साहित्य, कला अशा सर्व क्षेत्रांत महानोरांचा मुक्त संचार होता. त्यांना हेरलं ते यशवंतराव चव्हाण यांनी आणि मग हा माणूस दोन्ही ओंजळीत घेऊन निगुतीनं सांभाळला तो शरद पवार यांनी.

महानोर तसे काँग्रेस विचारांचे, पण त्यांच्या निष्ठा मात्र शरद पवारांवर होत्या. शरद पवार हाच त्यांचा राजकीय विचार होता. काँग्रेसमधून फुटून शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केल्यावर दीड-दोन महिन्यांनी मी एकदा पळसखेडला गेलो. गप्पांच्या ओघात महानोरांना विचारलं, 'तुम्ही काँग्रेसवादी की राष्ट्रवादी' तेव्हा महानोर म्हणाले, 'तुला हा प्रश्न पडलाच कसा? मी तर कायम शरद पवारवादीचं!' शरद पवारांप्रमाणेच कविवर्य कुसुमाग्रज, लता मंगेशकर, आशा भोसले आणि पु.ल. देशपांडे हीदेखील महानोरांची आस्थेची माणसं. गप्पा सुरू झाल्या, की या दैवतांविषयी असंख्य हकिकती आणि आठवणी महानोर त्यांच्या खुमासदार शैलीत सांगत असत. ते ऐकताना महानोरांचं हे कथन कधीच संपू नये असं वाटायचं.

उंच आणि भक्कम बांधा, रापलेला गोरा वर्ण, विस्तृत भालप्रदेश आणि अत्यंत साधी राहणी म्हणजे ना.धों. महानोर. पेहेराव कायम पायजामा आणि सदरा, तो बहुसंख्य वेळा धुवट. त्यांना मी फारच क्वचित पॅन्ट आणि शर्टमध्ये पाहिलं तेही मॉरिशसमधे. शिवाय आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे महानोर कायम हसतमुख असत. सर्व क्षेत्रांतल्या अती सर्वोच्च पदस्थ लोकांशी घरोब्याचे संबंध असूनही आणि कुणालाही झिडकारून टाकावं किंवा कुणालाही हिडिसफिडिस करावं हे त्यांच्या स्वभावातच नव्हतं. महानोर सालस माणूसवेडे होते. अनवाणी पायानंही आलेल्या, फाटक्या कुणाशीही ते आगत्यानं बोलत. 'पळसखेडचं तुमचं घर म्हणजे लंगर आहे,' असं मी त्यांना नेहमी म्हणत असे. कारण त्यांच्या घरी कधीच पाच-दहा माणसांचा स्वयंपाक झाला नाही. त्यांच्या घरचा ताटांचा आकडा ५०-६० क्वचित शंभरच्याही पार जात असे. नवीन कवी आला असेल तर त्यांच्या कविता ऐकाव्या, आल्या गेल्यांना भेटावं, त्यांना शेत दाखवावं, शेतातल्या एकएका झाडाची जन्मकथा सांगावी, गप्पांची मस्त मैफल रंगवावी आणि त्या सर्वांना भरपेट भोजनानंद द्यावा, असं महानोरांना सात्त्विक व्यसन होतं.

एकदा असेच बसलो असताना भेटायला आलेल्या कुणीतरी विचारलं, 'ते लताफळ काय आहे?' महानोर लगेच उत्साहानं जमलेल्या सर्वांना घेऊन एका झाडाकडे घेऊन गेले आणि ते झाड साक्षात लतादीदींनी कसं लावलं आहे, याची आठवण त्यांनी भारावलेल्या स्वरात सांगितली. प्रत्यक्षात ते झाड होतं सीताफळाचं, पण महानोर त्या फळांना सीताफळ कधीच म्हणत नसत तर लताफळ म्हणत. त्यांच्या नजरेतून कायमच स्नेहार्द्रता आणि ते बोलणाऱ्या शब्दांतून आपुलकी ओसंडत असे. हे मी इतक्या ठामपणे सांगतो आहे याचं कारण राज्यातच नाही तर परदेशातही महानोरांसोबत भरपूर प्रवास केल्यामुळे त्यांचा निकटचा सहवास लाभला आहे.

ना.धों. महानोरांचं बालपण अती गरिबीत गेलं; इतक्या गरिबीत, की खूप इच्छा असूनही ते शिकू शकले नाहीत. मात्र कवितेनं त्यांचं बोट फारच लवकर धरलं आणि त्यांना लिहितं केलं. अक्षरश: ओसाड माळरानावर त्यांनी शेती फुलवली, ती त्यांचे प्रयत्न, कल्पकता आणि अफाट श्रम यांचा संगम आहे. त्यापासून प्रेरणा घेऊन पळसखेडकरांनी जलसंवर्धनाची मोहीम आणि प्रयोगशीलता राबवून परिसर संपन्न केला. तुटक तुटकपणे हे आणि आणखी बऱ्याच गोष्टी समजत गेल्या. नाही तरी कोणताही माणूस एकाच बैठकीत समजत नाही, तो असाच तुटकतुटक समजत जातो.


**ना.धों. महानोर पत्नी सुलोचना यांच्यासमवेत**

केवळ शेतीच नाही तर पळसखेड्यात महानोरांनी ज्ञानगंगाही आणली. गावातल्या वर्गखोल्यांना त्यांनी वेगवेगळ्या कवींची नावं दिली; त्यांनी त्या खोल्या उभारण्यासाठी लोकवर्गणी जमा केली. त्याची एक आठवण आहे- बहुधा १९८२ साल असावं. हिवाळी अधिवेशनासाठी महानोर नागपूरला येणार होते. तेव्हा ते विधान परिषदेचे सदस्य होते. महानोरांच्या वर्गखोल्या उभारण्यात नागपूरकरांचंही योगदान असावं, असं डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे आणि मला सुचलं. तेव्हा भोळे विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागात प्राध्यापक होते आणि स्वतंत्र प्रज्ञेचा विचारवंत असा त्यांचा लौकिक होता तर मी 'नागपूर पत्रिका' या दैनिकाचा मुख्य वार्ताहर होतो. मग महानोरांशी बोलून त्यांच्या काव्य गायनाचा एक कार्यक्रम करावा आणि उपस्थितांना मदतीचं आव्हान करून निधी जमा करावा असं आम्ही ठरवलं. माहिती खात्याच्या सीताबर्डीवरील सभागृहात हा कार्यक्रम झाला. 'टी.जी.' या नावानं परिचित असणारे काँग्रेसचे लोकप्रिय पुढारी, पत्रकार, लेखक त्र्यं.गो. देशमुख हे राज्याचे मंत्री होते. त्यांच्याकडे माहिती खात्याचाही

कार्यभार होता. त्यामुळे सभागृह नि:शुल्क मिळालं. कार्यक्रमाच्या दिवशी दुपारी सभागृहात टी.जी. देशमुखांची भेट झाली तेव्हा त्यांनी विचारलं, 'कार्यक्रम कसा झाला.' मी त्यांना सांगितलं, 'झाला नाही अजून व्हायचा आहे. आज संध्याकाळी सहा वाजता आहे.'

महानोरांचं काव्यगायन ऐकायला रसिकांनी वेळेआधीच चांगली गर्दी केली. कार्यक्रम सुरू होण्याच्या पाच-सात मिनिटं आधी काव्यगायन ऐकायला टी.जी. देशमुखही पोहोचले. भोळे सरांनी प्रास्ताविकात पळसखेडला एक वर्गखोली बांधण्यासाठी आर्थिक मदतीचं आवाहन केलं. काव्यगायनाचा कार्यक्रम झकास रंगला यात काही आश्चर्य नव्हतं. मंत्री असूनही टी. जी. देशमुख श्रोत्यांमध्ये खाली संतरंजीवर बसले. एवढंच नाहीतर कार्यक्रम संपल्यावर आमच्यासोबत झोळी धरून उभे राहिले आणि नागपूरकरांच्या योगदानाची सुरुवात शंभराच्या पाच नोटा टाकून केली. (तेव्हा ही रक्कम घसघशीतच होती.) लोकांनीही लक्षणीय प्रतिसाद दिला. ती भरलेली झोळी टी.जीं.च्या हस्तेच आम्ही महानोरांच्या स्वाधीन केली. 'रान हेच संपूर्ण जगण्याचं भावजीवन असलेला कवी' अशा शब्दांत टी.जी. देशमुख यांनी महानोर यांचा गौरव केला होता, हे अजूनही आठवतं.

मराठी मनाच्या जागतिक नकाशावर पळसखेड हे गाव आणणाऱ्या ना.धों. महानोरांना काही पळसखेडकरांनी बऱ्यापैकी छळलंही. तो छळ असह्य झाला तेव्हा ती बाब महानोर यांनी तेव्हाचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री गोपीनाथ मुंडे यांना कळवली. तेव्हा मी एक्स्प्रेस वृत्तपत्र समूहाच्या औरंगाबाद ब्युरो ऑफिसमध्ये कार्यरत होतो. गोपीनाथ मुंडे यांनी फोन करून ते मला सांगितलं आणि पळसखेडला जाऊन चौकशी करून वस्तुस्थिती कळवण्यास सांगितलं. मी पळसखेडला गेलो, अनेकांना भेटलो. जी काही माहिती मिळाली ती मुंडे यांना कळविली. मग गोपीनाथ मुंडे स्वत: पळसखेडला आले त्यांनी त्या प्रकरणात सर्वांची समजूत घातली आणि समेट घडवून आणला. हा एकच प्रसंग जेव्हा, खिन्न महानोर बघायला मिळाले. त्यावेळी झालेल्या सभेत व्यासपीठावर महानोरांनी आग्रहानं मलाही शेजारी बसवून घेतलं होतं, पण तो समेट काही फार टिकला नाही. कोर्टकचेऱ्या झाल्या. महानोरांना त्याचा भरपूर मानसिक त्रास झाला तरी त्या काळात महानोर शांत होते. ना त्यांचा तोल सुटला, ना त्यांनी त्रागा व्यक्त केला, ना ते कुणाला अद्वातद्वा बोलले. तणावाच्या त्या काळातही ते अरुवारपणेच वागले.

अखंड गप्पाष्टक हे महानोरांचं आणखी एक व्यसन. त्यांच्या पोतडीत असंख्य हा शब्द थिटा पडावा इतक्या असंख्यांच्या आठवणी, हकिकती आणि किस्से होते. त्यामुळे अनेकदा तर किती सांगू आणि किती नको अशी महानोरांची अवस्था होत असे. एका कोजागिरी निमित्त नागपूरच्या 'आधार' या संस्थेनं ना.धों. महानोरांच्या जाहीर मुलाखतीचा कार्यक्रम आयोजित केला होता. प्रारंभी छोटासा सत्कार, स्वागत आणि मग त्यांची जाहीर मुलाखत मी घ्यावी असं नियोजन होतं. 'पक्ष्यांचे लक्ष थवे, गगनाला पंख नवे' असा तो कार्यक्रम होता. नागपूरला पोहोचायला महानोरांना जरा उशीर झाला आणि ते थेट कार्यक्रमस्थळीच पोहोचले. त्यामुळे कार्यक्रमाच्या स्वरूपाबद्दल बोलणं झालं नाही. शुभदा फडणवीसचं प्रास्ताविक आटोपल्यावर भास्कर लक्ष्मण भोळेंच्या हस्ते महानोरांचा सत्कार करण्यात आला. या दरम्यान हळूच त्यांना जे सात-आठ प्रश्न काढले होते तो कागद मी दाखवला. जाहीर मुलाखत सुरू झाली आणि माझ्या पहिल्याच प्रश्नाच्या उत्तरात महानोर सलग सव्वा तास बोलले. हकिकती, आठवणी आणि काही कवितांचं गायन अशी एक सुरेल लय त्यांच्या कथनाला लाभली होती. श्रोते मंत्रमुग्ध झाले, त्या संध्याकाळचा आसमंत महानोरांच्या त्या सुरेल कथनानं उजळून निघाला. महानोर एकदाचं बोलायचे थांबले आणि मला म्हणाले, 'विचार तुझा पुढचा प्रश्न'.

मी त्यांना म्हणालो 'तुम्ही एकाच प्रश्नाच्या उत्तरात माझ्या सर्वच प्रश्नांची उत्तरं देऊन टाकली. पु.ल. देशपांडे तुम्हाला 'धो, धो महानोर' का म्हणत असत याची प्रचीती आली. आता आणखी कांही कविताच सादर करा.' 'धो धो महानोर'ला श्रोते आणि महानोरांनीही जोरदार हास्याची दाद दिली. ती दादही त्यांच्या अरुवार स्वभावाला साजेशी होती. अन्य कुणी लेखक, कलावंत असता तर त्याला नक्कीच राग आला असता.

अशात आमच्या गाठीभेटी कमी झाल्या होत्या. आम्ही दिल्ली सोडून औरंगाबादला स्थायिक झालो ते कळल्यावर एकदा ते घरी आले. माझ्या बेगमच्या आजारपणाचं कळल्यावरही येऊन गेले. निरोप घेताना दुसऱ्या खोलीत मला नेऊन काही मदत पाहिजे का, असं आस्थेनं विचारलं. या शेवटच्या दोन प्रत्यक्ष भेटी, बाकी अधूनमधून फोनवर बोलणं. हळूहळू त्यांचीच तब्येत बिघडत गेली. मध्यंतरी त्यांचा फोन आला आणि ते म्हणाले, 'मला जरा प्रवीण बर्दापूरकरांचा नंबर द्या बरं.' काळजात चर्रर्र झालं. मग त्यांना मीच बोलत असल्याची आठवण करून दिली. विधिमंडळात त्यांनी केलेल्या भाषणांचं पुस्तक प्रकाशित करायला पाठवण्यासाठी माझा पत्ता त्यांना हवा होता.

सुलोचनावहिनी गेल्यापासून ते खचले होते. नभातल्या चैतन्याचं दान मराठी कवितेला देणारे अरुवार मनाचेही महानोर आता त्याच नभात विलीन झालेले आहेत...

(अरुवार म्हणजे कोमल; नाजूक, मृदू, सुंदर, मऊ, हळुवार, सुकुमार, दाते शब्दकोश )

**– प्रवीण बर्दापूरकर**

praveen.bardapurkar@gmail.com




**प्रा. डॉ. अजय देशपांडे**

# सकारात्मक ऊर्जेचा निखळ झरा

**काही** माणसे सदासर्वदा प्रसन्न असतात. निराशा, उदासीनता हे शब्द त्यांच्या जवळपासही फिरकत नाहीत. या माणसांच्या मनात सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यविषयक, शैक्षणिक क्षेत्रांत कार्य करण्याची अभंग ऊर्जा असते आणि स्वच्छ पारदर्शक विधायक दृष्टिकोन असतो. विलक्षण संवेदनशील आणि कृतिशील असणारी ही माणसे सभोवतीच्या माणसांना आपल्या सकारात्मक विचारांनी जगण्याची ऊर्जा देत असतात. सकारात्मकता आणि मूल्यविचारांची अभंग ऊर्जा या माणसांचे सामर्थ्य असते. प्राचार्य मदन धनकर हे अशा ऊर्जेच्या सहस्रावधी शलाका आपल्या काळजात घेऊन फिरणारे सुसंस्कृत आणि मातृहृदयी शिक्षक, पत्रकार व लेखक होते. अलीकडेच (३० जुलै २०२३) त्यांचे दु:खद निधन झाले.

सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक पर्यावरणाची जाण आणि सर्व प्रवाहातील उत्तम ते स्वीकारण्याची समन्वयवादी विनयशीलता अंगी मुरलेली असल्याने प्राचार्य मदन धनकरांना सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रांत भरीव कामगिरी करता आली.



प्राचार्य मदन धनकर

प्राचार्य मदन धनकर या नावाने ते इतके प्रसिद्ध होते की पुरुषोत्तम हरीभाऊ धनकर हे त्यांचे मूळ नाव आजच्या काळात कुणाला ठाऊक असण्याची शक्यता कमीच आहे. चंद्रपूरसह विदर्भातील सांस्कृतिक-साहित्यिक क्षेत्रात ते निकोप व निरपेक्षवृत्तीने पन्नास वर्षांपेक्षा जास्त काळ कार्य करत होते. वाणी आणि लेखणीवर प्रभुत्व असणाऱ्या धनकरांजवळ संघटनकौशल्य उत्तम होते. वृथा अभिमान, अभिनिवेश त्यांच्या स्वभावात किंचितही नसल्याने त्यांनी निरपेक्ष भावनेने निखळपणे माणसे जोडली. संपर्कात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीशी त्यांचे सौहार्दपूर्ण नाते निर्माण होत असे. स्वार्थरहित संबंध जोपासता येत असल्याने राजकारण नसलेले सांस्कृतिक व साहित्यविषयक कार्य त्यांना मोकळेपणाने करणे शक्य झाले. प्राचार्य धनकरांवर मनापासून प्रेम करणारी माणसे भाषांची बंधने तोडून त्यांच्या कार्यक्रमांना, उपक्रमांना उपस्थित राहत होती. गर्दी जमवण्यासाठीचे सर्व प्रयत्न करूनही अनेक साहित्य संमेलनांच्या मंडपात रिकाम्या खुर्च्यांचेच दर्शन घडते, पण चंद्रपुरात प्राचार्य धनकरांनी आयोजित केलेल्या साहित्य संमेलनांमध्ये माणसांची संख्या एवढी की जागा अपुरी पडत असे. त्यांनी आपल्या लोकसंग्रहाचे रूपांतर कोणाच्याही राजकीय लाभासाठी जमवलेल्या गर्दीत कधी होऊ दिले नाही. उलट आपल्या आवाहनास प्रतिसाद देऊन येणाऱ्या माणसांच्या विधायक कृतिशीलतेचे आणि ज्ञानाभिरुचीचे सजग भान त्यांनी नित्य जोपासले. म्हणून निखळ बौद्धिक आनंद देणारे अनेक अभिनव उपक्रम त्यांनी राबवले.

मग ते १९७९ या वर्षीचे ५३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन असो की २०१२ या वर्षीचे ८५ वे अखिल

भारतीय मराठी साहित्य संमेलन असो, दोन्हीच्या आयोजनात प्राचार्य धनकरांनी अक्षरशः जीव ओतला होता. तब्बल पाच वेळा चंद्रपुरात विदर्भ साहित्य संघाची विदर्भ साहित्य संमेलने आयोजित करण्यात आली त्यातही प्राचार्य धनकर अग्रस्थानी होते. अगदी स्मरणिका संपादनापासून संमेलनातील अभिनव कार्यक्रमांची आखणी आणि ते पूर्णत्वास नेण्याची जबाबदारी आनंदाने पार पाडण्याची क्षमता केवळ त्यांच्याच अंगी होती. म्हणूनच साहित्यसंस्कृती महोत्सवासारखी आयोजनेही त्यांनी संमेलनांच्या थाटात पार पाडली. सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या 'स्नेहांकित' या संस्थेचे ते पंचवीस वर्षे अध्यक्ष होते. पंडित भीमसेन जोशी यांचे गाणे, अर्चना जोगळेकर यांचे नृत्य, हेमामालिनी यांच्या नृत्यसंचाचा कार्यक्रम, अष्टपैलू अभिनेते सचिन पिळगावकर यांचा कार्यक्रम अशा अभिनव आयोजनांसह कितीतरी उपक्रम त्यांनी राबविले. विदर्भ साहित्य संघाच्या केंद्रीय कार्यकारिणीत असतानाही त्यांनी अनेक मौलिक असे उपक्रम राबवले. नागपूर प्रदेश ग्रंथालय संघाचे सात वर्षे ते अध्यक्ष होते. लोकाग्रणी बळवंत राघव उपाख्य बाबासाहेब देशमुख प्रतिष्ठानचे ते उपाध्यक्ष होते. या संस्थेच्या वतीने 'चंद्रपूरभूषण' हा पुरस्कार महनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीला सन्मानपूर्वक प्रदान केला जातो. सांस्कृतिक-साहित्यिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांसह शैक्षणिक कार्य करणाऱ्या संस्थांशीही प्राचार्य धनकर यांचे निकटचे संबंध होते. सर्वोदय शिक्षण संस्था आणि सरदार पटेल मेमोरियल सोसायटी या दोन्ही संस्थांच्या जडणघडणीत आणि विकासात त्यांचे योगदान मोठे आहे. चंद्रपूरच्या सरदार पटेल महाविद्यालयाचे ते प्राचार्य होते. नागपूर विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य असताना विद्यापीठाच्या वतीने डॉ. वि.भि. कोलते यांच्या 'अजून चालतोचि वाट' या आत्मचरित्राचे संपादन-प्रकाशन त्यांनी केले.

अनेक पदांवर कार्य करत असतानाही त्यांच्यातील कार्यकर्तेपण कधी संपले नाही. खुर्चीवरच्या पदांची तमा त्यांनी बाळगली नाही. मानाची पदे, पुरस्कार यापेक्षा त्यांना माणसा-माणसांतील जिव्हाळा कायम ठेवणे जास्त महत्त्वाचे वाटत होते.

प्राचार्य धनकर यांच्या व्यक्तिमत्त्वात अनेक पैलू होते. शिक्षक, प्राध्यापक, प्राचार्य, पत्रकार, संपादक, लेखक, प्रकाशक, वक्ता, संघटक या आणि अशा कितीतरी रूपांत ते समाजात वावरत होते. या प्रत्येक रूपात ते लोकप्रिय होते. शांत, समंजस, सुसंस्कृत आणि संयमी प्राचार्य धनकर क्षमाशील आणि नम्र असलेले विद्याव्यासंगी होते. म्हणूनच एकाच वेळी अनेक पदांच्या अनेक जबाबदाऱ्या पार पाडणे त्यांना शक्य होत असे. ते मातृहृदयी शिक्षक होते तसेच समन्वयवादी कार्यकुशल प्रशासकही होते.

प्राचार्य धनकरांनी अनेक वर्षे पत्रकारिता केली. पत्रकार आणि पुढे संपादक म्हणून कार्यरत असताना विधायक अशा सामाजिक कार्यासाठी त्यांनी लेखणीचे सामर्थ्य उपयोगात आणले. जिज्ञासू पत्रकार सजग आणि विनयशील असतो. चतुरस्र संपादक लोकसंग्रही आणि विविध ज्ञानशाखांचा व्यासंगी असतो. हे सारे गुण अंगी असल्याने प्राचार्य धनकरांनी 'लोकमत' या वृत्तपत्रांत १९७१ मध्ये वार्ताहर म्हणून काम सुरू केले पुढे ते या वृत्तपत्राचे काही काळ संपादकही होते. चंद्रपुरात शांताराम पोटदुखे यांच्या 'भारती' साप्ताहिकात त्यांनी काम केले. नागपूरला वसंतराव लुले यांच्या 'चर्चा' या दिवाळी अंकाचे त्यांनी काही वर्षे संपादन केले. बंधू मोहन धनकर यांच्या 'हरिवंश' या साप्ताहिकाचे ते संपादक होते. हरिवंशमध्ये 'सहवास' या सदरातून त्यांनी आठशेपेक्षा जास्त व्यक्तिचित्रे लिहिली. विविध वृत्तपत्रांतून १५०० पेक्षा जास्त लेख लिहिले. प्राचार्य पदावरून सेवानिवृत्त झाल्यानंतर त्य ांनी हरिवंश प्रकाशन सुरू केले. मुद्रणदोषरहित अक्षरजुळवणी, मांडणी, सजावट, छपाई, मुखपृष्ठ असे सारे काही उत्तम असणाऱ्या हरिवंश प्रकाशनाने संग्राह्य पुस्तके प्रकाशित केली. प्रकाशन व्यवसायाचे अर्थकारण मात्र सेवाव्रती वृत्तीच्या प्राचार्य धनकरांना साधले नाही. माणसे जोडताना, माणसांची गुणवत्ता जोपासताना अर्थकारण फसले; पण सकस साहित्याचे निर्माण आणि जतन मात्र झाले. 'दिशादर्शक भाषणे' (आचार्य दादा धर्माधिकारी यांची भाषणे), 'तारासूक्त' (ताराबाई धर्माधिकारी यांच्या जीवन, विचार आणि कार्याचा वेध), 'शोध माणसांचा' (न्यायमूर्ती चंद्रशेखर धम ीधिकारी यांचे लेख), 'ना.रा. शेंडे व्यक्ती आणि वाङ्मय', डॉ. द.भि. कुळकर्णी अभिनंदन ग्रंथ या पुस्तकांसह अनेक मौलिक पुस्तके हरिवंश प्रकाशनाने प्रकाशित केली.




अनेक क्षेत्रांत सतत कार्यरत असणाऱ्या प्राचार्य धनकरांना स्वतःसाठीचे अर्थकारण साधता आले नाही, पण वाणी आणि लेखणी यांची न संपणारी श्रीमंती त्यांच्याजवळ होती. 'मंगलतोरण' हे त्यांचे एक पुस्तक हरिवंश प्रकाशनाने प्रकाशित केले आहे. राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज, मा.सां. कन्नमवार,

वि.वा. जोशी, साहित्यभूषण तु.ना. काटकर, साधनाताई आमटे, ताराबाई धर्माधिकारी, वा.स. अंदनकर, लक्ष्मणदास काळे, प्राचार्य राम शेवाळकर, मनोहर सप्रे, ग्रामगीताचार्य रामकृष्णदादा बेलूरकर, शांताराम पोटदुखे, सीमारक्षक वैज्ञानिक डॉ. अब्दुल बशीर या तेरा व्यक्तींच्या जीवन, विचार आणि कार्याचा वेध 'मंगलतोरण' या पुस्तकात घेतला आहे. या पुस्तकाच्या परिशिष्टात घेतलेला 'विदर्भातील कर्ती माणसं' हा लेखही संदर्भ म्हणून महत्त्वाचा आहे. 'मंगल तोरण' या पुस्तकाविषयी ज्येष्ठ साहित्यिक, समाजसेवक प्रा. ग.प्र. प्रधान लिहितात, ''या व्यक्तिचित्रांमधून प्राचार्य धनकर यांना विदर्भातील विविध क्षेत्रांतील मोठ्या माणसांबद्दल कसे प्रेम आहे हे दिसून येते. पश्चिम महाराष्ट्राला ही व्यक्तिचित्रे फार मार्गदर्शक ठरतील असे मला मनापासून वाटते. महाराष्ट्रातील माणसांना विदर्भातील या व्यक्तींचे मोठेपण दाखवणाऱ्या या लेखसंग्रहाबद्दल मी प्राचार्य धनकर यांना मनःपूर्वक धन्यवाद देतो,'' या शब्दांतून या पुस्तकाची मौलिकता कळते.

समाजकार्य, शैक्षणिक कार्य, वाङ्मयीन कार्य, संस्थात्मक कार्य करत असताना प्राचार्य धनकरांनी लोकशाही मूल्यांची जपणूक केली. गुणवत्तेला निखळ दाद देणारी निरपेक्ष वृत्ती आणि समर्पणशील सहिष्णुता अंगी असल्याने ते सांस्कृतिक क्षेत्रातील गटतटात आणि राजकीय पक्षांच्या साचेबद्ध चौकटीत कधीच अडकले नाहीत. उलट ते सदासर्वदा सर्वांचे जवळचे होते. केवळ प्रशंसक न राहता चांगल्या म्हणजे विधायक उपक्रमांत ते सक्रिय सहभागी झाले तर लोकशाही मूल्यांचा जागर करत सजग सकस लेखनाला, विचारांना त्यांनी निखळ दाद दिली. जमेल तसे लेखन केले आणि उत्तम लेखन जतन, संवर्धन करण्यासाठी प्रकाशन संस्थाही चालवली. चंद्रपूरला राहूनही संपूर्ण महाराष्ट्रासाठी मराठी भाषा आणि साहित्यासाठी निष्ठेने कार्य केले.

पाच दशकांहून अधिक काळ विविध क्षेत्रांत सक्रिय असताना निंदा, प्रतिकूल टीका, द्वेष, मत्सर, आरोप अशा अनेक गोष्टींचा सामना त्यांना करावा लागला, पण सर्वप्रकारच्या विरोधाचा सामना त्यांनी स्वार्थरहित विधायक कार्याने आणि अविचल सहिष्णुतेच्या निखळ वैचारिकतेने केला. विरोधकांच्या गुणवत्तेला दाद देण्याची प्रगल्भता असल्याने विरोधाच्या आणि द्वेषाच्या आगीतही प्राचार्य धनकरांच्या चतुरस्र व्यक्तिमत्त्वाचे वावन्नकशी सोने उजळून निघाले. आज प्राचार्य मदन धनकर यांच्यासारखी सोज्वळ, सुसंस्कृत ज्ञानी आणि सेवाव्रती ज्येष्ठ माणसे दुर्मिळ झाली आहेत.

चंद्रपूरसह पूर्व विदर्भातील सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, वाङ्मयीन, आणि संस्थात्मक चळवळींवर प्राचार्य मदन धनकर यांच्या विचारांचा, कार्यकुशलतेचा आणि निरपेक्ष सेवाभावी वृत्तीचा अमीट ठसा उमटला आहे.

**– प्रा. डॉ. अजय देशपांडे**

deshpandeajay15@gmail.com

ग्रंथाली

# वडिलोपार्जित

**डॉ. सतीश नाईक**




हे पुस्तक कालक्रमानुसार आणि विषयरचनेनुसार सूत्रबद्धतेने आयोजित केले आहे. यात जनुकांच्या इतिहासापासून सुरुवात होते आणि डॉक्टर सतीश नाईक अतिशय सोप्या व समजण्यायोग्य भाषेमध्ये याचे शास्त्र, संशोधन आणि आनुवंशिक रोग ह्याबद्दल माहिती देतात. ह्यामध्ये जीनोम, आनुवंशिक अभियांत्रिकी आणि रोगांसह जनुकांचा संबंध याबद्दलदेखील विस्तृतपणे लिहिले आहे. ह्या पुस्तकातील माहितीमुळे आरोग्य आणि रोगांबद्दल असलेल्या अनेक शंकाचे निरसन होईल.

**– डॉ. अविनाश सुपे**

**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत २०० रुपये**



संजीवनी खेर

# भावनिक गुंतागुंत कुशलतेने उलगडणारी लेखिका

**ग्लोकल** लेखिका ह्या सदराने साहित्य वाचकांत चांगलीच उत्सुकता निर्माण केली आहे. याद्वारे भारतातील इतर भाषांत कशा प्रकारचे वाङ्मय निर्माण होतंय, कुठले प्रश्न समाजाला विचारले जात आहेत. तेथे सामाजिक सुधारणा कधी झाल्या, स्त्रिया कधी लिहून व्यक्त होऊ लागल्या याचा अंदाज आपल्याला येऊ लागतो. भारतीय समाजातील लोक परदेशात जाऊन राहू लागले तेव्हा त्यांना तेथील जीवनशैलीशी ताळमेळ घालणे कसे अवघड गेले किंवा कसे, हे आपल्याला कळणार कसे? वास्तविक हा प्रश्न खास करून पहिली पिढी विदेशात नोकरीच्या निमिताने गेली त्या तरुण जोडप्यांना पडत होता. आपली वेशभूषा, आपले दिसणे, भाषा, सण, समारंभ सारेच भिन्न होते. अशा वेळी आपली वेगळी सांस्कृतिक ओळख टिकवून त्या समाजात मिसळणे किती अवघड जात होते. हे आपल्यापर्यंत आलेय ते डायस्फोरा लेखनातून. जगभरात हे स्थलांतरितांचे लेखन वाङ्मयात प्रतिष्ठा पावलेले आहे. विदेशात स्थिरावू पाहणाऱ्या लोकांना त्यांची मूळ माती हाकारत असते. त्याचे प्रतिबिंब साहित्यात पडत असते. तसेच स्वदेशात इतर प्रांतात राहायला गेलेल्या लोकांच्या बाबतही होत असते. ते आपली भाषा, सणवार नव्या शहरातही पाळत असतात. त्यामुळे त्यांना आपल्या मुळांबरोबर जोडलेले राहता येते. जे त्यांच्या भावनिक स्वास्थ्याच्या दृष्टीने अत्यावश्यक असते.

आज ज्या लेखिकेबद्दल लिहीत आहे ती आहे मूळची वंशाने बंगाली भारतीय. कोलकाता, ब्रिटन आणि नंतर अमेरिका असे तिच्या कुटुंबाचे स्थलांतर झालेले आहे. वास्तविक लेखिकेचे भारतात वास्तव्य कमीच होते. तरी घरातले वातावरण, भाषा यामुळे ती बंगाली परंपरांशी जोडलेली राहते. साहजिकच तिच्या लेखनात पात्रे येतात ती भारतीय आणि खास करून बंगाली जगात वावरणारी. निलांजना सुदेष्णा लाहिरी हे तिचे नाव. तुम्ही ही लेखिका कदाचित या नावाने




झुम्पा

ओळखली नसणार. ह्या नावावरून कुणी तिला ओळखणे शक्य नाही. बॉस्टनच्या शाळेतील शिक्षकांना आणि मुलांना हे एवढे अवघड नाव उच्चारता येणे कठीणच होते. अखेर तिच्या घरच्या नावाने, झुम्पा ह्या नावाने सगळे तिला ओळखू लागले. बहुतेक बंगाली घरात मुलांना टोपणनावे- लाडाने हाक मारण्याची नावे असतात. ती आपल्याला चमत्कारिक वाटतात. जसं डुगी, टुकटूकी इत्यादी तसेच ही झुम्पा.

झुम्पा ही आज इंग्रजीत लिहिणारी आघाडीची अमेरिकन लेखिका आहे. तिचा जन्म १९६७ मध्ये ११ जुलै रोजी लंडन

इथे झाला. मुळात तिचे आईवडील प्रथम कोलकात्याहून लंडनला रहायला गेले. जाताना बंगालीपण आपल्याबरोबर घेऊन गेले होते. झुम्पा दोन वर्षांची असताना आईवडील इंग्लंड सोडून अमेरिकेत ऱ्होडस आयलंडला किंग्जस्टन इथे राहू लागले. तिथे तिचे वडील विश्वविद्यालयाच्या वाचनालयात नोकरी करू लागले. झुम्पाला बालपणापासून इंग्रजी साहित्याची गोडी लागली. ती पुस्तकांच्या जगात रमली. बॉस्टन विद्यापीठाच्या बर्नार्ड कॉलेजमधून तिने बीएची पदवी संपादन केली. त्यानंतर तिने एमए केलं. नंतर क्रिएटिव्ह लेखनात एमएफए, तुलनात्मक साहित्यात दुसरी एमए पदवी मिळवली आणि पीएचडीसाठी तिने 'रेनेसाँ स्टडीज'चा अभ्यास करायचे ठरवले. त्यासाठी तिला दोन वर्षांची फेलोशिप मिळाली. रेनेसाँ काळातील स्थापत्याचा अभ्यास करण्याकरता ती रोममध्ये राहिली. ह्या दरम्यान तिला इटालियन भाषेची गोडी लागली. आणि ती त्या भाषेचा अभ्यास जोमाने करू लागली. त्या भाषेचा तिला इतका लळा लागला की ती चक्क त्या भाषेत ललितेतर लेखन करायचा विचार करू लागली. कुटुंबीयांना तिने रोममध्ये आपल्यासह राहायला बोलावून घेतले. रोमच्या जणू ती प्रेमातच पडली होती. इटालियन भाषेत तिने 'इन द आदर वर्ड्स' हे पुस्तक लिहिले. तिला तसेही विविध भाषांबद्दल आकर्षण होतेच. त्या त्या भाषिक परिवेशातील जगण्याच्या प्रकाराचे तिला प्रेम होते. त्यांच्या जगण्याच्या पद्धतीचे प्रतिबिंब तिच्या साहित्यात पडणे साहजिक होते. तरीही तिच्या लेखनाच्या केंद्रस्थानी भारतीय व्यक्तीच असतात. त्यांच्या मनातील द्वंद्व असते.




डॉक्टरेट केल्यावर तिने स्कूल ऑफ डिझायनिंगमध्ये अध्यापन केले. तिथे काम करताना तिची भेट प्रसिद्ध पत्रकार अल्बर्टो बुशशी झाली. दोघे प्रेमात पडले. २००१ मध्ये त्यांनी विवाह केला. त्यांना दोन मुले आहेत- ऑक्टव्हिया आणि नूर. त्यानंतर आता ती प्रिन्स्टन विद्यापीठात प्रोफेसर म्हणून कार्यरत आहे. डायस्फोरा हा साहित्यप्रकार बराचसा आपल्या गतआयुष्याच्या जीवनातील आठवणींनी कातर होऊन केलेलं लिखाण अशा जॉनरचा असतो. नवे हवेसे असते. पण जुने मनाला मागे खेचत असत. नव्या देशात जीवनाचा विकास, वैभव, मुक्त वातावरण असते तर जुने नातेवाईक आणि परंपरा असतात. जगभर विखुरलेल्या स्थलांतरित लोकांची ही तगमग ह्या प्रकारच्या लेखनातून वाचकांच्या समोर येते. तिची गाजलेली कादंबरी आहे, 'नेमसेक' तिच्यात स्थलांतरित कुटुंबाची ही देशविदेश विषयक ओढाताण अत्यंत प्रभावीपणे दाखवली आहे.

तिचा पहिला कथासंग्रह 'इंटरप्रिटर ऑफ मेलडीज'. ह्या कथासंग्रहाला प्रतिष्ठेचा पुलित्झर पुरस्कार मिळाला. त्यातील कथा वाचताना जाणवते की स्थलांतरिताची जी मानसिक फरफट होते ह्याचे मर्मग्राही वर्णन येते. साऱ्या वाटा बंद झाल्याची भावना मनाला कुरतडते. खाद्यपदार्थापासून प्रत्येक लहानसहान गोष्टी परदेशात गेलेल्या लोकांना त्रासदायक होतात, अस्वस्थ करतात.

झुम्पाची भाषा ही व्याकुळता समर्थपणे वाचकांपर्यत पोहोचवते. आपल्याला आठवते असेल, १९६०च्या सुमारास भारतातून युरोप, अमेरिकेत जाणारी मंडळी बहुधा सुशिक्षित, उच्चवर्णीय पण मध्यमवर्गीय असत. घरातल्यांची अपेक्षा असे की आपली मुले तिथे जाऊन खूप पैसा नि प्रतिष्ठा मिळवतील; पण अखेर इथेच परत येतील. 'आपले संस्कारच तसे आहेत' ह्याचा अभिमान असे. सुरुवातीला त्यांनाही तसेच वाटत असे. पण काही काळाने तिथले राहणेच किफायतशीर वाटू लागे नि स्वदेशात परतायचा विचार बारगळत जाई. मनात कुठेतरी अपराधी भावना असे. मूळ देशात जाणे कमी होत जाई. त्यातून परदेशात वाढलेल्या नव्या पिढीला भारतात येण्याचे आकर्षण मुळीच नसते. दर सुटीला भारतात जाऊन नातेवाईकांशी त्याच त्या गोष्टी बोलण्या-करण्यापेक्षा इतर देश पाहणे वा वेगळे काही करून पाहण्याची ओढ असे. त्यामुळे दोन पिढ्यांतील अंतर वाढत चालल्याची खंत, जाणीव आईवडिलांना होत असे. काय योग्य, काय अयोग्य कळणेच अवघड होत चालले होते. ह्या साऱ्या मानसिक आंदोलनाचे प्रतिबिंब झुम्पाच्या लेखनात येते. म्हणूनच आपण भारतीयांना आवडते नि विदेशस्थ नागरिकांना त्यांनी मूळ देश सोडून आल्यावेळच्या भावनांचे प्रत्यंतर येते. त्यामुळेच तिच्या कादंबरीवर वाचकांच्या उड्या पडतात.

तिला साहित्यजगातले अनेक पुरस्कार मिळाले आहेत. तिच्या दुसऱ्या संग्रहाला -'अॅनअॅकस्टम्ड अर्थ'ला न्यू यॉर्क टाइम्सच्या बेस्टसेलर यादीत स्थान मिळाले, तसेच 'फ्रंक ओ कॉनूर इंटरनॅशनल अॅवॉर्ड'च्या लघुकथा विभागात पुरस्कार मिळाला. टाइम्स, ऑउटलूक, न्यू यार्क टाइम्स ह्या बिनीच्या प्रकाशनांनी ह्या पुस्तकाला बुक ऑफ द इयर म्हणून गौरवले होते. ह्या तिच्या साहित्यकृतीमुळे 'पॅन अमेरिकन सेंटर'वर तिची नेमणूक केली गेली.

पुढे जाण्याआधी तिची मुलाखत ऐकू पाहूया.
https://www.youtube.com/watch?v=uESaWUpTKWEt=888s

अमेरिकन राष्ट्राध्यक्ष हे चांगले वाचक असल्याचे प्रत्यंतर अनेकदा आलेले आहे. बराक ओबामा आणि हिलरी क्लिंटन हे दोघे राजकारणी झुम्पाच्या लेखनाचे चाहते आहेत. ओबामांनी तिची नेमणूक अमेरिकन आर्ट्स अॅन्ड ह्युमेनिटीज या उच्च स्तरीय कमिटीवर केली. ह्यात पाच अमेरिकन साहित्यिक व कलाविद होते. २०१४ ला बराक ओबामा यांच्या हस्ते झुम्पा लाहिरीचा सन्मान करण्यात आला. माजी राष्ट्राध्यक्षांच्या वाचनयादीत तिचे पुस्तक असावे ही नक्कीच अभिमानाची बाब होती. त्यातल्या 'लोलँड' ह्या कादंबरीत नक्षलवादी चळवळीबद्दल लेखन आहे. त्याच वर्षी झुम्पाला बुकरचे नामांकन झाले होते. या काळात तिला नॅशनल ह्युमॅनिटीज पुरस्कार मिळाला. मुळात ह्या कादंबरीत बंगालमधील धगधगत्या काळाचे चित्रण आहे. मजुरांच्या कष्टाला न्याय मिळेना, धनकोंनी गरिबांची असह्य कोंडी करायला सुरुवात केली होती, आपल्यावरील अन्यायाविरुद्ध आपणच उभे राहिले पाहिजे, ह्या ऊर्मीतून हा लढा सुरू झाला होता, त्याचे चित्रण ह्या कांदबरीत आहे. ह्या कादंबरीचे आणि 'नेमसेक' ह्या कादंबरीचे थोडक्यात कथानक मी देत आहे. ते वाचून तुम्ही मूळ लेखनाच्या वाचनाकडे नक्की वळाल.

'नेमसेक' ही माझी अत्यंत आवडीची कादंबरी आहे. कथा कोलकात्यातून सुरू होते. अशीमा ही एका मध्यमवर्गातील तरुणी, घरातील मोठी माणसे तिचे लग्न अशोक ह्या उच्चशिक्षित इंजिनीयरशी ठरवतात. तो अमेरिकेत नोकरी करत असतो. तिला एका अपरिचित तरुणाबरोबर परदेशी जाण्याची कल्पना अस्वस्थ करत असते. परंतु घरातील लोकांचा मान ठेवत ती ह्या लग्नाला तयार होते. त्यानंतर लग्न होते आणि त्यांना मुलगा होतो. अशोकाची इच्छा असते की त्याच्या आवडत्या रशियन लेखकाचे, निकोलाय गोगोलचे नाव आपल्या मुलाला ठेवावे.  त्याचे नाव गोगोल ठेवले जाते. सर्वांनाच त्या नावाचे कुतूहल असते. त्यामागची लहानशी हकीगत असते ती म्हणजे, बाळाच्या जन्माअगोदर अशोक एका रेल्वे अपघातातून वाचतो, तो त्याच्या हातातून पडलेल्या गोगोलच्या पुस्तकाचे पान रेल्वे अधिकाऱ्यांना सापडते आणि त्याला शोधून बाहेर काढले जाते, यामुळे.

सारे अमेरिकेत असताना दरम्यान अशिमाचे आजोबा अचानक जातात. त्या गडबडीत बाळाच्या नावाची नोंद कोलकात्याहून येऊ शकत नाही, गहाळ होते. बाळाचे नाव गोगोलच राहते. पण त्याला समजायला लागल्यापासून त्याला आपल्या  नावाचा तिटकारा असतो. तो म्हणतो त्याचे खास भारतीय नाव असावे, जसे निखिल. गांगुली परिवार बॉस्टनमध्ये स्थायिक होतो. अशोकला तेथील विद्यापीठात इंजिनीयरिंग शिकवायाला नेमले जाते. त्यांनंतर त्यांना एक मुलगी होते, सोनिया.

तेथे राहतानाही हे सारे कुटुंब रोजच्या जगण्यात सारे रीतिरिवाज, सणसमारंभ बंगाली पद्धतीने साजरे करत असतात. तेथील बंगाली समुदायही वाढत असतो. इतर धर्मियांशी, विविध देशवासीय लोकांशी सतत कामाच्या आणि व्यवहाराच्या पातळीवर संपर्क येत असतो. तरी अशिमा आणि अशोकाला आपलेच कल्चर कसे श्रेष्ठ आहे ह्याचा अभिमान असतो. आणि ते दोन्ही मुलांना त्या संस्कारातच वाढवत असतात. गोगोलचा स्वत:च्या नावाबद्दलचा राग अशोकला जाणवत असतो. तो निकोलायचे पुस्तक लेकाला वाचायाला देतो. गोगोल ते घेतो पण वाचत नाही आणि अशोकही त्या पुस्तकाचे स्वत:च्या आयुष्यातले स्थान सांगता सांगता थांबतो.

आता त्यांचे वैभवाचे दिवस सुरू होतात. उपनगरात छानसे घर होते, मुले आपापले अभ्यासक्रम निवडून त्यात मग्न होतात. गोगोलची एकदोन प्रेमप्रकरणेही होतात; पण ती मोडतात. बहिणीचे लग्न होते. मुलगा विदेशी असतो. गोगोलला वडील एके दिवशी त्या पुस्तकाबद्दल सांगतात. पण त्याने ते अजून वाचलेले नसते. त्याने न्यू यॉर्कमध्ये आर्किटेक्चरला प्रवेश घेतलेला असतो. तिथे त्याचे मक्सीन नावाच्या श्रीमंत मुलीशी प्रेम जुळते. ते लग्न करतात. एकदा कामानिमित्त अशोक बाहेरगावी गेलेला असतो तो अशिमाला फोन करून आपल्याला जरासे बरे नसल्याचे सांगतो. ती काळजीत पडते. त्यानंतर बातमी येते ती त्याच्या हार्ट अॅटॅकने जाण्याची. अशिमा उद्ध्वस्त होते. गोगोलची धावपळ सुरू होते. तो आईच्या मदतीला धावतो. तिला स्थिरावण्यास मदत करू लागतो. पण, त्याच्या पत्नीला तो आपल्याकडे लक्ष देत नसल्याचे जाणवते. त्यांच्यात वाद होऊ लागतात नि ती दोघे विभक्त होतात. जे इथल्या बंगाली समाजाने इतरांच्या बाबत अनुभवलेले असते, पण आपल्या लोकांत, समाजात हे होईलसे वाटत नसते. पण काळ बदलासाठी थांबत नसतो.

अशिमा गोगोलची तिच्या नात्यातल्या मुलीशी, मौशमीशी ओळख करून देते. दोघांना सुरुवातीला अवघडल्यागत वाटत असते. दोघेही न्यू यॉर्कला असतात. हळूहळू दोघांना समान धागे जाणवू लागतात. दोघांच्या घरच्यांच्या संमतीने बंगाली पद्धतीने धूमधडाक्यात लग्न होते. ती फ्रेंच साहित्यात पीएचडी करीत असते. ती दोघे पॅरिसला जातात तेव्हा तिचे वागणे बदलते. तिचे क्षेत्र वेगळे कलाकार, साहित्यिकांचे असते. तिला तिच्या जुन्या मित्रमैत्रीणींचे जग पुन्हा हाकारू लागते. गोगोलला हे मुळीच पसंत नसते, पण ती स्वत:ला आवरू शकत नसते. दोघांतील अंतर वाढत जाते. ती नाकारत राहते, पण अखेरीस तो तिला व्यभिचार करताना पकडतो. दोघे वेगळे होतात.

तो परत न्यू यॉर्क येऊन काम करू लागतो. मुलगी, सोनिया जवळच राहत असते. तरी आईला आता बॉस्टनमध्ये चैन पडेनासे होते. ती सहा महिने भारतात आपल्या नातेवाईकांच्या सान्निध्यात आणि सहा महिने अमेरिकेत राहण्याचे ठरवते. निखिलला-गोगोलला- एकाकी वाटत असते. न्यू यॉर्कला परतल्यावर तो वडिलांनी दिलेले निकोलाय गोगोलचे पुस्तक वाचायला घेतो आणि त्याला वडिलांच्या मनातील त्या लेखकाबद्दलचा भाव आणि पुस्तकाबद्दलची आपुलकी जाणवू लागत. त्याचे डोळे भरून येतात. नि इथेच कांदबरी संपते.

कथानक सांगण्याच्या प्रयत्नात त्यातील नव्याने दुसऱ्या देशात जाणाऱ्यांची मानसिक आंदोलने, घालमेल नीट टिपता येत नाही; पण हरवल्यासारखे वाटणे, पायाखालची जमीन हरवणे काय असते ह्याची जाणीव लेखिका करून देते.

'लोलँड' ह्या कथेचा परिसर नक्षलवादी चळवळीचा आहे. कनू संन्याल आणि चारु मुजुमदार ह्या नेत्यांच्या संघटनेत हजारो तरुण सामील झाले होते. जिवावर उदार झालेले हे सुशिक्षित होते, बरेचसे सधन घरातले तरुणदेखील ह्या विचाराने भारावलेले होते. हा एक रक्तरंजित काळ होता. दोन भिन्न विचारांच्या भावातील संघर्ष आहे. तसेच, दोन भिन्न सामाजिक स्तरातील प्रेमीयुगुलाची हकीगत आहे. ब्रिटिश काळातील टॉलीगंज क्लबच्या तटबंदीबाहेर बांगलादेशी निर्वासितांची वस्ती होती. क्लबच्या बाजूच्या तलावापाशी मध्यमवर्गातील लोकांची वसती होती, जिथे मित्रा कुटुंब राहत होते. कसेबसे जगत होते. त्यांचे दोन हुशार मुलगेच त्यांची आशा आणि सामर्थ्य होते. सुभाष आणि उदयन. दोघे विश्वविद्यालयात शिकत होते. पदव्युत्तर पदवी घेऊन सुभाष अमेरिकेला जातो. उदयन मात्र तत्त्वासाठी सारे सोडून इथेच झुंजत राहतो. मित्राची बहीण गौरी ही तत्त्वज्ञान घेऊन शिकत असते. ती दोघे उच्च मध्यमवर्गातले असतात. गौरी उदयनाच्या प्रेमात पडते. दोघांच्या आर्थिक स्तरात खूप फरक असतो पण त्याकाळातील वैचारिक वादळात ती बेभानपणे त्याच्यासह कामात स्वत:ला झोकून देते. दोघे लग्नही करतात. उदयनबरोबर ती त्या वस्तीत राहू लागते. तो तिथेच बॉंब बनवत असतो. एके दिवशी पोलीस तलावात लपलेल्या त्याला खेचून घेऊन जातात आणि निर्घृणपणे ठार करतात.

गौरी हा आघात विसरू शकत नाही. सुभाष परत येतो. असहाय्य गौरीला तो आपल्याबरोबर अमेरिकेला घेऊन जायचं ठरवतो. तिच्याशी विवाह करून उदयनच्या बाळाची जबाबदारी घ्यायचे वचन देतो. आईवडिलांना हे सारे धक्केच असतात. सुभाष गौरीवर नवरेशाही गाजवत नाही. तिला आधार नि वेळ देतो, पण गौरी उदयनच्या विचारातून बाहेर येऊ शकत नाही. गौरीला लेक होते. सुभाष तिचे नाव बेला ठेवतो. बेला जरा मोठी झाल्यावर गौरी आपला अभ्यास पुन्हा सुरू करते. बेलाला ती वेळ देत नाही. सुभाष मात्र बेलात गुंतलेला असतो. गौरी नावापुरते पत्नीचे कर्तव्य निभावत असते. मुळातली हुशार असल्याने ती भराभर वर चढत जाते. बेलासाठी मात्र फक्त बाबाच असतात. पुढे त्याचे वडील गेल्यावर तो आणि बेला भारतात जातात, पण गौरी मात्र अभ्यासाचे निमित्त करून जात नाही. परत आल्यावर घरी एक चिठ्ठी असते. गौरी कॅलिफोर्नियाला नोकरी मिळाली म्हणून निघून गेलेली असते. तारुण्याच्या सीमेवरील बेला पार भांबावते. आईच्या वागण्याने प्रचंड दुखावली जाते. सुभाषही हरल्यासारखा वागू लागतो. त्याने सर्वतोपरी तिला आपलेसे केल्यावरदेखील असे वागावे तिने! इकडे बेलाची इतिहासाची शिक्षिका तिला हळुवारपणे समजावते. तिच्याशीच सुभाष पुढे जाऊन लग्न करतो.

बेला शिकते. घराच्या स्थितीने ती सैरभैर झालेली असते. अनेक अफेयर होऊनदेखील स्थिरावत नाही. एका मुलीला जन्म देते. तिचे नाव मेघना ठेवते. सुभाष गौरीला सारे कळवतो, ती मेघना नि बेलाला भेटायला उत्सुक असते; पण बेला नकार देते. मेघना थोडी मोठी झाल्यावर ती आजीशी भेट घडवते. आयुष्यभराच्या अनुभवाने थकलेली गौरी मित्रा कुटुंबाला भेटायला कोलकात्याला जाते. घरात उदयनची आई एकटीच राहत असते. तिथे गेल्यावर तिला तिचे सर्वस्व गमावलेले क्षण आठवत असतात. डोळ्यांसमोर झालेला उदयनचा एन्काऊंटर आठवत असतो...

झुम्पाचे लेखनकौशल्य दाखवणाऱ्या ह्या कांदबऱ्या/ वाचकाला पुस्तकाशी खिळवून ठेवतात. नक्की आणून वाचा.

**– संजीवनी खेर**

sanjeevanikher@gmail.com

॥ग्रंथाली॥

# अलवार

**ऋग्वेद**



कवितासंग्रह

**मूल्य २०० रु.**

**सवलतीत १२० रु.**



शरद काळे

# दुर्मिळ मूलद्रव्यांचे प्रश्न

**इलेक्ट्रॉनिक** क्षेत्रात आणि माहितीयुगासाठी आवश्यक असलेल्या उपकरणांमध्ये जी दुर्मिळ मूलद्रव्ये वापरली जातात, त्या मूलद्रव्यांच्या पुनर्चक्रांकनाचा प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे, कारण ही मूलद्रव्ये दुर्मिळ या सदरात मोडत असल्यामुळे त्यांचे नैसर्गिक स्रोत अगदीच मर्यादित आहेत. ज्या तऱ्हेने बाजारात नवनवीन मोबाइल संगणक आणि यंत्रमानव येत आहेत, तसतसा त्यांचा तुटवडा वाढत जाणार आहे. त्यामुळे इलेक्ट्रॉनिक कचरास्रोतही सर्वात गहन समस्या झाली आहे. दुर्मिळ मूलद्रव्यांसाठी वर्तुळाकार अर्थव्यवस्था कशी तयार करावी? स्वच्छ ऊर्जातंत्रज्ञानासाठी महत्त्वाच्या असलेल्या दुर्मिळ मूलद्रव्यांवर ईर्ष्येने लढा दिला जातो. पुनर्चक्रांकन आणि पुनर्प्राप्तीला प्रोत्साहन देण्यासाठी धोरणे आणि कार्यक्रम या क्षेत्रातील तणाव कमी करू शकतात.

ऑगस्ट १९७६ मध्ये भाभा अणुशक्ती केंद्रात माझी निवड झाली, तेव्हा मुंबईत मी प्रथमच जात होतो. माझ्याबरोबर निवड झालेले बहुतेक प्रशिक्षणार्थी हे मुंबईबाहेरचे होते. भाभा अणुशक्ती केंद्रात जाण्यासाठी त्यावेळी केंद्राच्या अनेक बस मुंबईच्या विविध भागांतून जा-ये करण्यासाठी उपलब्ध होत्या. करड्या रंगाच्या या बस सर्वत्र दिसत, त्यातील काही बसवर इंडियन रेअर अर्थ असे लिहिलेले होते. इंडियन रेअर अर्थ हा विभाग अणुशक्ती केंद्रातच त्याच्या दक्षिण दरवाजापाशी आहे, असे आम्हाला नंतर समजले. त्या वेळपर्यंत रेअर अर्थ म्हणजे काय असते, त्याचा नेमका अर्थ कोणता, याची पुसटशी कल्पनादेखील मला नव्हती. रेअर अर्थ ही मूलद्रव्येच आहेत हे मला तेव्हा समजले! कदाचित आजच्यासारखे माहितीचे भांडार त्यावेळेला सर्वत्र उपलब्ध नसल्यामुळे आपला विषय सोडून इतर विषयाची मूलभूत माहिती सहजपणे मिळण्याची सोय छोट्या गावांमध्ये तेव्हा नव्हती. पदार्थसारणी (पिरिऑडिक टेबल) आम्ही रसायनशास्त्राच्या प्रयोगशाळेत पाहिली होती, पण त्यातील सर्वच नावे आमच्या परिचयाची नव्हती. कदाचित ही सर्व मूलद्रव्ये त्यावेळी नजरेखालून गेली असतीलदेखील, पण त्यांचा आणि आपला काही प्रत्यक्ष संबंध आहे, हे मात्र कधी जाणवले नाही. त्यातील हायड्रोजन, ऑक्सिजन, नायट्रोजन, फॉस्फरस, कार्बन, सल्फर, लोखंड, सोडियम, पोटॅशियम, मॅग्नेशियम, क्लोरीन, ब्रोमीन इत्यादी ४०-५० नावे नुसतीच परिचयाची नव्हती, तर त्यांचे उपयोग माहीत होते. परंतु सारणीत असलेल्या ११८ मूलद्रव्यांपैकी बाकीच्या मूलद्रव्यांबद्दल मात्र मनात कुतुहूलसुद्धा निर्माण झाले नव्हते. कदाचित इतर विषयांमध्ये रस न घेण्याचा हा परिणाम असेल. असो.

दुर्मिळ मूलद्रव्यांच्या व्याख्येनुसार हा सतरा धातूघटकांचा संच आहे. यामध्ये पदार्थसारणीमधील पंधरा लॅन्थॅनाइड आणि स्कॅंडियम आणि यीट्रियम यांचा समावेश होतो. ज्या १५ लँथेनाइड मूलद्रव्यांचा यात समावेश होतो ते असे आहेत: सिरियम (Ce), लँथेनम (La), प्रसिवडायमियम (Pr), निओडायमियम (Nd), प्रोमेथियम (Pm), समेरियम (Sm), युरोपियम (Eu), गॅडोलिनियम (Gd), टरबियम (Tb), डिस्प्रोसियम (Dy), होलमियम (Ho), एरबियम (Er), थुलियम (Tm), येटरबियम (Yb), ल्यूटेलियम (Lu). ही सर्व दुर्मिळ मूलद्रव्ये २०० पेक्षा जास्त प्रचलित उत्पादनांचे आवश्यक घटक आहेत. त्यांच्या उपकरणांच्या विस्तृत श्रेणीमध्ये सेल्युलर टेलिफोन, संगणक हार्ड ड्राइव्ह, इलेक्ट्रिक व हायब्रीड वाहने आणि फ्लॅट-स्क्रीन मॉनिटर आणि टेलिव्हिजन यांसारख्या उच्च-तंत्रज्ञानावर आधारित ग्राहकोपयोगी उत्पादनांचा समावेश होतो. तसेच, महत्त्वाच्या संरक्षण उपकरणांमध्ये इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले, मार्गदर्शन प्रणाली, ड्रोन, यंत्रमानव, लेसर आणि रडार आणि सोनार प्रणाली यांचा समावेश होतो. उत्पादनामध्ये वापरलेल्या दुर्मिळ मूलद्रव्यांचे प्रमाण वजन, मूल्य किंवा आकारमानानुसार त्या उत्पादनाचा महत्त्वपूर्ण किंवा मोठा भाग असू शकत नाही, तरीही ही मूलद्रव्ये उपकरणांचे कार्य चालण्यासाठी अत्यावश्यक असतात. उदाहरणार्थ, या

मूलद्रव्यांचे बनलेले चुंबक बहुतेक वेळा उपकरणाच्या एकूण वजनाचा अगदी लहानसा अंश दर्शवतात, परंतु त्यांच्याशिवाय, डेस्कटॉप आणि लॅपटॉपच्या स्पिंडल मोटर आणि व्हॉइस कॉइल यांचे कार्य चालूच शकत नाही.

दुर्मिळ मूलद्रव्यांचे प्रमुख स्रोत म्हणजे बास्टनासाइट, मोनाझाइट आणि लोपाराइट आणि लॅटरिटिक आयन-शोषण चिकणमाती हे आहेत. दुर्मिळ मूलद्रव्ये हा १७ घटकांचा गट तुलनेने, दुर्मिळ म्हटले असले तरी, बऱ्यापैकी विपुल नैसर्गिक स्रोत असलेला आहे. दुर्मिळ मूलद्रव्यांचे मूलभूत स्वरूप पाहिले तर ते लोखंडी राखाडी ते चांदीसारखे चमकदार धातू असतात. जे सामान्यत: मऊ आणि लवचीक असतात आणि सामान्यत: प्रतिक्रियाशील असतात, विशेषत: उच्च तापमानाला किंवा बारीक पावडर केली तर या दुर्मिळ मूलद्रव्यांचे विलक्षण गुणधर्म विविध प्रकारच्या उपकरणांमध्ये वापरले जातात.

जगातील दुर्मिळ मूलद्रव्यसाठ्यापैकी ६ टक्के भारतामध्ये आहेत. आपल्या देशात जागतिक उत्पादनाच्या केवळ १ टक्का उत्पादन केले जाते. चीनमधून अशा खनिजांच्या बहुतेक गरजा पूर्ण केल्या जातात. दुर्मिळ मूलद्रव्य घटक भारतीय अर्थव्यवस्थेत सुमारे २०० अब्ज डॉलर्सचे एकूण योगदान देतात. २०१८-१९ मध्ये, मूल्यानुसार ९२ टक्के दुर्मिळ धातू आणि ९७ टक्के प्रमाण चीनमधून आयात करण्यात आली. लॅन्थॅनम, सेरियम, निओडायमियम, प्रसिवडायमियम आणि समेरियम यासारखी काही दुर्मिळ मूलद्रव्ये भारतात उपलब्ध आहेत. डिस्प्रोसियम, टरबियम, आणि युरोपियम यांसारखी आर्थिक दृष्ट्या फायदेशीर ठरतील अशा इतकी येण्याजोग्या प्रमाणात भारतीय साठ्यांमध्ये उपलब्ध नाहीत. भारतात, मोनाझाइट आणि थोरियम हे दुर्मिळ मूलद्रव्यांचे प्रमुख स्रोत आहेत. दुर्मिळ मूलद्रव्यांसाठी इंडियन रेअरचा अर्थ हा भारत सरकारचा उपक्रम आहे. KMML हा केरळ राज्य सरकारचा उपक्रम प्लेसर डिपॉझिटमधून समुद्रकिनाऱ्यावरील वाळूच्या खनिजांचे उत्खनन आणि प्रक्रिया करतो.

काही मूलद्रव्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर स्वच्छ ऊर्जा आणि संरक्षण तंत्रज्ञानामध्ये केला जातो. स्मार्टफोनच्या डिस्प्ले ते स्टेडियम स्कोअरबोर्डपर्यंतच्या आकारमानाच्या स्क्रीनमध्ये विशिष्ट मूलद्रव्यांचा वापर वैयक्तिक रीतीने किंवा एकत्रितपणे फॉस्फोर्स बनवण्यासाठी केला जातो. हे फॉस्फोर्स पदार्थ ल्युमिनेसेन्स म्हणजे स्फुरदीप्ती असतात. ते अनेक प्रकारच्या किरणांच्या नलिका (ट्यूब) आणि फ्लॅट पॅनेल डिस्प्लेसाठी वापरतात. LED लाइटिंगसाठी यिट्रीअम, युरोपियम आणि टर्बियम फॉस्फर हे लाल-हिरवे-निळे फॉस्फर वापरले जातात. अनेक लाइट बल्ब, पॅनेल आणि टेलिव्हिजनमध्ये त्यांचा उपयोग केला जातो. काचउद्योग हा दुर्मिळ मूलद्रव्यांच्या कच्च्या मालाचा सर्वात मोठा ग्राहक आहे. काचेच्या पॉलिशिंगसाठी आणि त्यात मिसळण्यासाठी यातील बरीच मूलद्रव्ये वापरतात. ही मूलद्रव्ये रंग आणि विशेष प्रकाशीय गुणधर्म बहाल करतात. मोबाईल फोन कॅमेऱ्यांसह ५० टक्के अंकीय कॅमेरा भिंगे लॅन्थॅनमपासून बनवतात. लॅन्थॅनम-आधारित उत्प्रेरकांचा वापर पेट्रोलियम शुद्ध करण्यासाठी केला जातो. सिरियमआधारित उत्प्रेरकांचा वापर ऑटोमोटिव्ह उत्प्रेरक कन्व्हर्टरमध्ये केला जातो. दुर्मिळ मूलद्रव्यांचा वापर चुंबकांमध्ये वेगाने वाढत आहे. निओडीमियम-लोह-बोरॉन चुंबक हे ज्ञात असलेले सर्वात मजबूत चुंबक आहे. विशेषतः जेव्हा चुंबकासाठी जागा आणि वजन हे मर्यादित असतात, तेव्हा हे दुर्मिळ मूलद्रव्ययुक्त चुंबक उपयुक्त ठरतात. दुर्मिळ मूलद्रव्ययुक्त चुंबक संगणक हार्ड डिस्क आणि सीडी रॉम आणि डी.व्ही.डी. डिस्क ड्राइव्हमध्ये वापरले जातात. डिस्क ड्राइव्हचा स्पिंडल दुर्मिळ मूलद्रव्ययुक्त चुंबकाद्वारे चालवल्यास त्याच्या फिरत्या गतीमध्ये उत्तम दर्जाची स्थिरता देतो. हे चुंबक विविध पारंपरिक ऑटोमोटिव्ह उपप्रणालींमध्येदेखील वापरले जातात, पॉवर स्टीअरिंग, इलेक्ट्रिक विंडो, पॉवर सीट आणि ऑडिओ स्पीकर यामध्ये दुर्मिळ मूलद्रव्ये वापरली जातात. निकेल-मेटल हायड्राइड बॅटरीमध्ये लॅन्थॅनमआधारित मिश्रधातूंचा ॲनोड म्हणून वापर केला जातो. हा बॅटरीप्रकार हायब्रीड इलेक्ट्रिक कारमध्ये वापरला जातो तेव्हा त्यात लक्षणीय प्रमाणात लॅन्थॅनम वापरावे लागते. प्रती इलेक्ट्रिक वाहन १० ते १५ किलोग्रॅम लॅन्थॅनम त्यासाठी आवश्यक असते. स्टील मिश्र धातू मिश्मेटलमध्ये सेरियम, लॅन्थॅनम, निओडायमियम आणि प्रसिवडायमियम (सामान्यत: मिश्रित ऑक्साइडच्या स्वरूपात) वापरतात, स्टीलच्या निर्मितीमध्ये अशुद्धता काढून टाकण्यासाठी आणि विशेष मिश्र धातूंच्या निर्मितीमध्ये त्यांचा वापर होतो.

सन १९९३मध्ये, दुर्मिळ मूलद्रव्यांचे ३८ टक्के जागतिक उत्पादन चीनमध्ये होते, ३३ टक्के अमेरिकेत होते, १२ टक्के ऑस्ट्रेलियामध्ये होते आणि प्रत्येकी पाच टक्के मलेशिया आणि भारतात होते. ब्राझील, कॅनडा, दक्षिण आफ्रिका, श्रीलंका आणि थायलंडसह इतर अनेक देशांनी उर्वरित ७ टक्के उत्पादन केले. तथापि, सन २००८ मध्ये, दुर्मिळ मूलद्रव्यांच्या जागतिक उत्पादनात चीनचा वाटा ९० टक्क्यांहून अधिक होता आणि सन २०११ पर्यंत चीनचा जागतिक उत्पादनात ९७ टक्के वाटा होता. सन १९९०च्या सुरुवातीस आणि त्यापुढील काळात दुर्मिळ मूलद्रव्यांचा पुरवठा हा एक मुद्दा बनला, कारण चीन सरकारने या मूलद्रव्यांचे उत्पादन आणि निर्यात करण्यास परवानगी असलेल्या प्रमाणात बदल करण्यास सुरुवात केली. चीन सरकारने चीनमधून दुर्मिळ मूलद्रव्ये निर्यात करू शकतील अशा चिनी आणि चीन-विदेशी संयुक्त-उद्यम कंपन्यांची संख्या मर्यादित करण्यास सुरुवात केली.




**दुर्मिळ मूलद्रव्यांच्या क्षेत्रातील जागतिक स्तरावर आणि भारतासाठी प्रमुख चिंता**

भारत या खनिजांचा शोध आणि उत्पादन करू शकत नसेल, तर त्याला विद्युत वाहनांवर ऊर्जासंक्रमण योजना राबवण्यासाठी चीनसह इतर देशांवर अवलंबून राहावे लागेल. खनिज सुरक्षा भागीदारी गटात भारताला स्थान मिळाले नाही याचे कारण म्हणजे आपल्या देशाने अजूनपर्यंत त्या क्षेत्रातील कोणतेही कौशल्य प्रत्यक्षात आणलेले नाही. ही दुर्मिळ मूलद्रव्ये त्यांच्या नावापेक्षा जास्त मुबलक असली तरी ती खाणीतून मिळवणे जिकिरीचे असून ते खर्चीकही आहे. यावर स्वच्छ प्रक्रिया करण्याची क्षमता मोजक्या लोकांची मक्तेदारी आहे. काही राष्ट्रांमध्ये असलेले दुर्मिळ मूलद्रव्यांचे बहुतेक साठे मूठभर देशांच्या हातात केंद्रित झाल्यामुळे बहुतेक जगासाठी समस्या निर्माण होतात. पुरवठासाखळीमध्ये स्रोत एका देशापुरता मर्यादित असतो तेव्हा पुरवठासाखळीमध्ये समस्या निर्माण होतात. पर्यावरणीय प्रभाव ही मुख्य चिंतेची बाब असून दुर्मिळ मूलद्रव्यांचे घटक, खनिज ठेवींमध्ये निम्न-स्तरीय किरणोत्सर्गी घटक थोरियमशी जोडलेले आहेत, ज्याच्या संपर्कात आल्याने फुप्फुसाचा, स्वादुपिंडाचा आणि इतर कर्करोग होण्याचा धोका वाढतो. खाणकाम आणि उत्खनन प्रक्रिया भांडवल-केंद्रित असतात आणि मोठ्या प्रमाणात ऊर्जा वापरतात. या खनिजांच्या उत्खननामुळे पर्यावरण आणि मानवी आरोग्यासाठी हानिकारक विषारी उप-उत्पादने बाहेर पडतात.

निव्वळ शून्य कार्बन उत्सर्जनाच्या शर्यतीला सामर्थ्य देणाऱ्या अनेक तंत्रज्ञानांमध्ये दुर्मिळ मूलद्रव्ये हा एक प्रमुख रासायनिक घटक आहे. सूर्यप्रकाशाचे कार्यक्षमतेने विद्युतशक्तीमध्ये रूपांतर करण्यासाठी सौरपटले वापरले जातात, त्यात निओडीमियम, डिस्प्रोसियम आणि टर्बियम ही दुर्मिळ मूलद्रव्ये वापरतात. प्रकाश-उत्सर्जक डायोड त्यांच्या दिप्ती-मानतेसाठी युरोपियम आणि डिस्प्रोसियमवर अवलंबून असतात. पवनचक्कीच्या पात्यांसाठी आणि इलेक्ट्रिक मोटरमध्ये वापरल्या जाणाऱ्या शक्तिशाली चुंबकांमध्ये निओडीमियम आणि सॅमेरियम हे घटक वापरतात. दुर्मिळ मूलद्रव्यांची मागणी जगभरात वेगाने वाढत आहे. उदाहरणार्थ, अमेरिकेच्या ईशान्येकडील सुमारे ९०० घरांना पुरवण्यासाठी एक मेगावॉट पवनऊर्जा निर्माण करावी लागते. यासाठी १७० किलो हे दुर्मिळ घटक लागतात. या घटकांचा जागतिक वापर सन २००५ मध्ये सुमारे ६०००० टनांवरून, सन २०२२मध्ये दोन लाख टनांवर गेला आहे आणि सन २०३० मध्ये तीन लाख पंधरा हजार टनांपर्यंत म्हणजे दुपटीहून अधिक वाढण्याचा अंदाज आहे. तरीही त्यांची उपलब्धता मर्यादित आहे. चीन, अमेरिका आणि रशिया ५६ टक्के जागतिक दुर्मिळ मूलद्रव्यांचा साठा आणि ७६ टक्के उत्पादन नियंत्रित करतात. एक दशकाहून अधिक काळ, भौगोलिक राजकारण, कोविड-१९ साथीच्या आजारानंतर आणि आता युद्धामुळे जागतिक दुर्मिळ मूलद्रव्यांची पुरवठासाखळी विस्कळीत झाली आहे आणि किंमती अस्थिर झाल्या आहेत. सन २०२० आणि २०२१ मध्ये, काही दुर्मिळ मूलद्रव्यांच्या किमती जवळपास एक दशकाच्या सापेक्ष स्थिरतेनंतर तिप्पट ते पाचपट झाल्या आहेत.

दुर्मिळ मूलद्रव्ये संसाधनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी काही देशांमध्ये इतर राष्ट्रांना पिळून काढण्यासाठी भू-राजकीय स्पर्धा सुरू आहे! दुर्मिळ मूलद्रव्यबाजार हा एक 'शून्य बेरीज' खेळ आहे, ज्यामध्ये एका देशाचा किंवा कंपनीचा फायदा दुसऱ्याचा तोटा आहे, कोणालाही त्यात निव्वळ फायदा होत नाही. अमेरिका आणि युरोपमधील हरित उद्योगांना या महत्त्वपूर्ण सामग्रीच्या कमतरतेचा सामना करावा लागत आहे, कारण ते राजकीय कारणांमुळे चीन आणि रशियाकडून आयात करत नाहीत. अनेक राष्ट्रे या दुर्मिळ मूलद्रव्यांच्या शोधासाठी देशांतर्गत उत्खनन आणि खाणकामाला चालना देत आहेत, तर आयातीचे स्रोत मर्यादित करत आहेत. उदाहरणार्थ, सन २०२२ मध्ये, अमेरिकेच्या संरक्षण विभागाने (DoD) लास वेगास, नेवाडा येथे असलेल्या एम.पी. मटेरियल कॉर्पोरेशनला ३.५कोटी डॉलरचे कंत्राट दिले आहे. ही कंपनी कॅलिफोर्निया उत्पादन साइटवर जड दुर्मिळ-मूलद्रव्ये घटकांवर प्रक्रिया करणार आहे. जानेवारी २०२३ मध्ये, स्वीडनच्या सरकारी मालकीच्या खाण एल.के.ए.बी. कंपनीने घोषणा केली की त्यांना युरोपमधील दुर्मिळ मूलद्रव्यांचा सर्वात मोठा साठा सापडला आहे. दुर्मिळ मूलद्रव्यांच्या बाजारपेठादेखील विखुरलेल्या आणि अकार्यक्षम

आहेत. हे घटक विशिष्ट वस्तू आहेत, उदाहरणार्थ, स्टील किंवा ॲल्युमिनियम उत्पादन नियंत्रित करणाऱ्या मोठ्या समूहांऐवजी लहान आणि मध्यम आकाराच्या, मुख्यतः सरकारी मालकीच्या व्यवसायांद्वारे, उत्पादित केल्या जातात आणि वापरल्या जातात. स्मार्टफोनसारख्या अनेक तंत्रज्ञानासाठी दुर्मिळ मूलद्रव्ये आवश्यक आहेत, तरीही दुर्मिळ मूलद्रव्यांचे जागतिक बाजारपेठेतील मूल्य कच्च्या पेट्रोलियम वस्तूंमध्ये असलेल्या गुंतवणुकीच्या केवळ ०.१८ टक्का इतके आहे. त्यामुळे या मूलद्रव्यांमध्ये गुंतवणूक करण्यास फारसे कुणी राजी होत नाही. म्यानमारसारख्या जगाच्या काही भागांत, दुर्मिळ मूलद्रव्यांचा बेकायदेशीरपणे व्यापार केला जातो. या विषयात आणखी एक गुंतागुंत अशी आहे की ही दुर्मिळ मूलद्रव्ये थेट खनन करून काढली जात नाहीत, तर लोह किंवा बॉक्साईटसारख्या इतर प्रकारच्या खाणकामांची उप-उत्पादने असतात. तरीही बराच व्यवहार्य खाणस्रोत प्रक्रिया न करताच फेकून दिला जातो. दुर्मिळ मूलद्रव्यांची मूल्यशृंखला मोठ्या प्रमाणात ऊर्जा आणि पाणी वापरते आणि प्रदूषके आणि कार्बन उत्सर्जन करते. एक किलोग्रॅम दुर्मिळ मूलद्रव्ये ऑक्साइड शुद्ध करण्यासाठी ४०-११० किलोग्रॅम कार्बन डायऑक्साइड पर्यावरणात सोडला जातो. एक टन दुर्मिळ मूलद्रव्यांचे ऑक्साइड शुद्ध केल्याने १.४ टन किरणोत्सर्गी कचरा, २००० टन कचरासामग्री आणि १००० टन जड धातूचे अंश असलेले सांडपाणी तयार होऊ शकते.

पर्यावरणाची हानी न करता वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी, दुर्मिळ मूलद्रव्यांच्या उद्योगाचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. दुर्मिळ मूलद्रव्यांच्या उद्योगासाठी जागतिक वर्तुळाकार अर्थव्यवस्था तयार करून कुणाचाच नफा किंवा नुकसान होणार नाही ह्यासाठी जे अग्रक्रम देण्यासारखे उपाय आहेत, ते असे-

**जागतिक स्तरावर दुर्मिळ मूलद्रव्यांच्या पुनर्वापराला चालना द्या**

वापरात असलेल्या दुर्मिळ मूलद्रव्यांपैकी फक्त १ टक्का घटक सध्या पुनर्वापर केले आहेत. त्यातूनही स्पष्टपणे फायदे होतात. उदाहरणार्थ, खाणीतून निओडीमियम काढण्यासाठी आवश्यक असलेल्या ऊर्जेच्या अर्ध्याहून कमी (३५ टक्के) ऊर्जा वापरून, कार्यकाळ संपलेल्या चुंबकांपासून निओडीमियमचा पुनर्वापर करण्यासाठी ते मिळवता येते आणि त्यावेळी कमी प्रमाणात विषारी पदार्थ पर्यावरणात सोडले जातात. दुर्मिळ मूलद्रव्यांचा इतका कमी पुनर्वापर का केला जातो, याचे प्रमुख कारण असे आहे, की जगात कुठेही वापरलेल्या उत्पादनांमधून या मूलद्रव्यांचा पुनर्वापर करण्यासाठी कोणतीही ठोस धोरणे किंवा कार्यक्रम नाहीत. तुलनेने मोठ्या प्रमाणातील दुर्मिळ मूलद्रव्ये असलेल्या इलेक्ट्रिक कारच्या बॅटऱ्या आणि वाऱ्यावर चालणाऱ्या गिरण्यांमधील चुंबक, अजूनही वापरात आहेत आणि अजून बरीच वर्षे ते कार्यरत राहणार आहेत. दुर्मिळ मूलद्रव्ये पुनर्चक्रांकन तंत्रज्ञानदेखील अपरिपक्व अवस्थेत असून आर्थिकदृष्ट्या सध्यातरी अशक्य या सदरात मोडणारे आहे. इतर प्रकारच्या कार्यकाळ संपलेल्या सामग्रीचे व्यवस्थापन करण्यासाठी जे नियामक कार्यक्रम आणि जी धोरणे अस्तित्वात आहेत, त्याच धर्तीवर दुर्मिळ मूलद्रव्यांसाठी ध्येयधोरणे तयार केली जाऊ शकतात. उदाहरणार्थ, युरोप आणि चीनमध्ये उत्पादकांना इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा कचरा परत घेण्यास भाग पाडण्यासाठी कायदा केला आहे. परंतु पुनर्वापर आणि पुनर्वापराच्या चक्रीय अर्थव्यवस्थेला पाठिंबा देण्याऐवजी या धोरणांचा मुख्य उद्देश म्हणजे पारा, कॅडमियम आणि शिसे यांसारख्या घातक कचऱ्याचे व्यवस्थापन करणे हाच आहे, असे दिसते. इलेक्ट्रिकल उपकरणांसाठीच्या पुनर्वापराचे नियम अद्याप याच कारणास्तव इलेक्ट्रिक-वाहन बॅटरी आणि कायमचे चुंबक यांच्यासाठी लागू केले जात नाहीत.

जगभरातील सरकारांनी दुर्मिळ मूलद्रव्य असलेल्या उत्पादनांसाठी अनिवार्य असलेले परत घेण्याचे (टेक बॅक) धोरण स्वीकारले पाहिजे. आणि दुर्मिळ मूलद्रव्ये असलेल्या उत्पादनांवर प्रक्रिया करण्यासाठी परवानाधारक पुनर्चक्रांकन कंपन्यांचे जाळे तयार केले पाहिजे. दुर्मिळ मूलद्रव्यांसाठी अनिवार्य पुनर्चक्रांकन दर किंवा पुनर्नवीनीकरण-सामग्री आवश्यकता ठरवणे आणि लागू करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, युरोपीय कमिशनने सन २०३० पर्यंत युरोपीयन युनियनमधील दुर्मिळ मूलद्रव्यांच्या वापराच्या १५ टक्के दुय्यम स्रोतांद्वारे समाविष्ट करणे आवश्यक असलेला कायदा पास केला आहे. पुनर्चक्रांकन सुविधा नसलेल्या देशांमधून दुर्मिळ मूलद्रव्ये असलेली उत्पादने गोळा करण्यासाठी जागतिक करारांची आवश्यकता आहे. उत्पादकांना आणि इतरांना उत्पादनांमधील दुर्मिळ मूलद्रव्यांचे प्रकार आणि प्रमाण समजण्यास मदत करण्यासाठी उत्पादनांबाबत जागतिक मानकाशी देखील सरकारांनी स्वीकृती दर्शवली पाहिजे. विविध सरकारांनी चुंबक आणि इलेक्ट्रिक-वाहन बॅटरीसह मोठ्या प्रमाणात दुर्मिळ मूलद्रव्ये असलेली उत्पादने समाविष्ट करण्यासाठी विद्युत उपकरणांसंबंधीच्या पुनर्चक्रांकनाच्या विद्यमान कायद्यात सुधारणा केली पाहिजे. आंतरराष्ट्रीय संशोधकांनी अशा धोरणांची व्यावहारिकता आणि परिणामांचे मूल्यांकन करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, खराब-गुणवत्तेच्या दुय्यम स्रोतांवर किंवा निर्यात निर्बंधांवर अवलंबून राहणे यासारख्या परिणामांशिवाय राष्ट्रीय १५ टक्के पुनर्वापराचे लक्ष्य पूर्ण करणे कंपन्यांसाठी किती कठीण असेल? ३० टक्के लक्ष्यापर्यंत जाण्यासाठी त्यांना काय करावे लागेल? एक अडचण अशी आहे, की बहुतेकदा गोपनीयतेच्या कारणांमुळे संशोधक किंवा उद्योगातील फक्त थोड्याच भागीदारांना उत्पादनांमधील दुर्मिळ मूलद्रव्यांचे प्रमाण

किंवा कमी कार्बन उपकरणांच्या वापराचे नमुने माहीत असतात. यामुळे अशा उत्पादनांपासून, ही उत्पादने आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यावर आल्यावर किती टन दुर्मिळ मूलद्रव्ये उपलब्ध होऊ शकतात किंवा ते गोळा करण्यास सक्षम होण्याची वेळ किती असेल हे ठरवणे कठीण होऊन बसते. दुय्यम स्रोतांकडून दुर्मिळ मूलद्रव्यांच्या भविष्यातील पुरवठ्याबद्दल अंदाज समजण्यासाठी उपलब्ध झालेले माहितीसंच ही तफावत दूर करण्यास मदत करतील.

जागतिक व्यापार अडथळे आणि दुर्मिळ मूलद्रव्ये निर्यात निर्बंधांवर मात करण्यासाठी दुर्मिळ मूलद्रव्यांशी संबंधित वस्तू आणि सेवांसाठी समन्वय आणि कमी शुल्क आवश्यक आहे, ज्यात सन २००९ पासून पाचपट वाढ झाली आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार, औद्योगिक धोरण आणि संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये SDGsचा समावेश असावा. दुर्मिळ मूलद्रव्यांसाठी G20 बैठकीत अशा मुद्द्यांवर करार केल्यास आंतरराष्ट्रीय बाजारपेठेची स्थापना करण्यात आणि पुनर्वापर केलेल्या दुर्मिळ मूलद्रव्ये आणि पुन्हा वापरलेल्या उत्पादनांसाठी मोठ्या प्रमाणावर अर्थव्यवस्था निर्माण करण्यात मदत होईल. कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांना, त्यांच्या ऊर्जा संक्रमणांना गती देण्यासाठी दुर्मिळ मूलद्रव्यांच्या व्यापाराला मदत होईल.

**दुर्मिळ मूलद्रव्ये पुनर्प्राप्त करण्यासाठी आणि त्यांचा मागोवा घेण्यासाठी गुंतवणूक करण्याची आवश्यकता**

दुर्मिळ मूलद्रव्यांचा मागोवा घेण्यासाठी, उत्पादने गोळा करण्यासाठी, त्यांच्या विखंडनाचे तंत्रज्ञान स्वयंचलित करण्यासाठी आणि त्यांना वेगळे करून पुनर्प्राप्त करण्यासाठी प्रणाली आणि तंत्रज्ञानामध्ये गुंतवणूक आवश्यक आहे. सूक्ष्म स्तरावर जैविक पद्धतींनी ह्या मूलद्रव्यांचे अंश वेगळे करण्याचे (मायक्रोस्कोपिक बायोलीचिंग) तंत्रज्ञान विकसित करत आणि सुधारण्यापासून हायड्रोमेटलर्जी आणि सोल्युशन-आधारित रसायनशास्त्र पद्धतींपर्यंत पर्यावरणपूरक मार्गांनी फ्लोरोसेंट लाइटिंगच्या प्रक्रियेदरम्यान ही दुर्मिळ मूलद्रव्ये गोळा करण्यासाठी सामग्री आणि अभियांत्रिकी नवकल्पना आवश्यक आहेत. अशा तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक सामान्यत: प्रयोगशाळांमध्ये केले जाते आणि त्यांना औद्योगिक स्तरापर्यंत विकसित करण्याची आवश्यकता असते. खर्च कमी करण्यासाठी संशोधन, विकास आणि नावीन्यपूर्ण निधीसाठी सरकारांनी करसवलत आणि अनुदानांचा विचार केला पाहिजे. सार्वजनिक-खाजगी भागीदारी विशिष्ट उत्पादनांमधून दुर्मिळ मूलद्रव्यांच्या पुनर्वापरासाठी पैसे उभारू शकतात, जसे की हार्ड डिस्क ड्राइव्हस्, विंड-टर्बाइन आणि इलेक्ट्रॉनिकवाहन मोटर, स्पीकर, चुंबकीय अनुनाद इमेजिंग मशीन आणि उपग्रह संप्रेषण उपकरणे. एका सकारात्मक उदाहरणात, विविध क्षेत्रांमधील परस्पर सहयोग सुलभ करण्यासाठी आणि ईयु-६ मधील कच्च्या मालाची पुनर्प्राप्ती आणि पुनर्वापर वाढवण्यासाठी दहा नवीन चक्रीय केंद्र तयार करण्यासाठी २० कोटी युरो जमा करण्याचा युरोपीय संघराज्याचा मानस आहे.

अशा सार्वजनिक-खाजगी भागीदाऱ्यांच्या लाभार्थींमध्ये टोकियो स्थित समूह कॉर्पोरेशन हिताची आणि टेनेसीम धील यूएस ओकरिज नॅशनल लॅबोरेटरी यांसारख्या सरकारी प्रयोगशाळांचा समावेश होतो. दोन्ही संस्था दुर्मिळ मूलद्रव्ये असलेल्या हार्ड डिस्क ड्राइव्हच्या पुनर्वापरासाठी पर्यायांचे मूल्यांकन करत आहेत. गुगल या पर्यायांमध्येही गुंतवणूक करत आहे. अमेरिकन हार्ड डिस्कवरून मूलद्रव्य पुनर्प्राप्ती झाल्यावर निओडीमियम मॅग्नेटसाठी जागतिक मागणीतील ५ टक्के भाग पूर्ण करू शकते असा अंदाज आहे. तथापि, अशा प्रक्रियांचा आर्थिक नफा कमी आहे, जी दुर्मिळ मूलद्रव्यांच्या किमती आणि अस्थिरता, तसेच दुर्मिळ मूलद्रव्ये वापरल्या जाणाऱ्या ट्रेस प्रमाणांमुळे चालते. सामान्य हार्ड डिस्क ड्राइव्हमध्ये काही ग्रॅम दुर्मिळ मूलद्रव्ये असतात किंवा सुमारे १-२ टक्के दुर्मिळ मूलद्रव्ये असतात. क्रेडिट कार्डामधील लघु चिप्समध्ये, विद्युतचालकता सुधारण्यासाठी सेमीकंडक्टरमध्ये जोडलेल्या डोपेंटमध्ये आणि इंधन क्षमता वाढवण्यासाठी जी रसायने घालतात, त्यातदेखील दुर्मिळ मूलद्रव्ये असतात. ९९.८ टक्के इतकी पुनर्प्राप्ती कार्यक्षमता नोंदवली गेली असली तरी, कमी उत्पन्नामुळे पुनर्प्राप्ती फायदेशीर होऊ शकत नाही. खर्च कमी करण्यासाठी आणि बाजार स्थिर करण्यासाठी त्यात अधिक संशोधनाची आवश्यकता आहे. जागतिक दुर्मिळ मूलद्रव्ये परिपत्रक अर्थव्यवस्था तयार करण्यासाठी विविध पद्धतींनी निधी उभा करण्याची आवश्यकता असते. एक उदाहरण हवामान निधीचे देता येईल. यूएन फ्रेमवर्क कन्व्हेन्शन ऑन क्लायमेट चेंजमध्ये कमी आणि मध्यम-उत्पन्न असलेल्या देशांना हवामान बदलाचा सामना करण्यासाठी हरित हवामान निधी उपलब्ध करून देण्याची सोय आहे. ह्यातील काही भाग दुर्मिळ मूलद्रव्यांच्या पुनर्प्राप्तीसाठी, विशेषतः वाहतूक आणि डिजिटल क्षेत्रात गुंतवणूक करू शकतात. युरोपियन बँक फॉर रिकन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंटने विकसित केलेल्या ग्रीन-सिटी योजना आणि विद्युत वस्तूंच्या संकलन आणि पुनर्प्राप्तीसाठी योजनांमध्ये दुर्मिळ मूलद्रव्यांचा समावेश असावा. बहुपक्षीय विकास बँका फेब्रुवारीमध्ये जारी झालेल्या UN SDG स्टिमुलस योजनेच्या अनुषंगाने, कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये यासाठी आर्थिक यंत्रणा विकसित करू शकतात.

निष्पक्षता राखण्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यापार आणि किंमत निरीक्षण आवश्यक आहे. ग्लोबल रेअरचा अर्थ इंडस्ट्री असोसिएशनसारख्या संस्थांनी, उदाहरणार्थ, कच्च्या आणि दुय्यम दुर्मिळ मूलद्रव्यांच्या साठ्याचा मागोवा घेण्यासाठी

आंतरराष्ट्रीय ज्ञानकेंद्र स्थापन करून या प्रयत्नांना समर्थन दिले पाहिजे. वैयक्तिक उत्पादन स्तरावर दुर्मिळ मूलद्रव्यांचे प्रमाण शोधण्यात मदत करण्यासाठी पायाभूत सुविधा दीर्घकाळात दुय्यम बाजार आणि वर्तुळाकार-अर्थव्यवस्थेला चालना देईल. सध्या, उत्पादनांच्या बिल-ऑफ-मटेरियलमध्ये दुर्मिळ मूलद्रव्ये आंशिक घटकदेखील सूचीबद्ध नाहीत. ब्लॉकचेन तंत्रज्ञान वापरून एक वितरीत माहितीसंच व्यवस्थापन प्रणाली निर्माण केली तर दुर्मिळ मूलद्रव्यांच्या उत्पादनओघाचे व्यवस्थापन सुधारेल. दुर्मिळ मूलद्रव्ये उत्पादन ओघाचा मागोवा घेण्यासाठी सहज उपलब्धी किंवा ब्लॉकचेन-समर्थित माहितीसंचदेखील आवश्यक असतील. सामग्रीमध्ये दुर्मिळ मूलद्रव्यांचे आण्विक ठसे नोंदवण्यासाठी तंत्रज्ञानामध्ये संशोधन विकसित करणे आवश्यक आहे. या व्यतिरिक्त दुर्मिळ मूलद्रव्ये मोठ्या महिती-संचांच्या प्लॅटफॉर्मची देखरेख, कार्य, व्यवस्थापित आणि सामायिक करण्यासाठी डिझाइन आणि साधने आवश्यक असतील. उद्योग मानके देखील महत्त्वपूर्ण असतील.

**दुर्मिळ मूलद्रव्यांची पुरवठासाखळी**

बिझनेस मॉडेल आणि पुरवठासाखळी तयार करण्यासाठी पुढील संशोधनाचीदेखील आवश्यकता असेल. उदाहरणार्थ, इष्टतम लॉजिस्टिक नेटवर्क काय आहे? विविध मॅक्रो-इकॉनॉमिक आउटलूक प्रमुख उद्योगांसाठी दुर्मिळ मूलद्रव्यांचा लवचीक पुरवठा साखळी कशी बनवता येईल? व्यवसाय मॉडेल फायदेशीर असू शकतात. दुर्मिळ मूलद्रव्य खनिजे भाड्याने देणे ट्रेसिंग सिस्टीम सक्षम करू शकतात. अशी प्रणाली ज्यामध्ये ही खनिजे विकली जात नाहीत, परंतु ठरावीक कालावधीसाठी भाड्याने दिली जातात. तथापि, कायदेशीर, करार आणि प्रक्रिया अडथळे कायम आहेत. दुर्मिळ मूलद्रव्येसाहित्य, तसेच पुरवठा-साखळीतील पर्यावरणीय सेवा कोणाच्या मालकीच्या असाव्यात हे ठरवणे हे एक मोठे आव्हान आहे. हे मूळ खनिज काढणारे असावेत जे सामान्यत: कमी-उत्पन्न असलेल्या प्रदेशात काम करतात, की विशेषाधिकार प्राप्त प्रदेशात प्रमाणित उच्च-मूल्य जोडणारे उत्पादक? लीज भ्रष्ट पक्षांच्या मालकीच्या असतील तर? अंतिम ग्राहक आणि दुय्यम बाजार यांच्यामध्ये स्थित रिप्रोसेसर मालकीचा दावा करण्यास सक्षम असावा का?

दुर्मिळ मूलद्रव्य अंतिम वापरकर्ता कंपन्यांना पुनर्नवीनीकरण केलेल्या सामग्रीची मालकी राखण्यात स्वारस्य आहे. भविष्यातील पुरवठासाखळ्यांमध्ये संस्थांच्या धोरणे आणि पद्धतींना संशोधन आणि समायोजन आवश्यक असेल, ज्यामध्ये पुनर्वापराच्या पायाभूत सुविधांचा विकास, वित्त, प्लॅटफॉर्म, शोधण्यायोग्यता आणि माहिती-सामायिकीकरण मानकांचा समावेश आहे. दुर्मिळ मूलद्रव्यांसाठी सेवा-तरतुदी आणि भाडेपट्ट्याचे मॉडेल विचारात घ्यावे, म्हणजे नवीन व्यापार करार होऊ शकतो, ज्यामध्ये मागोवा (ट्रेसिंग) तंत्रज्ञान लागू केले जावे. उत्खननापासून उत्पादनापर्यंत त्यांचे स्वत:चे साहित्य व्यवस्थापन करणारे देश कदाचित अंतर्गत प्रणाली ठेवण्यास सक्षम असतील, परंतु जागतिक प्रणालींवरील सहकार्यासाठी काळजीपूर्वक मानके आणि आंतरराष्ट्रीय कायदा करार आवश्यक आहेत. आत्मविश्वास वाढवणाऱ्या आणि देशांतर्गत लक्ष केंद्रित करण्याच्या या युगात जागतिक सहयोग कदाचित कल्पनेइतका कठीण नसेल. काही देशांना तस्करीत दुर्मिळ मूलद्रव्ये येणे थांबवणे आणि जागतिक औद्योगिक नेटवर्कमध्ये मूल्य जोडणे आकर्षक वाटू शकते. चीन, युरोपीयन युनियन, अमेरिका आणि इतर राष्ट्रांमधील सहकार्य भविष्यातील आंतरराष्ट्रीय दुर्मिळ मूलद्रव्य डेटाबेस तयार करून, दुर्मिळ मूलद्रव्यांचा वाजवी व्यापार विकसित करून आणि इतर मानकांद्वारे वाढवले जाऊ शकते. अशा सहकार्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार पुन्हा जागृत होऊ शकतो आणि ऊर्जासंक्रमणावर जागतिक भागीदारी व्यापक होऊ शकते. परिपत्रक-अर्थव्यवस्था धोरणे आणि पद्धती दुर्मिळ मूलद्रव्यांबद्दलची चिंता कमी करू शकतात आणि शून्य-सम मानसिकता नष्ट करू शकतात.

दुर्मिळ मूलद्रव्यांचे हे क्षेत्र तुलनेने नवे असल्यामुळे त्यांच्यासंबंधी होणारे कायदे, त्यांचे पुनर्चक्रांकन आणि त्यांचा एकूणच वापर यासंबंधी आपण खूप गोष्टी नव्याने शिकत आहोत. इलेक्ट्रॉनिक आणि माहितीक्षेत्राचा उदयच गेल्या काही दशकांमधला असल्यामुळे आणि या सर्व दुर्मिळ मूलद्रव्यांचा वापर त्यातच अधिक होत असल्यामुळे, अजून खूप काही शिकायचे आहे. विशेषतः आजच्या युगात माहितीक्षेत्रातील मोबाइल फोन, संगणक, टॅब, तसेच इतरही संगणकीय उपकरणे यांच्यामध्ये सातत्याने बदल होत असतात आणि नवी प्रणाली आली की ही उपकरणे नवी घ्यावी लागतात. हे सर्व जसे खर्चीक काम आहे तसेच मुळातच मर्यादित असलेल्या दुर्मिळ मूलद्रव्यांच्या बाबतीत भविष्यात त्रुटी निर्माण करणारे ठरणार, असे स्पष्ट दिसत आहे. त्यामुळे इलेक्ट्रॉनिक कचरास्रोतांचा पुनर्वापर खूपच महत्त्वाचा ठरतो. आपणही यासाठी जास्तीत जास्त पुनर्चक्रांकन कसे करता येईल, याचे धोरण आखून त्याप्रमाणे कार्यवाही सुरू करणे अत्यंत गरजेचे आहे.

संदर्भसूची

Nature 619, 248-251 (2023) doi: https://doi.org/10.1038/d41586-023-02153-z
go.nature.com/3h1aeji
go.nature.com/43e4tzx
go.nature.com/46crado
go.nature.com/3xat92q

**– शरद काळे**
sharadkale@gmail.com



राजीव श्रीखंडे

# ड्रॅक्युला - ब्रॅम स्टोकर
# Dracula by Bram Stoker

**जगप्रसिद्ध** आयरिश कादंबरीकार अब्राहम स्टोकरचा जन्म डब्लिन इथे ८ नोव्हेंबर १८४७ रोजी झाला. अब्राहम सात मुलांपैकी तिसरा. त्याचे वडील वरिष्ठ सरकारी अधिकारी होते.

तो लहानपणी बराच आजारी असे. त्याचे प्राथमिक शिक्षण Beactive House School इथे झाले. पुढे त्याने ट्रिनिटी विद्यापीठातून बीएची पदवी मिळवली. १८७५ मध्ये त्याला एमए ही पदवी मिळाली. विद्यापीठाचा धावपटू म्हणून त्याला पारितोषिकही मिळाली.

तिथे शिक्षण घेत असतानाच अब्राहमला नाट्यक्षेत्रात रस वाटू लागला. Irish Civil Serviceमध्ये काम करताना तो डब्लिन इव्हनिंग मेल या वृत्तपत्राचा नाट्यसमीक्षक म्हणून काम करू लागला. डब्लिन इव्हनिंग मेल या वृत्तपत्राचा प्रसिद्ध आयरिश भयकथाकार शेरीडन ले फाजू हा मालक होता. नाट्यसमीक्षकांना फारशी किंमत नसलेल्या त्या काळातही स्टोकरने आपल्या समीक्षेमुळे चांगले नाव कमावले.

पुढे १८७६ मध्ये हेन्री आयर्विंग या प्रख्यात इंग्लिश कलाकाराच्या हॅम्लेटबद्दल स्टोकरने अतिशय उत्तम समीक्षा लिहिली. त्यामुळे प्रभावित होऊन आयर्विंगने स्टोकरला एका संध्याकाळी जेवायला बोलावले आणि तेव्हापासून ते मित्र बनले. स्टोकरने आपल्या लिखाणालाही त्याच वेळी सुरुवात केलेली होती. Crystal Cup नंतर त्याची The Chain of Destiny ही कादंबरी चार भागांत The Shamrock या नियतकालिकात प्रसिद्ध झाली. त्याला कलेविषयी फार प्रेम होते. त्यानेच १८७९ मध्ये डब्लिन स्केचिंग क्लबची स्थापना केली.

१८७९ साली स्टोकरने फ्लोरेन्स बालकोम्बाशी विवाह केला. ऑस्कर वाइल्डही या सुंदर तरुणीच्या प्रेमात होता. लग्नानंतरही स्टोकरने वाइल्डबरोबरचे मैत्रीचे संबंध कायम ठेवले. इतकेच नव्हे तर ऑस्कर वाइल्ड इंग्लंडमधून परागंदा झाल्यावरही त्याला भेटण्यासाठी तो युरोपला गेला.

ब्रॅम स्टोकरने लग्नानंतर हेन्री आयर्विंगच्या लिसियम थिएटर या संस्थेत बिझनेस मॅनेजर म्हणून काम पाहण्यास सुरुवात केली. ११ डिसेंबर १८७९ रोजी स्टोकर दाम्पत्याला मुलगा झाला. त्याच्या कामामुळे लंडनमधील उच्चभ्रूंच्या वर्तुळात स्टोकरचा प्रवेश झाला. तिथे त्याचा सर आर्थर कॉनन डॉयल यांच्याशीही परिचय झाला. स्टोकरचा हॉल केनशीही परिचय झाला जो त्याचा आयुष्यभर जिवाभावाचा मित्र बनला.

हेन्री आयर्विंगबरोबर ब्रॅम स्टोकरने सत्तावीस वर्षे काम केले. त्याच्या नाट्यसंस्थेबरोबर त्याने जगातल्या अनेक देशांची वारी केली. दोनदा त्याला व्हाईट हाऊसमध्ये दोन अमेरिकन राष्ट्राध्यक्षांना भेटण्याचाही योग आला.

स्कॉटलंडमधील क्रूडेन सामुद्रधुनीच्या ठिकाणी स्टोकर १८९२ ते १९१० पर्यंत नेमाने जात असे. The Watters Mou ही १८९५ सालची कादंबरी आणि पुढे १९०२ साली प्रसिद्ध झालेली The Mystery of the Sea ही कादंबरी क्रूडन सामुद्रधुनीतच घडते. पुढे त्याने त्याची सर्वात लोकप्रिय कादंबरी Dracula ही देखील बऱ्याच अंशी त्याच्या क्रूडन सामुद्रधुनीच्या वास्तव्यातच लिहिली. The Lady of the Shroud ही कादंबरी स्टोकरने १९०९ मध्ये लिहिली तर The Lair of the White Warm ही कादंबरी १९१२ साली प्रसिद्ध झाली. या दोन्ही भयकादंबरी आहेत.

Dracula ला अफाट प्रसिद्धी मिळाली आणि त्याचे नाव जगभर झाले. तरीही त्याने आयर्विंगबरोबर करत असलेले आपले काम १९०७ पर्यंत चालूच ठेवले. पुढे त्याची प्रकृती बिघडत गेली आणि शेवटी २० एप्रिल १९१२ रोजी त्याचा मृत्यू झाला.

ब्रॅम स्टोकरने अनेक कादंबऱ्या आणि कथा लिहिल्या. The Duties of Clerks of Petty Sessions हे १८७९ साली प्रसिद्ध झालेले पुस्तक आयरिश नागरी सेवेत एक प्रमाण पुस्तक म्हणून प्रसिद्ध आहे. परंतु Dracula सारखी प्रसिद्धी आणि

लोकप्रियता त्याच्या दुसऱ्या कुठल्याच कादंबरीला मिळाली नाही.

डब्लिनमध्ये अजूनही दरवर्षी ब्रॅम स्टोकरच्या सन्मानार्थ उत्सव साजरा केला जातो जो अतिशय विविधरंगी असतो. हयातभर एका जगप्रसिद्ध नाट्यसंस्थेचा कार्यवाह म्हणून अतिशय सक्षमतेने काम केलेल्या ब्रॅम स्टोकरची खरी ओळख Dracula या कादंबरीचा लेखक म्हणून आजही आहे.

आता मी Dracula या कादंबरीकडे वळतो.

कादंबरीच्या सुरुवातीला जोनाथन हार्कर हा नवीनच सॉलिसिटर झालेला इंग्लिश माणूस काऊंट ड्रॅक्युलाला भेटायला त्याच्या करपार्थियन डोंगरातील किल्ल्यात भेटायला येतो. काऊंटला काही मालमत्ता लंडनजवळ विकत घ्यायची असते. काऊंट हार्करला सांगतो, की रात्री किल्ल्यात त्याने न फिरलेले बरे. या सूचनेकडे दुर्लक्ष करून हार्कर रात्री किल्ल्यात फिरतो तेव्हा त्याला तीन व्हॅम्पायर बायका भेटतात त्यामुळे हार्करची तारांबळ उडते. त्याच्या जिवावरच बेतते तेव्हा तो मूर्च्छित पडतो. काऊंट त्या व्हॅम्पायर बायकांकडे एक मूल बॅगेमध्ये घालून देतो. हार्कर मग पलंगावर पडलेल्या स्थितीत जागा होतो. मात्र त्याला त्याच अवस्थेत सोडून ड्रॅक्युला किल्ला सोडतो. त्या व्हॅम्पायर बायकांच्या तावडीतून हार्कर कसाबसा बचावतो आणि भ्रमिष्ट अवस्थेत तो बुडापेस्टमधल्या एका इस्पितळात पोचतो.






अब्राहम स्टोकर

इथे ड्रॅक्युला जेमेटर नावाच्या जहाजाने इंग्लंडला प्रवास करतो. या सफरीत जहाजाच्या कप्तानाच्या असे लक्षात येते की जहाजावरचा कर्मचारीवर्ग हळूहळू नाहीसा होत आहे. शेवटी जहाजाचा कप्तान हा एकटाच उरतो. ड्रॅक्युला त्याला दहशतीखाली ठेवून त्याच्याकडे जहाजाचे संचालन करवून घेतो. हे जहाज इंग्लंडमधील व्हिटची गावाच्या किनाऱ्याला लागते तेव्हा कप्तानाला कुत्र्यासदृश एक मोठा प्राणी किनाऱ्यावर जाताना दिसतो.

लुसी वेसनी ही एक तरुण मुलगी इंग्लंडमध्ये राहत असते. हार्करची वागदत्त वधू मिना मरे ही लुसीची उत्तम मैत्रीण असते. लुसीला डॉ. जॉन सेवार्ड, क्वीन्सशी मॉरिस आणि ऑर्थर होमवूड या तिघांकडून लग्नासाठी मागणी घातली गेलेली असते. लुसी होमवूडला होकार देते, पण या सर्वांच्यात मैत्रीचे संबंध कायम राहतात.

मिना सुटीवर लुसीकडे व्हिटवी गावाला येते. लुसीला झोपेत चालण्याची सवय असते. ड्रॅक्युला व्हिटवीला आल्यानंतर त्याच्या नजरेला झोपेत चालणारी लुसी दिसते. तो तिचा पाठलाग करू लागतो. मिनाला हार्करच्या अवस्थेबद्दल पत्र मिळते आणि त्याप्रमाणे ती बुडापेस्टला जाते. इथे लुसी फारच आजारी पडते. सेवर्डचे जुने शिक्षक प्राध्यापक अब्राहम व्हॅन हेलसिंगला लुसी कशाने आजारी आहे हे कळते, पण तो कुणालाही काहीच सांगत नाही. लुसीच्या शरीरातून रक्ताचे प्रमाण फारच कमी झाल्याचे त्याच्या लक्षात येते. तो लसणाच्या पाकळ्यांचा हार करून लुसीच्या गळ्यात घालतो. लुसीची आई तो हार काढते कारण तिला माहीत नसते की लसणामुळे व्हॅम्पायरना अटकाव होत असतो.

लुसीची आई आणि लुसी घरात एकट्या असताना त्यांना घराच्या आसपास मोठा, हिंस्र लांडगा फिरताना दिसतो आणि त्यांची भीतीने गाळण उडते. धक्क्याने लुसीच्या आईचा मृत्यू होतो. थोड्या वेळाने लुसीदेखील मृत्युमुखी पडते.

काही दिवसांनी गावातल्या लोकांच्या असे लक्षात येते की लहान मुलांचा एक सुदर स्त्री रात्री पाठलाग करत असते. सगळीकडे घबराट पसरते. व्हॅन हेलसिंगला वाटते की ही लुसीच असली पाहिजे. मग व्हॅन हेलसिंग त्याच्या सहकाऱ्यांसोबत लुसीच्या थडग्याकडे जातो. थडगे उघडल्यावर त्यांना लुसी ही व्हॅम्पायर झाल्याचे लक्षात येते. तिच्या हृदयात ते सळई मारतात. तिचे मुंडके कापतात आणि लसणाच्या पाकळ्यांनी तिचे तोंड भरून ठेवतात. जोनाथन हार्कर आणि आता त्याची पत्नी झालेली मिना परत येतात आणि ड्रॅक्युलाचा सामना करण्यासाठी सगळेच सज्ज होतात.

ही सगळी माणसे डॉ. सेवार्डच्या इस्पितळात राहू लागतात. व्हॅन हेलसिंग सगळ्यांना सांगतो की व्हॅम्पायर त्यांच्या मातृभूमीच्या मातीवरच विश्राम करू शकतात. या इस्पितळात एक वेडा माणूस असतो. ड्रॅक्युला त्याच्याशी मानसिक संधान प्रस्थापित करतो. त्याच्याकरवी त्याला कळते की सगळी माणसे त्याच्याविरुद्ध मोहीम सुरू करत आहेत. त्या वेड्या माणसाचा उपयोग करून ड्रॅक्युला सेवार्डच्या इस्पितळात प्रवेश मिळवतो. तो मिनावर हल्ला करून तिचे रक्त पितो आणि तिलाही

त्याचे रक्त प्यायला भाग पाडतो. आता मृत्यूनंतर मिनाचेही व्हॅम्पायरमध्ये रूपांतर होणार असते आणि तिचे हे भीषण भविष्य ड्रॅक्युलाचा मृत्यू झाला तरच बदलणार असते.

व्हॅन हेलसिंग आणि त्याचे सहकारी काउंट ड्रॅक्युलाच्या वाड्यात गुपचूत प्रवेश करतात. त्यांना तिथे मातीने भरलेले अनेक पेटारे दिसतात. त्या पेटाऱ्यांत व्हॅन हेलसिंग पवित्र ब्रेडचे तुकडे भरून त्या मातीला निष्प्रभ करतो. ते ड्रॅक्युलाला पकडण्याचा प्रयत्न करतात, पण तो निसटतो. मिना आणि ड्रॅक्युलामध्ये मानसिक बंध निर्माण झालेला असतो आणि त्याच्या साहाय्याने ड्रॅक्युला कुठे आहे हे व्हॅन हेलसिंग आणि त्याच्या सहकाऱ्यांना कळत असते. त्यांना कळते की ड्रॅक्युला आपल्या ट्रान्ससिल्व्हिनियाच्या किल्ल्यात परत गेलेला आहे.

ही सगळी माणसे मग ट्रान्ससिल्व्हिनियाला जातात. व्हॅन हेलसिंग आणि मिना किल्ल्यात प्रवेश करतात. लोखंडी सळईच्या साहाय्याने व्हॅन हेलसिंग किल्ल्यातल्या तिन्ही व्हॅम्पायर स्त्रियांचा नाश करतो. ड्रॅक्युला नदीवर जाणाऱ्या बोटीवर असतो ज्यात त्याचा मातीने भरलेला शेवटचा पेटारा असतो. हा पेटारा ड्रॅक्युला बग्गीत घालतो तेव्हा व्हॅन हेलसिंग आणि त्याचे सहकारी त्याच्यावर हल्ला करतात. तुंबळ युद्ध होते. क्विन्सी ड्रॅक्युलाच्या हृदयात शेवटी लोखंडी सळई मारतो आणि हार्कर त्याचे मुंडके छाटतो. ड्रॅक्युलाच्या शरीराची माती होऊन त्याचा नाश होतो, पण या युद्धात जखमांमुळे क्विन्सीचा मृत्यू होतो. व्हॅन हेलसिंग आणि त्याचे बाकीचे सहकारी सुखरूप इंग्लंडला परततात. कादंबरी इथेच संपते.

ब्रॅम स्टोकरची ही जगप्रसिद्ध भयकादंबरी एक epistolary कादंबरी आहे. विविध व्यक्तिरेखांच्या रोजनिशीत नोंदी, त्यांनी एकमेकांना लिहिलेली पत्रं, वेगवेगळ्या वृत्तपत्रांची वेगवेगळ्या दिवसांची कात्रणे यांचा उपयोग करून स्टोकरने या कादंबरीची रचना केलेली आहे. व्हॅम्पायर म्हणजे मानवी रक्त पिणारे पिशाच्च ही संकल्पना पूर्णतः पाश्चात्त्य आहे. हे इथे नमूद करणे आवश्यक आहे. कादंबरीची सुरुवात जोनाथन हार्करच्या रोजनिशीत नोंदींपासून होते. पहिली चार प्रकरणे म्हणजे हार्करच्या रोजनिशीतील नोंदीच आहेत. पुढे मिना आणि लुसीमधील पत्रापत्री, मिनाच्या रोजनिशीतल्या नोंदी, डॉ. सेवार्डची रोजनिशी, जोनाथन हार्करच्या रोजनिशीतील नोंदी यांच्या साहाय्याने स्टोकरने हे कथानक पुढे नेलेले आहे. मध्येच वृत्तपत्रांच्या कात्रणांद्वारे काही बातम्या आपल्यापर्यंत पोचवून या कथानकाला सत्यता देण्याचे काम स्टोकरने अतिशय खुबीने केलेले आहे. अगदी सुरुवातीपासून भयाने झाकोळलेले हे कथानक पुढे सरकताना भयाची छाया आणखीच गडद होत जाते आणि ही किमया आहे स्टोकरच्या सामर्थ्यवान लेखणीची!

या कथानकाच्या रचनेतले आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे रूढार्थाने या कथानकाला कोणी एक असा नायक नाही. एका अर्थाने खलनायक असलेला काउंट ड्रॅक्युला जो सगळ्या अशुभाचा ज्वलंत प्रतीक आहे, तोच या कादंबरीचा नायक आहे. तसा हा काउंट आपल्याला मधूनमधूनच भेटतो पण त्याचा वावर मात्र आपल्याला सतत जाणवत राहतो, त्याची छाया आपल्याला सतत भेडसावत रहाते, हेदेखील स्टोकरच्या लेखणीचे फार मोठे यश आहे, हे मान्य करावेच लागेल.

ब्रॅम स्टोकरची कथनशैली अतिशय ओघवती आहे. वेगवेगळया व्यक्तिरेखांच्या द्वारेच त्याने हे कथानक उलगडलेले असल्यामुळे या वेगवेगळया निवेदकांच्या व्यक्तिमत्त्वाला साजेशी अशी वेगवेगळी कथनशैली ब्रॅम स्टोकरने वापरण्याची काळजी घेतलेली आहे. त्यामुळे या कथानकाला जाणवणारी अशी सच्चाई आलेली आहे. आपल्याला परिचित जगाच्या संपूर्णपणे कथेबाहेर असणारी ही कादंबरी त्यामुळेच पहिल्यापासून पकड घेते आणि ही पकड शेवटपर्यंत जराही सुटत नाही हे विशेष! ह्यात घडणाऱ्या घटना बहुतांश अतिरंजित आहेत, तरीही त्या विश्वासार्ह करण्याची किमया ब्रॅम स्टोकरच्या या कथनशैलीने जणू विनासायास केलेली आहे. तसा या कथानकाला वेग आहे; पण ते कधी कधी रेंगाळतेही. मूलतः एका सरळ रेषेत जाणारे हे कथानक असले तरी कधी कधी ते भूतकाळातही वावरते. हे रेंगाळणेही स्टोकरच्या सहज कथनशैलीमुळे आपल्याला फारसे जाणवत नाही. पुढे काय होणार ही उत्कंठा शेवटपर्यंत कायम राखणारी ही कादंबरी आहे.

ब्रॅम स्टोकरच्या भाषेला एक वजन आहे. थोडी जड वाटली तरी भाषा अत्यंत प्रभावी आहे. वेगवेगळ्या व्यक्तींच्या मुखांतून आपण ही कहाणी ऐकत असल्यामुळे स्टोकरची भाषाही वेगवेगळी रूपे सहजच धारण करते आणि त्यामुळेच ही कादंबरी अतिशय वाचनीय झालेली आहे. आपला थरकाप उडवण्याचे असामान्य सामर्थ्यही स्टोकरच्या भाषेत आहे. व्हॅम्पायर ही कल्पनाच मुळी आपल्या अंगावर काटा आणणारी आहे, त्यामध्ये बिभित्सरसही आहे. तरीसुद्धा स्टोकरची भाषा हे सगळे अकल्पित, भयाण प्रसंग वर्णन करताना आपले संतुलन कधी गमावत नाही. आपण कधी कल्पनाही करू न शकणाऱ्या घटनाही स्टोकरची भाषा इतक्या सहजतेने सांगते की त्या जणू आपल्या रोजच्या जगण्यातल्या घटना आहेत असे आपल्याला वाटते आणि या घटना आपल्या मनात घर करून राहतात. त्यातली भीषणता त्यामुळेच अनेक पट वाढते आणि भयाचा पगडा आपल्या मनात खोल बसतो. अंगावर भीतीने शहारा यावा अशी काही वर्णने या कादंबरीत आहेत. ब्रॅम स्टोकरच्या प्रभावी भाषेमुळे भयाने गढूळलेले कथानकाचे वातावरण आणखीच गडद होते, कधी कधी ते असह्य होते. भाषा हे या कादंबरीचे फार मोठे बलस्थान आहे.

या कादंबरीत तशी व्यक्तिरेखांची संख्या मर्यादितच आहेत. एका बाजूला काउंट ड्रॅक्युला आणि दुसऱ्या बाजूला त्याच्याविरुद्ध लढा पुकारलेले व्हॅन हेलसिंग आणि त्याचे सहकारी अशी सरळ वर्गवारी स्टोकरने केलेली आहे. जहाजावरचे खलाशी, लुसी अशा ड्रॅक्युलाला बळी पडलेल्या काही व्यक्तिरेखा आहेत. त्यांची ओळख आपल्याला त्यांच्या आणि इतरांच्या रोजनिशीतल्या नोंदींवरून, या व्यक्तिरेखांनी एकमेकांना लिहिलेल्या पत्राद्वारेच होते. व्हॅन हेलसिंग हा ड्रॅक्युलाविरुद्ध लढणाऱ्या सगळ्यांचा पुढारी. या सगळ्याच व्यक्तिरेखा तशा उठावदार झाल्या आहेत, पण कथानकावर दाट छाया आहे ती फक्त काउंट ड्रॅक्युलाचीच. त्याचा अमानवी वावर कथानकाला पार झाकोळून टाकतो हे खरे, त्याचबरोबर कथानकाला एक वेगळेच परिमाणही देतो. महिलांना स्वतःकडे आकर्षित करण्याची अजब शक्ती असलेला काउंट ड्रॅक्युला ही जागतिक वाङ्मयातील एक अविस्मरणीय व्यक्तिरेखा आहे. व्हॅम्पायर ही आख्यायिका पाश्चात्त्य देशांत फार पूर्वीपासून आहे, पण तिला मूर्त रूप देण्याचे काम स्टोकरने काउंट ड्रॅक्युला या कादंबरीद्वारे केलेले आहे.

ड्रॅक्युला ही कादंबरी प्रसिद्ध झाली ती १८९७ साली. ती चांगलीच लोकप्रिय झाली. बहुसंख्य टीकाकारांचा सूरही प्रोत्साहनाचा होता. पुढे पुढे ती इतकी लोकप्रिय झाली की व्हॅम्पायर म्हणजेच ड्रॅक्युला हे समीकरण जगात रूढ झाले. जगाच्या करमणूकप्रधान संस्कृतीमध्ये ड्रॅक्युलाने अढळस्थान मिळवलेले आहे. आजपर्यंत ड्रॅक्युलावर अनेक चित्रपट आलेले आहेत. ज्यात Horror of Dracula हा १९५८ साली आलेला चित्रपट अतिशय प्रसिद्ध आहे. अनेक नाटके, दूरचित्रवाणी मालिका, व्हिडीओ गेम, कॉमिक्स ड्रॅक्युलावर आलेली आहेत आणि पुढेही येत राहतील. व्हॅन हेलसिंगवरही अनेक चित्रपट आलेले आहेत. इतक्या वर्षांनंतरही ड्रॅक्युलाची लोकप्रियता अबाधित आहे.

जगप्रसिद्ध अमेरिकन भयकथालेखक स्टीफन किंगच्या मते ड्रॅक्युला, मेरी शेलीचे फ्रँकेस्टाईन आणि रॉबर्ट लुई स्टीव्हन्सनची डॉ. जेकील आणि मि. हाईड या तीन कादंबऱ्या भयकथा या साहित्यप्रकाराचे अढळ असे मानदंड आहेत. एवढेच नव्हे तर ते मापदंडही आहेत.

दंतकथा, लोककथा, आख्यायिका यांचे अपूर्व मिश्रण करून ब्रॅम स्टोकरने ड्रॅक्युलाची निर्मिती केलेली आहे. वाचताना खरीखरी भीती वाटावी अशा जागतिक वाङ्मयात ज्या थोड्या कलाकृती आहेत त्यात ड्रॅक्युला ही कादंबरी अग्रस्थानावर आहे. ब्रॅम स्टोकरच्या लेखणीतून उतरलेली ही विलक्षण कादंबरी आज जागतिक वाङ्मयात एक Cult Classic म्हणून मान्यता पावलेली आहे.

भयकथा या साहित्यप्रकाराच्या प्रवासात ड्रॅक्युला ही कादंबरी एक फार महत्त्वाचा टप्पा आहे हे तर सत्यच आहे. भयकथा किती प्रभावी असू शकते याची ही कादंबरी म्हणजे एक वस्तुपाठ आहे. जगाच्या कलासंस्कृतीत ड्रॅक्युलाने यामुळेच अढळपद मिळवलेले आहे!

**– राजीव श्रीखंडे**
rshrikhande@yahoo.com

॥ग्रंथाली॥

## सुरेश वाघे यांना नुकताच 'एबीपी माझा' सन्मान प्राप्त!



# कालिदास शब्दकोश
## सुरेश वाघे
**खंड पहिला – अ ते घ**
**खंड दुसरा – च ते भ**
**खंड तिसरा – म ते ह**
**परिशिष्ट विभाग**

'अभिज्ञान शाकुंतल', 'विक्रमोर्वशीय', 'मालविकाग्निमित्र' ही नाटकं, 'कुमारसम्भव' व 'रघुवंश' ही महाकाव्यं आणि 'मेघदूत' व 'ऋतुसंहार' ही ललित काव्यं या महाकवी कालिदास याने रचलेल्या अभिजात साहित्याचा अर्थ सोपा करून सांगणारे शब्दकोश 'ग्रंथाली'ने प्रसिद्ध केले आहेत. सुरेश पांडुरंग वाघे लिखित हे चार खंड अभ्यासकांसह रसिक वाचकांना कालिदासाच्या वाङ्मयाचा आस्वाद घेण्यासाठी उपयुक्त ठरतील. **चार खंडांची मूळ किंमत ४५०० रुपये आहे. ते २७०० रुपयांत** (टपालखर्च वेगळा) उपलब्ध केले आहेत.



**किरण येले**

# रिद्धी म्हात्रे

रिद्धी प्रसाद म्हात्रे, अलिबागच्या रांजणखार या छोट्याशा गावात राहणारी मुलगी. कोकण एज्युकेशन सोसायटीच्या पनवेल येथील कन्या विद्यालयात शिकून पुढे विठोबा खंडाप्पा जुनिअर कॉलेज मग रामनारायण रुईया महाविद्यालयामधून मास मीडियामध्ये पदवी आणि नंतर मुंबई विद्यापीठातून कम्युनिकेशन ॲण्ड जर्नालिझममध्ये मास्टर्स पूर्ण करते. इथवरच्या प्रवासात ती शाळेपासून वक्तृत्वगुण अंगी बाळगत अनेक स्पर्धांत आपल्या वक्तृत्व गुणांची चुणूक दाखवत असते. मग २०१८ साली लोकसत्ताच्या 'वक्ता दशसहस्रेशु' या स्पर्धेत ती भाग घेते आणि जो विषय निवडते त्या विषयावर साधा ब्र उच्चारायला स्त्रियाच नाही तर पुरुष आणि अगदी राजकीय क्षेत्रातले बडे बडे नेते कचरत असतात. आजही एक समाज दुखावला जाईल म्हणून प्रगतिशील म्हणवल्या जाणाऱ्या राज्यात या विषयाबाबत अनेकजण मौन बाळगतात. आता आमच्या समाजात असे काही होत नाही असेही अनेक जण म्हणतात, पण त्याच समाजातल्या विवेक समाईतेकर नावाचा तरुण त्या प्रथेविरोधात चळवळ करतो. त्या प्रथेवर रिद्धी म्हात्रेने भाष्य केले ती प्रथा होती - कौमार्यचाचणी प्रथा. तिने लोकसत्ता स्पर्धा जिंकली खरी, पण तिला धमक्यांचे फोन-मेसेज येऊ लागले मात्र वीस वर्षांची रिद्धी याविरोधात कणखरपणे उभी राहिली. या तिच्या लढ्यात लोकसत्ताचे मुख्य संपादक गिरीश कुबेर तिच्यामागे उभे राहिले.

रिद्धी म्हात्रेचा सजग प्रवास यानंतर सुरु झाला तो थांबला नाही. तिने दैनिक मुंबई तरुण भारतचे वेब पोर्टल 'महा एमटीबी' इथे वेब सबएडिटर म्हणून काम केले. सध्या रिद्धी झी २४ तास या वृत्तवाहिनीवर वृत्तनिवेदिका म्हणून कार्यरत आहे.

वक्तृत्वकलेचे मूळ वाचनात आहे. अभ्यासपूर्ण आणि मुद्देसूद मांडणीसाठी वाचन असणे गरजेचे आहे. रिद्धी म्हात्रेचे सामाजिक साहित्याचे वाचन आहेच, त्यासोबत तिचे माणसांचे आणि आसपासच्या जगण्याचेही वाचन आहे. हे तिच्या ललित लेखातून जाणवते. महाराष्ट्राला ललित आणि सामाजिक लेख लिहिणाऱ्या पत्रकारांची मोठी परंपरा आहे. ही परंपरा रिद्धी म्हात्रे पुढे नेईल याबाबत शंका नाही.



**रिद्धी प्रसाद म्हात्रे**

रिद्धी ललित लेख आणि कविता लिहिते. यूट्यूबवर तिचे स्वतःचे अकाऊंट असून त्यावर ती पूर्वसुरींच्या कवितांचे सादरीकरण करत असते. तिच्या एका लेखाची ही झलक-

### ट्रेनमधल्या बायकांचं जग

'वर्किंग वूमन' असणाऱ्या आणि लोकल ट्रेननं प्रवास करणाऱ्या प्रत्येक बाईचं ट्रेनशी वेगळं नातं आहे. ठरलेल्या ट्रेननं जाणं, त्या ट्रेनच्या ठरलेल्या डब्यात बसणं, तिथे आपला एक ग्रुप तयार करणं असा प्रवास अनेकींनी अनेक वर्षं केला आहे. अगदी ट्रेनची 'पिवळी तिकिटं' मिळायची तेव्हापासूनच कितीतरी बायकांच्या आयुष्यातली अनेक वर्षं असा प्रवास

करण्यात आणि आठवणी साठवण्यात गेली आहेत. आता काळ बदललाय तसं बायकांच्या डब्यातलं विश्वसुद्धा बदललं आहे.

ट्रेनच्या दोन्ही टोकांकडे एक-एक आणि मध्ये असणारा एक असे बायकांचे तीन डबे. आणि ते डबे ओळखू यावेत म्हणून त्यावर असणारं डोक्यावर पदर घेतलेल्या बाईचं चित्र बदलून लावलेल्या छान कॉर्पोरेट ऑफिसात काम करणारी दिसावी अशा कोटातल्या बाईचं सगळ्यांनी कौतुक आणि स्वागत केलं आहे. ट्रेननं प्रवास करणाऱ्या बायकांची संख्या पूर्वीपेक्षा वाढली आहे आणि त्यामुळे होणाऱ्या भांडणाचीसुद्धा. एखादं ठरावीक स्टेशन आल्यानंतर कितीही गाढ झोपेत असणाऱ्या तुम्हाला खडबडून जाग येतेच. कारण बायकांचा अचानक वाढलेला आवाज, ठेवणीतल्या शिव्या तुम्हाला ऐकू येतात. अगदी सकाळी सहाची ट्रेन पकडली तरी हीच परिस्थिती दिसते. कधीतरी वाटतं सगळ्यांना घरचं आवरून, अनेकांचा दबाव सहन करून ट्रेनमध्येच काय तो आवाज वाढवून बोलायची संधी मिळत असावी! आणि या भांडणांमध्ये 'व्हेरिएशन' सुद्धा असतं. काही जणी 'शुद्ध मराठीत' भांडतात, काही 'शुद्ध बोलीभाषेत' भांडतात, तर काही 'आपल्याला येत नसलेल्या हिंदीत' भांडतात, तर काही जणी थेट इंग्रजीचा रस्ता धरतात. उरलेल्या बायका ही सगळी भांडणं बारकाईनं ऐकत, त्यावर आपली मतं मांडत, काही जणी 'उपवासाच्या दिवशी शिव्या कानावर पडल्या म्हणून चिडत' प्रवास करतात. पण कुणी भांडणात लुडबुड करत नाही.

रोज एक-दीड तासाच्या प्रवासात सलग उभं राहून जाणं काही जणींना जमत नाही. मग या लोकल प्रवासातल्या एका महत्त्वाच्या 'समारंभाची' वेळ येते. ती म्हणजे 'कुठे उतरणार?' 'कुठे उतरणार?' असं म्हणत सगळ्यांना भंडावून सोडण्याची. आपल्या घरातल्या सोफ्यावर भलती कुणीतरी येऊन बसली आहे, आणि तिला आपण हुसकवतोय अशा आवेशात अनेक जणी कुठे उतरणार हा प्रश्न विचारतात. आणि उत्तर देणाऱ्यासुद्धा कधीतरी महाठक असल्यासारखं माजात उत्तर देतात. बरं यात 'फोर्थ सीट' नावाचासुद्धा त्रासदायक पण दिलासादायक पर्यायही असतोच. मग फोर्थ सीट बसणं, किंवा तीन बाकडे जोडून तयार केलेल्या लांब सीटवर बसणं आणि मुख्य म्हणजे आपल्याला कोणत्या स्टेशनला कोणत्या सीटवर बसायला जायचंय (फोर्थ सीट बसणं हे महाकठीण काम असतं! जास्त वेळचा प्रवास अर्धवट बसून करता येत नसल्यानं व्यवस्थित बसायला मिळेल अशा सीटवर बसलेल्या बाईला तुम्ही उतरल्यावर मी बसेन असं सांगायची पद्धत आहे आमच्याकडे.) हे लक्षात ठेवणं अशी सगळी दिव्यं आम्ही बायका सहज करतो. शिवाय आपल्याला जागा मिळाली म्हणून आम्ही गप्प बसत नाही. आणखी एखादी बाई लवकर उतरणार असेल तर इतर बायकांनाही आम्ही सीट मिळवून देतो.

आणि या सगळ्या गोंधळात एखादी नवीन आलेली बाई असेल आणि तिनं उगाच पंगा घ्यायचा प्रयत्न केला की झालं, पेटलाच वाद!

बहुतांश स्त्रिया ट्रेनच्या प्रवासादरम्यान प्रचंड घाबरलेल्या असतात. आपल्याला उतरायचंय त्या स्टेशनपेक्षा पुढे जाऊ अशी भीती अनेकींच्या मनात असते. आणि लहान मुलांना सोबत घेऊन प्रवास करणाऱ्यांची तर मदार इतर बायकांवरच जास्त असते, असा माझा वैयक्तिक अनुभव आहे. मुलांना घेऊन उतरू शकू की नाही या विचाराचं ओझं घेऊनच त्या ट्रेनमधून खाली ढकलल्या जातात. ट्रेन प्लॅटफॉर्मला लागताना चालत्या ट्रेनमध्ये चढणं, चालत्या ट्रेनमधून उतरता येत नसलं तरी डोअरलाच उभं राहणं यावरून उडणारे खटकेही नित्याचेच!

आता वळूया ट्रेनमधल्या बायकांच्या मोबाइल वापराकडे. गेल्या काही वर्षांपासून ट्रेनमध्ये बायका एकमेकींशी बोलत नाहीत, गप्पा मारत नाही. ट्रेनमध्ये चढल्या, सीट मिळाली की आधी इयरफोन कानाला लावायचे आणि वेब सीरिज बघायला किंवा गाणी ऐकायला सुरुवात करायची. आणि त्यात मध्ये मध्ये कुठे उतरणार, कुठे उतरणारची दादागिरी आहेच. ट्रेनमध्ये कानातले, बांगड्या, भाज्या, फ्रीज कव्हर, आंबटचिंबट गोळ्या, टिकल्या, रुमाल अशा विक्रेत्यांचीही सतत रेलचेल असतेच. एरवी चुकून लेडीज डब्यात चढलेल्या पुरुषाला ज्या त्वेषानं बायका हुसकावून लावतात त्याच्याबरोबर विरुद्ध या 'जीवनावश्यक' वस्तू स्वस्तात विकणाऱ्याला आपुलकीनं बोलावतात. या विक्रेत्यांमध्ये अनेक जणी तान्हुल्याला छातीशी बांधून या ट्रेनमधून त्या ट्रेनमध्ये फिरतीवर असतात. काही शाळेत जायच्या वयात झेपत नसलेल्या भाज्यांचं, पिशव्यांचं ओझं घेऊन फिरत असतात. हे सगळं चित्र बघून भावनिक झालेल्या बायका मी अनेकदा पाहिल्यात. कधी अत्यंत वाईट अनुभवसुद्धा येतात. तोकडे कपडे घातलेल्या मुलीपासून साडी नेसलेल्या बाईपर्यंत आणि अगदी बुरखा घालून पूर्ण अंग झाकलेल्या बायका-मुलींनाही बायकांच्या डब्याला लागूनच असणाऱ्या डब्यातल्यांच्या काही विचित्र नजरा सहन कराव्याच लागतात. तुमच्याकडे वासनांध नजरेने बघतात म्हणून हिम्मत करून त्यांच्या नजरेला नजर दिलीत तरी समोरच्याच्या नजरेत तुम्हाला शरम म्हणून दिसणार नाही. शेवटी तुम्हालाच नजर फिरवावी लागते. ही परिस्थिती नित्याची आहे.

हल्लीच ट्रेनमध्ये मुलीवर अत्याचार झाल्याची बातमी आपण सगळ्यांनी पाहिली. अशा बातम्या ऐकल्या की क्षणात आपण घरातल्या लेकी बाळींना समजावतो. पण फक्त सावध करणं पुरेसं असणार नाही. मुलींनी स्वतःचं संरक्षण करायलाच हवं. अन्यथा सामान्य मुलींचं घराबाहेर पडणं मुश्किल होईल. खरं तर रेल्वेनं महिलांसाठी हेल्पलाइन नंबर दिलाय, पण मदत मिळायला काहीसा उशीर होतोच हा अनुभव मी स्वतः २-३

वेळा घेतला. आणि गरजेच्या वेळेला बायकाच बायकांच्या मदतीला येत नाहीत हेही कटू पण सत्य आहे.

आणि एखादी बाई मदतीला सरसावली तर 'मिळुनी साऱ्याजणी' तिला अडवतात. ही मानसिकता बदलायला हवी.

रोज ट्रेनमध्ये गमतीजमती घडत असल्या तरी ही ट्रेन आणि ठरलेला डबा हे अत्यंत भावनिक नातंही असतं.

ट्रेन प्लॅटफॉर्मला लागताना तिला हात लावून नमस्कार करणं, आणि मग ठरलेला डबा आला की चालत्या ट्रेनच्या 'झोकात' डब्यात चढणं ही कला असंख्य जणींनी आत्मसात केलीय. आणि साधारण २० जणींमध्ये दोघी-तिघींनाच हा ट्रेनचा 'झोक' झेपत असल्यानं उरलेला सगळा गोतावळा प्रचंड घाबरत, कधी हसत, कधी एकमेकींचा हात धरून, 'चलो अंदर' 'चलो अंदर' असं ओरडत कसाबसा आत चढतो. बरं या सगळ्यात साडी नेसलेल्या (आणि ती सावरायची सवय नसलेल्या) बायका, लहान मुलांना घेऊन चढणाऱ्या बायका आणि गरोदर बायका यांची तर तऱ्हाच वेगळी असते. महत्त्वाचं म्हणजे या तीनही तऱ्हेच्या बायकांना इतर बायका 'मिळुनी साऱ्याजणी' तत्त्वावर सावरण्यासाठी मदत करतात. अनेकदा बहुतांश बायकांची उंची कमी असते. त्यामुळे त्यांचे हात वरच्या हँडलपर्यंत पोहोचत नाहीत.

खरं तर बायकांच्या डब्यातली हँडल इतर डब्यांपेक्षा कमी उंचीवर असतात. तरीही अडचण होतेच.

दररोज ट्रेनचा प्रवास करणाऱ्या बायकांसाठी ही कसरत सवयीची आहे. परंतु पहिल्यांदाच प्रवास करणाऱ्यांसाठी प्लॅटफॉर्म नंबर, जिने, पूल, दिशा हा सगळाच सावळा गोंधळ असतो. एकंदरीत ट्रेनमध्ये बायका एक वेगळं आणि स्वतंत्र आयुष्य जगतात. एरवी सोन्याचांदीच्या दागिन्यांत आनंद शोधणाऱ्या बायका गर्दी असणाऱ्या डब्यात 'फोर्थ सीट' मिळाली तरी खुश होतात. चूल-मूल 'सांभाळून' घराचा उंबरठा ओलांडणाऱ्या आणि ट्रेनचे पायदान आणि फलाटावरील अंतराकडे कधीच लक्ष न देणाऱ्या बायका ट्रेनच्या प्रवासातही एक वेगळंच जग उभं करतात. आपले आनंदाचे, दुःखाचे, काळजीचे, प्रेमाचे क्षण वर्षानुवर्षं बघणारी आणि ते जपून ठेवणारी ही ट्रेन आम्हा बायकांची जवळची मैत्रीणच होऊन जाते.


**– रिद्धी प्रसाद म्हात्रे**

भ्रमणध्वनी : ९५९४१६९९५५

riddhipmhatre2704@gmail.com

**– किरण येले**

kiran.yele@gmail.com



ग्रंथाली

# चॉईसेस

आत्मकथन

**लिव्ह उल्मन**

स्वैर अनुवाद

**मृणाल कुलकर्णी**




लिव्हसारखी अत्यंत संवेदनशील अभिनेत्री, तिचे आगळेवेगळे आयुष्य, त्यातले भावनांचे अनेक चढउतार, गुंतागुंतीची नाती – याबद्दल तिला नेमके काय म्हणायचे आहे, हे समजून घेऊन ते शब्दबद्ध करणे हे अत्यंत अवघड काम, पण मृणालने ते अप्रतिमरित्या पार पाडले आहे. यातला सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ते लेखन कुठेही अनुवाद वाटत नाही. मला तर हा मृणालने घेतलेला लिव्ह उल्मन या स्त्रीचा अनुभव वाटतो. एका अभिनेत्रीला, स्त्रीला, आईला, प्रेयसीला आणि व्यक्तीला जाणून घेताना, जणू परकायाप्रवेश करून मृणालने लिव्ह आपल्यापर्यंत पोहोचवली आहे.

**– डॉ. मोहन आगाशे**

**मूल्य ३५० रुपये**

**सवलतीत २०० रुपये**

# डॉ. यशवंत आमडेकर यांच्याशी संवाद




डॉ. यशवंत आमडेकर आणि डॉ. सतीश नाईक

शुक्रवार, ४ ऑगस्ट २०२३ रोजी ग्रंथाली-प्रतिभांगण येथे 'आरोग्याची कॅप्सुल' या उपक्रमात ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ. यशवंत आमडेकर यांची मुलाखत मधुमेहतज्ज्ञ डॉ. सतीश नाईक यांनी घेतली.

यावेळी डॉ. आमडेकर यांनी मिश्किल शैलीत आपल्याला आलेले अनुभव सांगून, विविध उदाहरणे देत आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. केवळ मुलांचेच नव्हे तर प्रत्येक व्यक्तीचे संपूर्ण आरोग्य सुदृढ राखण्यासाठी शारीरिक आरोग्य, मानसिक आरोग्य व सामाजिक आरोग्य उत्तम राखले पाहिजे असे ते म्हणाले. शारीरिक आरोग्य उत्तम राखण्यासाठी आहार, व्यायाम, पूर्ण झोप व स्वच्छता या चार बाबी चांगल्याप्रकारे सांभाळा. तसेच, मानसिक आरोग्य उत्तम राखण्यासाठी आपले 'भावनिक आरोग्य' जपा आणि आपली वृत्ती आनंदी, समाधानी व सकारात्मक ठेवा. त्यासाठीचे पहिले पाऊल म्हणजे मुलांना लहान वयापासूनच 'नाही' ऐकण्याची सवय लावा, असा सल्ला डॉ. आमडेकर यांनी श्रोत्यांना दिला. तर सामाजिक आरोग्य उत्तम राखण्यासाठी डॉक्टरांनी समर्थ रामदासांच्या 'मनाचे श्लोक'मधील 'जनी निंद्य ते सर्व सोडूनी द्यावे, जनी वंद्य ते सर्व भावे करावे।' हा श्लोक कायम लक्षात ठेवावा, असे सांगितले.

लहान मुलांची वाढ, त्यांचा आहार, ऑटिझमची समस्या, लहान मुलांचे लसीकरण, मुलांचे व पालकांचे मानसशास्त्र अशा विविध पैलूंना स्पर्श करत खुमासदार शैलीत डॉ. आमडेकर यांनी विवेचन केले. पारंपरिक पद्धतीने चालत आलेले जुन्या पिढीचे शहाणपण व विज्ञान यांची सांगड डॉक्टरांना योग्य प्रकारे घालता आली पाहिजे. तसेच, डॉक्टरांचा रुग्णांशी होणारा संवाद अधिक वाढला पाहिजे, असा सल्ला डॉ. आमडेकर यांनी एकूणच डॉक्टरांना दिला.

डॉ. सतीश नाईक यांनी सहजसुंदर शैलीत विचारलेल्या एकेका प्रश्नातून डॉ. आमडेकर अधिकाधिक खुलत गेले. डॉ. आमडेकर यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम केवळ माहिती देणारा न राहता ज्ञानदायी झाला, अशी प्रतिक्रिया उपस्थित श्रोत्यांनी दिली. •

॥ग्रंथाली॥

कॅन्सर म्हणजे..
डोकं फिरलेल्या पेशी



डॉ. सतीश नाईक
डॉ. दुर्गा गाडगीळ

कॅन्सर या आजारावर प्रबोधन करणाऱ्या, उपाय करणाऱ्या संस्थांची यादी पुस्तकाला परिपूर्णता देते. संग्रही असावे असे धीर देणारे पुस्तक सांगतेय डोकं फिरलेल्या पेशींची अर्थात कॅन्सरची कहाणी.

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

## माणसांची श्रीमंती हाच मोठा पुरस्कार – मनोज बोरगावकर

'नदीष्ट' या बहुचर्चित कादंबरीचे लेखक मनोज बोरगावकर यांना बँक ऑफ बडोदाचा 'राष्ट्रभाषा सन्मान पुरस्कार' प्राप्त झाला. यानिमित्ताने शुक्रवार, १८ मे २०२३ रोजी ग्रंथाली-प्रतिभांगण येथे त्यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम संपन्न झाला. 'एबीपी माझा' या वृत्तवाहिनीच्या सहसंपादक भारती सहस्रबुद्धे यांनी अतिशय समर्पक व प्रगल्भ प्रश्न विचारत बोरगावकर यांची अभ्यासपूर्ण मुलाखत घेतली. प्रस्तुत कार्यक्रमास 'एबीपी माझा'चे मुख्य संपादक राजीव खांडेकर विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. कवी-चित्रकार हेमंत जोशी यांनी बनवलेले उत्कृष्ट स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन 'राष्ट्रभाषा सन्मान' मिळाल्यानिमित्त दहावी आवृत्ती प्रसिद्ध करून 'ग्रंथाली'तर्फे 'एबीपी माझा'चे मुख्य संपादक राजीव खांडेकर यांच्या हस्ते मनोज बोरगावकर यांचा सत्कार करण्यात आला.

राजीव खांडेकर यांनी आपल्या मनोगतात 'नदीष्ट' कादंबरीशी असलेले त्यांचे जिव्हाळ्याचे नाते उलगडले. ही कादंबरी वाचून आपण इतके भारावून गेलो की अनेक कलाकार, लेखकांना, माणसांना ही कादंबरी वाचायला सांगितली आणि एकाप्रकारे या कादंबरीचा अघोषित 'ब्रँड अँबेसेडर' झालो, अशा शब्दांत राजीव खांडेकर व्यक्त झाले.

भारती सहस्रबुद्धे यांनी विचारलेल्या एकेका प्रश्नातून म नोज बोरगावकर मोकळेपणाने व्यक्त होत गेले. 'नदीष्ट'चे माहेर 'ग्रंथाली' आहे याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. नदीवर पोहताना आलेल्या अनुभवांतून, घडलेल्या प्रसंगांमधून आपली संवेदनशीलता कशी घडत गेली याबद्दल कळकळीने बोलले. निसर्ग आपल्याला बरेच काही शिकवत असतो. ते जाणून घेण्यासाठी आपले डोळे, कान उघडे हवे आणि मनाची दारे उघडलेली हवी असे ते म्हणाले. 'नदी म्हणजे आईचे विस्तारत गेलेले गर्भाशयच' अशी भावना त्यांनी व्यक्त करून ते म्हणाले, यामुळे मानवी इजा व्हायची तेव्हा तेव्हा मी नदीवर जायचो, नदीपाशी माझे मन मोकळे करायचो आणि एक नवी ऊर्जा घेऊन पुन्हा एकदा आयुष्याच्या प्रवासाला लागायचो. नदीशी असणारे हे जिव्हाळ्याचे नाते आजही तितकेच घट्ट आहे. ज्यामुळे ही माझी भाबडी श्रद्धा म्हणा पण भरपावसात, पुरात या तीरावरून त्या तीरावर जाताना ही नदीच मला सांभाळते, एक लाट दुसऱ्या लाटेला सांगते की बाबा याला सांभाळा आणि या विश्वासवरच मी पोहत पोहत किनारा गाठतो. एकूणच अनुभवांचे हृद्य वर्णन बोरगावकर यांनी आपल्या मुलाखतीत केले. नदीष्ट या पुस्तकाने आपल्याला दिलेल्या मानसन्मान, पुरस्कारांपेक्षा दिलेली माणसांची श्रीमंती हा माझ्यासाठी सर्वात मोठा पुरस्कार आहे, अशा भावना बोरगावकर यांनी व्यक्त केल्या.

भारती सहस्रबुद्धे यांनी मनोज बोरगावकर यांची घेतलेली मुलाखत श्रोत्यांच्या मनाचा ठाव घेणारी होती. कार्यक्रमाच्या अखेरीस ग्रंथालीचे सुदेश हिंगलसपूरकर यांनी 'नदीष्ट'चे अप्रतिम मुखपृष्ठ साकारणारे दिवंगत चित्रकार नयन बारहाते यांची उणीव आज भासत आहे, अशा शब्दांत भावना व्यक्त केल्या. यावेळी संदीप काळे यांच्या 'ऑल इज वेल' या पुस्तकाच्या ऑडिओ बुकचे प्रकाशन राजीव खांडेकर यांच्या हस्ते झाले.

•

## 'ग्रंथाली Listen'च्या पाच ऑडिओ बुकचे प्रकाशन

गुरुवार, १० ऑगस्ट २०२३ रोजी ग्रंथाली Listen उपक्रमाअंतर्गत पाच ऑडिओ बुकचे प्रकाशन ख्यातनाम अभिनेत्री, दिग्दर्शक मीना नाईक यांच्या हस्ते ग्रंथाली-प्रतिभांगण येथे झाले. या कार्यक्रमास आर जे, संवादक गणेश आचवल, अभिनेत्री प्राजक्ता दातार प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. ग्रंथाली Listen च्या संयोजक डॉ. मृण्मयी भजक यांनी आपल्या प्रास्ताविकातून या उपक्रमाची संकल्पना स्पष्ट केली. दर्जेदार साहित्य अधिकाधिक लोकांपर्यंत पोचवण्याचे ग्रंथाली Listen हे उत्तम माध्यम आहे. आजच्या कार्यक्रमात औरंगाबाद, नागपूर ते अमेरिका अशा विविध ठिकाणच्या, विभिन्न लेखकांच्या, विविध विषयांच्या कथा प्रकाशित होत आहेत,असे मृण्मयी यांनी सांगितले.

मीना नाईक यांनी आपल्या भाषणात ग्रंथाली-प्रतिभांगणच्या उपक्रमांचे कौतुक केले. तसेच, ग्रंथाली Listen उपक्रमामुळे उत्तम साहित्य व उत्तम मराठी भाषा आजच्या पिढीच्या कानावर पडेल, असे सांगितले. आर जे गणेश आचवल यांनी खुमासदार शैलीत श्रोत्यांशी संवाद साधला. आयत्या वेळी दिलेल्या 'पांडुरंग' या विषयावर सादरीकरण करून गणेश आचवल यांनी कार्यक्रमात रंगत आणली. प्राजक्ता दातार यांनी आपल्या भाषणात ग्रंथालीमधील साधेपणा अधिक भावला, अशा उपक्रमात सहभागी व्हायला आवडेल असे आवर्जून सांगितले.

सुदेश हिंगलासपूरकर यांनी ग्रंथालीच्या स्थापनेपासूनच्या अनेक घडामोडींचा आढावा घेत कार्यक्रमाचा समारोप केला. या कार्यक्रमात ग्रंथाली Listen उपक्रमात ज्यांनी सादरीकरण केले आहे, अशा वाचकांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन अश्विनी भोईर यांनी केले.

•

# भीतीवर मात करून लेखकाने बोलत राहावे – डॉ. रवींद्र शोभणे



**'सुखलोक' या पुस्तकाचे प्रकाशन**

'लेखक लिहीत असतो तेव्हा तो आपल्या स्वराला शब्दबद्ध करत असतो, पण सध्या बोलता येऊ नये असे बंदिस्त वातावरण आहे. ज्यातून समाजाचे उन्नयन होते ती वाचनसंस्कृती नष्ट होत आहे. त्यामुळे एकूण समाजाचा प्रवास निर्बुद्धीकरणाकडे चालू आहे. सामान्यजन बौद्धिकतेकडे वळणार नाहीत, प्रश्न विचारणार नाहीत अशी व्यवस्था सध्या तयार होत आहे, अशा वातावरणात सर्व प्रकारच्या भीतीवर मात करून लेखकाने बोलत राहिले पाहिजे, कारण तोच त्याचा धर्म आहे', असे उद्गार ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष डॉक्टर रवींद्र शोभणे यांनी सहयोग केंद्र भुईगाव वसई येथे रविवार, २० ऑगस्ट रोजी कवी सायमन मार्टिन यांच्या 'सुखलोक' हा लेखसंग्रह व 'वे ऑफ द क्रॉस' या इंग्रजी कवितासंग्रहाच्या प्रकाशनसोहळ्यात बोलताना काढले. ते आपल्या भाषणात पुढे म्हणाले, 'काळ पुढे जात असताना धर्मातीत होण्याची प्रक्रिया सुरू होणं गरजेचं होतं, मात्र आपण अधिकाधिक धर्मांध होत आहोत. त्यामुळे भविष्य अंधकारमय झालेलं आहे. येथला शेतकरी नागवला जात आहे. लघुउद्योग नष्ट केले जात आहेत. मात्र सर्वकाही भस्म होत असतानाही नवीन कोंब फुटत असतो. तेच नवीन जग निर्माण करण्यासाठी लेखक काम करत असतो. म्हणून लोकांनी लेखकांचं ऐकावं. कारण त्यातूनच माणूसधर्माची प्रतिष्ठापना होईल.'

ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी आपल्या भाषणात ग्रंथालीच्या विविधांगी ग्रंथ आणि कोशप्रकल्पांची माहिती दिली. प्रास्ताविक भाषणात कवी सायमन मार्टिन म्हणाले, 'आंधळयांना दृष्टिदान मिळावं, जे ठेचले जात आहेत, आक्रोश करत आहेत त्यांना दिलासा मिळावा आणि धरून नेलेल्यांची सुटका व्हावी म्हणून लेखक लिहीत असतो. आपल्या लेखनातून लेखक मुक्तीच्या वर्षाची घोषणा करत असतो. जीवन प्रवाही ठेवण्याचं काम लेखक करत असतो. लेखक मनुष्यमात्राला जीवनाच्या पाण्याच्या झऱ्याजवळ नेत असतो. माणसांचं अश्रू पुसण्याचं सामर्थ्य लेखकाच्या शब्दांमध्ये असतं. म्हणून शब्द सापडावा लागतो. त्यासाठी शब्दांचा शोध ही कष्टसाध्य कला आत्मसात करावी लागते. तेव्हाच लेखक होता येतं.' यावेळी फादर अँण्ड्रयू रॉड्रिग्ज, मार्कुस डाबरे, प्रकाश अलमेडा, फ्रान्सिस वाघमारे, प्राचार्य डॉक्टर सोमनाथ विभुते, फादर विजय लोपीस, फादर पावकर, नारायण नाईक आदी मान्यवर उपस्थित होते. ब्लेज डिमेलो व दताबुवा वर्तक यांच्या अभंगगायनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. फेलिक्स डिसोजा यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. •


ग्रंथाली

**शब्दरंग**

**हेमंत जोशी**



**(कवितासंग्रह)**

**मूल्य २०० रुपये**

**सवलतीत १२० रुपये**

# दादर येथील शिशुविहार विद्यामंदिरामध्ये विज्ञान गप्पा



सुधीर थत्ते व नंदिनी थत्ते

विद्यार्थ्यांमधील कुतहलवृत्तीला वाव देऊन त्यांच्या मनात असणाऱ्या विविध प्रश्नांना सोप्या भाषेत उत्तरे देत त्यांच्या मनातील विज्ञानविषयक जागरुकता वाढवणारा ग्रंथालीप्रतिभांगणचा उपक्रम म्हणजे विज्ञानगप्पा. विज्ञान गप्पा उपक्रमातील सहावा कार्यक्रम गुरुवार, १७ ऑगस्ट २०२३ रोजी दादर हिंदू कॉलनी येथील शिशुविहार विद्यामंदिर शाळेतील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला होता. सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ व लेखक सुधीर थत्ते व विज्ञानलेखिका नंदिनी थत्ते यांनी यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. दोन ताटल्या, टिश्यू पेपर तसेच फुगा व दोन वाट्या अशा घरगुती साध्या साधनांनी थत्ते यांनी मुलांना विज्ञानाची तत्त्वे समजावून सांगितली. छोट्या प्रयोगातून दैनंदिन वापरातील अनेक गोष्टींमध्ये दडलेले विज्ञान त्यांनी उलगडले. आपल्या मनातील कुतूहल जागे ठेवले पाहिजे. पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधली पाहिजेत, असे थत्ते यांनी मुलांना सांगितले.

इंद्रधनुष्य अर्धवर्तुळाकार का असते? आपल्याला दोन डोळे असूनही एकच दृश्य कसे दिसते? केस व नखे कापताना दुखत का नाही? पाणी हे रॉकेलप्रमाणे का पेट घेऊ शकत नाही? शिंक आली की डोळे बंद का होतात? यासारखे अनेक प्रश्न विद्यार्थ्यांनी मोकळेपणाने विचारले आणि थत्ते यांनी त्यांची सुबोध शैलीत उत्तरे दिली.

शाळेच्या मुख्याध्यापिका सुचित्रा कांबळे यांनी ग्रंथाली व थत्ते यांचे आभार मानले. ग्रंथालीतर्फे विज्ञानविषयक पुस्तके शाळेच्या वाचनालयासाठी भेट देण्यात आली. हा कार्यक्रम ग्रंथालीच्या प्रतिभांगण या यूट्यूब चॅनेलवर प्रकाशित झाला आहे. •


ग्रंथाली

## विज्ञानविचार आणि जीवन यांची सांगड घालणारी पुस्तके




मूल्य ६०० रु.
सवलतीत ३५० रु.




मूल्य ७५० रु.
सवलतीत ४५० रु.




मूल्य ७५० रु.
सवलतीत ४५० रु.



मूल्य ४०० रु.
सवलतीत २५० रु.




मूल्य ३५० रु.
सवलतीत २१० रु.





मूल्य १५० रु.
सवलतीत ९० रु.




मूल्य २०० रु.
सवलतीत १२० रु.

# मराठीच्या दुरवस्थेला राज्यकर्तेच जबाबदार! – डॉ. वि.स. जोग यांचे मत




**'शरच्चंद्र मुक्तिबोध : शतकोत्तर आकलन' आणि 'मराठी राज्यातील मराठीचे वर्तमान' या पुस्तकांचे प्रकाशन**

महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांनी भाषा व संस्कृतीकडे चालवलेल्या घोर दुर्लक्षामुळे, भाषाधोरणाविनाच राज्य चालवल्यामुळे तसेच इंग्रजीच्या मागे लागलेल्या उच्चवर्गीयांमुळे, मराठीची आज सर्वच क्षेत्रांत दुरवस्था झाली. त्या वर्तमानाची सर्वच क्षेत्रांतील चिकित्सक आणि विश्लेषक मांडणी 'मराठी राज्यातले मराठीचे वर्तमान' हा बृहद्ग्रंथ करतो, असे मत ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक डॉ. वि. स. जोग यांनी व्यक्त केले.

ग्रंथालीतर्फे प्रकाशित 'मराठी राज्यातील मराठीचे वर्तमान' आणि 'शरच्चंद्र मुक्तिबोध : शतकोत्तर आकलन' या डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी आणि डॉ. अजय देशपांडे संपादित दोन्ही ग्रंथांच्या लोकार्पण समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

मर्ढेकरांच्या सिद्धांतांना नकार देत मुक्तिबोधांनी 'मानुषता' हा उत्तम साहित्याचा निकष व मूल्य म्हणून प्रस्थापित केले. थोर आणि अपवादात्मक कवी, कादंबरीकार आणि साहित्यशास्त्री असणाऱ्या मुक्तिबोधांची, अगोदर मर्ढेकर व आता नेमाडे यांच्याभोवती फिरणाऱ्या मराठी समीक्षेने अक्षम्य उपेक्षा केली, असेही डॉ. जोग म्हणाले. डॉ. जोशी यांच्या दोन्ही ग्रंथांच्या चिकित्सक आणि विश्लेषक अशा दीर्घ प्रस्तावना हे या दोन्ही ग्रंथांचे वैशिष्ट्य आहे, असे ते म्हणाले.

डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी म्हणाले, मराठी राज्यकर्ते हे बहुजनसत्तेच्या नावावर बहुजनांच्याच मातृभाषेला उच्चशिक्षणाचे, रोजगार, विकासाच्या संधींचे माध्यम करण्याऐवजी इंग्रजीला वाढवणारी सामंतवादी धोरणे राबवत गेल्याच्या परिणामी मराठी ही आधुनिक ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, उच्चशिक्षण, विकास, रोजगार, विविध संधी देणारी भाषा अजूनही होऊ शकलेली नाही. दक्षिणेतील, पूर्वेकडील भाषक समाजांप्रमाणे मराठी भाषक समाजाचा आपल्या राज्यकर्त्यांवर कोणताच दबाव नाही. दोन्ही ग्रंथ हे मराठी भाषेची, समीक्षेची चिकित्सक मांडणी अभ्यासकांच्या विद्वत्पूर्ण विवेचनाद्वारे करणारे ग्रंथ आहेत. असेही डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी म्हणाले. डॉ. राजेंद्र नाईकवाडे, डॉ शैलेंद्र लेंडे यांचीही यावेळी भाषणे झाली. सूत्रसंचालन डॉ. सुमिता कोंडबत्तुनवार यांनी केले.

•

ग्रंथाली

**शरच्चंद्र मुक्तिबोध**
**शतकोत्तर आकलन**
संपादक
**डॉ. श्रीपाद जोशी**
**डॉ. अजय देशपांडे**




**मूल्य ७५० रु.**
**सवलतीत ५०० रु.**

**मूल्य ३५० रु.**
**सवलतीत २०० रु.**




**मराठी राज्यातले मराठीचे वर्तमान**
संपादक
**डॉ. श्रीपाद जोशी**
**डॉ. अजय देशपांडे**

# ‘आत्ममग्न’ कवितासंग्रहाचे प्रकाशन

‘आत्ममग्न’ या ‘ग्रंथाली’ने प्रकाशित केलेला, मंदार ओक यांचा पहिलाच कवितासंग्रह! चिपळूण या कोकणातल्या सांस्कृतिक नगरीत २८ ऑगस्ट २०२३ रोजी, संपन्न झालेल्या दिमाखदार सोहळ्यात, लेखक सुमेध रिसबुड वडावाला; साहिरनामा, अमरलता अशा गाजलेल्या कार्यक्रमांच्या सर्जनशील गायिका डॉ. मृदुला दाढे-जोशी; कोकणचे प्रसिद्ध कवी प्रमोद जोशी यांच्यासह ‘ग्रंथाली’चे सुदेश हिंगलासपूरकर यांच्या उपस्थितीत या काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाले.

डॉ. मीनल ओक यांच्या भावस्पर्शी प्रास्ताविकातूनच मंदार उलगडत जात होता. त्याचे friend, philosopher नि guide म्हणता येतील असे सुहृद प्रा. अरविंद कुलकर्णीसर, उदयोन्मुख निवेदिका, व्याख्याती, लेखिका मानसी खांडेकर, ‘चतुरंग’चे सर्वेसर्वा विद्याधर निमकर, मंदारचा तरुण मित्र व चाहता ॲड. अमित ओक, मंदारचे मामा यांनी त्यांच्या हृद्य आठवणींमधून त्याचं माणूसपण दाखवलं तर व्यासपीठावरील विनायकजी गोखलेकाका, सुमेध, मृदुलाताई यांनीही मंदारवरील आत्यंतिक स्नेहभाव नि त्याच्या अंतरंगातील कवी, वक्ता, लेखक नि सच्चा माणूस त्याच्यावर प्रेम करणाऱ्या चिपळूणकर रसिकांना उलगडून दाखवला. यातच आमचे सिंधुदुर्गचे तरल मनाचे शीघ्रकवी प्रमोद जोशी यांनीही प्रेमभावनेनं ओथंबलेल्या कवितेतून मंदारमधील कवीचं वेगळेपण मांडलं. डॉ. मीनल ओक यांच्या आईच्या मायेतून व्यक्त झालेल्या भावनांमधून ‘आत्ममग्न’चा सर्जनशील कवी किती कार्यमग्न आहे, त्याची समाजाप्रती नि कुटुंबाप्रती असलेली सहृदयता किती हळुवार आहे हे त्यांच्या हृद्य निवेदनातून प्रकट झालं.

सतीश भावसार यांच्या देखण्या मुखपृष्ठातून नि मलपृष्ठावरील कवी ग्रेस यांच्यावरील मंदारनं व्यक्त केलेल्या चारोळीतून या काव्यसंग्रहाचं देखणं असं वेगळेपण मोहवून गेलं.

‘आत्ममग्न’ हेच पुस्तकाचं नाव ठेव असं संजय उपाध्ये यांनी त्याला आशीर्वादपर संदेशातून सुचवलं असं तो मनोगतात बोलला नि त्यानं ‘आत्ममग्न’ या कवितेमागची प्रक्रिया उलगडली. त्याच्या अष्टपैलू जडणघडणीमागची जीवनकहाणीही त्यानं मांडली.

मलाही त्या मान्यवरांच्या मांदियाळीत ‘दोन शब्द’ व्यक्त करण्याची आवर्जून संधी दिली.

‘आत्ममग्न’चा अर्थ संवेदनशीलतेनं सभोवतालच्या मानवी भावभावनांचा विचार करताना होणारा आत्मसंवाद, असा अर्थ विद्याधर निमकर यांनी व्यक्त केला. ‘प्रतिभा आणि संघर्ष एकमेकांची साथ सोडत नाहीत. कलाकारांच्या आयुष्याला निरंतर एका असोशी, अस्वस्थता व्यापून असते. तरी स्वत:शी, दुनियेशी झगडत निरंतर कलाकार नवनवीन सृजनलेणी खोदत असतो... मंदार ओक कमी शब्दांत ही अवस्था मांडतात. त्यांच्याशी झालेल्या चर्चांमधून त्यांचा व्यासंग दिसतो.’ असे उद्गार मृदुला दाढे-जोशी यांनी काढले. सुमेध वडावाला यांनी मंदार ओक यांच्या काव्यप्रतिभेचा गौरव केला. त्यांच्यातील वक्ता, कवी, व्यापारी. अशा विविध गुणांबद्दल कौतुक व्यक्त केले. ओघवत्या शैलीत कार्यक्रमाचे निवेदन करणाऱ्या मीरा पोतदार, ओक परिवार व सर्व संस्थांच्या वतीने आभार व्यक्त करणाऱ्या मनिषा दामले तसेच या संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते ज्यांनी हा कार्यक्रम देखणा करण्यासाठी मेहनत घेतली त्यांचाही आवर्जून उल्लेख करायलाच हवा. तसेच चिपळूणच्या विविध कार्यक्रमात खारीचा वाटा उचलणाऱ्या ‘भावार्थ’च्या टीमचेही कौतुक करायला हवे. पावसाच्या सरी कोसळतानाही मंदारवरच्या स्नेहापोटी तुडुंब गर्दीत सोहळ्याला असणाऱ्या चिपळूणकर रसिकांचे, व्यापारी मित्रांचे व सर्वांचेच रसिक म्हणून ऋणही व्यक्त करतो.

**अविनाश मणेरीकर**, पुणे.
९४२२३७९८७८

ग्रंथाली

# आत्ममग्न

**मंदार ओक**




कवी ग्रेस दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होते. त्यावेळेस टीव्हीवर रोज बातमी असायची की त्यांची प्रकृती ढासळत चालली आहे. तेव्हा सहज डोक्यात आलं की आता ग्रेस स्वतःबद्दल काय म्हणत असतील? ते मी त्यांच्याच भाषेत मांडलं, तेही चारोळीत -

*जगण्याच्या वाटेवरचे*
*सडे रक्ताचे गंधित*
*हे श्वास तुम्ही मोजावे*
*मी मरणाच्या धुंदीत*

**मूल्य १५० रु.**
**सवलतीत १०० रु.**

# डॉ. सतीश नाईक लिखित 'वडिलोपार्जित' पुस्तकाचे प्रकाशन



**'वडिलोपार्जित'च्या प्रकाशनसमयी सुदेश हिंगलासपूरकर, डॉ. लतिका भानुशाली, डॉ. अविनाश फडके, डॉ. अविनाश सुपे, डॉ. सतीश नाईक, उज्ज्वला गोखले आणि धनश्री धारप**

ग्रंथालीने डॉ. सतीश नाईक यांचे 'वडिलोपार्जित' हे पुस्तक २७ ऑगस्ट २०२३ रोजी उत्कर्ष मंडळ सभागृह, विलेपार्ले, मुंबई येथे प्रकाशित केले. ज्येष्ठ पॅथॉलॉजीतज्ज्ञ डॉ. अविनाश फडके आणि केईएमचे माजी अधिष्ठाता डॉ. अविनाश सुपे यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन झाले. जीन्सबद्दलची मूलभूत माहिती ते विविध आजारांशी त्यांचा असलेला संबंध असा सर्वंकष वेध 'वडिलोपार्जिता'मधून साध्या-सोप्या भाषेत घेतला आहे, असे डॉ. फडके आपल्या भाषणात म्हणाले. जीन्समुळे होणाऱ्या विविध आजारांचा मागोवा घेण्यासाठी विविध चाचण्या केल्या जातात. परंतु यांचे अधिकाधिक होत चाललेले मार्केटिंग, बाजारीकरण व त्यात असलेले संभाव्य धोके या विषयावर डॉ. फडके यांनी प्रकाशझोत टाकला.

डॉ. अविनाश सुपे यांनी डॉ. सतीश नाईक यांच्याशी असलेला ऋणानुबंध उलगडला व पुस्तकाची वैशिष्ट्य आपल्या भाषणातून मांडली. जनुकांच्या इतिहासापासून या पुस्तकाची सुरुवात होते. पुस्तकाचा विषय क्लिष्ट आहे; परंतु वाचताना कुठेही रटाळ होत नाही. जिनोम, आनुवंशिक अभियांत्रिकी आणि रोगांसह जनुकांचा संबंध याविषयीही विस्तृतपणे लिहिले आहे. तब्येतीच्या कारणास्तव डॉ. हेमा पुरंदरे प्रकाशनास उपस्थित राहू शकल्या नाहीत. त्यांचे पत्राचे वाचन लेखिका उज्वला गोखले यांनी केले. डॉ. सतीश नाईक हे आपले विद्यार्थी आहेत आणि अतिशय महत्त्वाच्या विषयावर डॉ. नाईक यांनी प्रकाश टाकला आहे, अशा भावना डॉ. पुरंदरे यांनी व्यक्त केल्या.

पुस्तक प्रकाशन सोहळ्याच्या उत्तरार्धात डॉ. लतिका




**डॉ. सतीश नाईक यांच्याशी संवाद साधताना डॉ. लतिका भानुशाली**

भानुशाली यांनी डॉ. सतीश नाईक यांची सहजसुंदर शैलीत मुलाखत घेतली. जीन्स कसे दिसतात, आपल्या आरोग्यावर जीन्स कसा परिणाम करतात, भविष्यकाळात या शास्त्राची दिशा नेमकी कशी असेल अशा त्यांनी विचारलेल्या लोकांच्या मनातील विविध प्रश्नांची उत्तरे डॉ. नाईक यांनी दिली. येणाऱ्या काळात अत्याधुनिक उपचारांच्या आधारे, हवा तसा गुणसूत्रांचा मेळ घालून बाळ जन्माला येईल का या मार्मिक प्रश्नावर बोलताना डॉ. नाईक म्हणाले, की यांचे एकास एक असे उत्तर देता येणार नाही, पण त्याची शक्यताही नाकारता येणार नाही.

ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. तर अश्विनी भोईर यांनी सूत्रसंचालन केले.

•




## सुधा हुजूरबाजार तुंबे


# सत्कारमावशी...

प्रा. अंबिका सरकार ते सरकारमावशी असा प्रदीर्घ सहवास मला लाभलेल्या माझ्या सरकारमावशी आज आपल्यात नाहीत ही एक पोकळी निर्माण झाली आहे.

सिडनहॅम महाविद्यालयीन कालावधीत (१९८२) अनुभवलेला त्यांचा प्रेमळ स्वभाव आणि इकॉनॉमिक्स विषय शिकवण्याची हातोटी कायम लक्षात राहण्यासारखी आहे.

हसतमुख आणि तेजस्वी असे प्रभावी व्यक्तिमत्त्व होते त्यांचे...

इंग्रजी भाषेतून अर्थशास्त्र शिकवताना इंग्रजी भाषेवरचे प्रभुत्व जाणवत असे. महाविद्यालयात त्यांच्याशी चर्चा करताना नकळत मराठीत बोलत असू आणि मग त्यांचे मराठी भाषेवरचे प्रभुत्व जाणवत असे. विद्यार्थी त्यांना वचकून असत, पण तितकेच त्यांच्याबद्दल आदराने आणि आपुलकीने बोलत. त्यांची गणना महाविद्यालयातील 'एक आदर्श शिक्षक' ह्या श्रेणीत आम्ही केली होती.

कालांतराने दहा वर्षांनी आमचे शिवाजी पार्कचे घर माझा मित्र सलीलने विकत घेतले. घर बघायला म्हणून आलेल्या सरकारबाई किंवा प्रा. सरकार 'माझा मित्र सलीलच्या सासुबाई' म्हणून पुन्हा एकदा माझ्या जीवनात आल्या. करूणाची आई असे जास्त जवळचे नाते होते त्यामुळे 'सरकारमावशी' असं मी नकळत त्यांना म्हणायला सुरुवात केली.

मावशी चर्चगेटला राहत असत. कित्येकदा चर्चगेटला गेलो असताना सहज त्यांना भेटायला आम्ही उभयता त्यांच्या घरी जात असू. विविध विषयांवर गप्पा मारताना वेळ छान जात असे. मावशींना आम्ही तरुण मंडळी काय काय नवीन करतो ते ऐकायची उत्सुकता असे. तसे त्यांच्या बोलण्यातून जाणवत असे.

आमच्या सामाईक ओळखीत अनेक जण होते आणि म्हणूनच पुढे मग भरतभाई आणि विद्याताईंच्या आई अशीही ओळख होत गेली...



प्रा. अंबिका सरकार

मावशींचे मराठी लेखनकार्य वाचनीय होते. मराठी साहित्यातील एक अव्वल दर्जाची लेखिका अशी त्यांची ओळख होती.

'चाहूल', 'प्रतीक्षा' हे कथासंग्रह वाचताना त्यांच्या लेखनशैलीतील सहज साधेपणा आजही जाणवतो. 'एका श्वासाचे अंतर' ही कादंबरी वाचताना एक जीवनप्रवास उलगडत जातोय असे जाणवते. त्यांनी 'द लिटिल प्रिन्स' तसेच 'द रिडर' ह्या सुप्रसिद्ध पुस्तकांचे मराठी भाषांतर केले होते. बौद्ध धर्मावर आधारित पुस्तकांचेही मराठीत भाषांतर केले होते. 'हिस्टरी ऑफ माय गोइंग फॉर रेफ्युज' हे पुस्तक 'माझ्या शरण-गमनाचा इतिहास' आणि 'द बोधिसत्त्व आयडिअल' हे पुस्तक

'बोधिसत्त्व आदर्श' ह्या नावांनी अनुवादित करून सर्वसामान्यांना बौद्ध धर्माची ओळख करून दिली होती. मराठी मासिकांतून त्यांचे लेख येत असत. लेखिका म्हणून बाह्यकरणी तडफदार वाटणाऱ्या सरकारमावशी मनाने मृदू होत्या.

कधीही भेटल्या तरी आपुलकीने विचारपूस करून गप्पा होत. वयाचे तसेच त्यांच्या सुप्रसिद्ध लेखिका आणि प्राधापिका अशा कर्तृत्वाचे अंतर जाणवून देत नसते.

साधी राहणी आणि उच्च विचारसरणी हे प्रत्यक्ष कायम अनुभवायला मिळाले.

स्वतःच्या जीवनातील दुःखाने खचून न जाता सकारात्मकतेने आमच्या पिढीला त्यांनी केलेले मार्गदर्शन हे अमूल्य आहे.

त्यांच्या साहित्याच्या रूपाने त्यांची आठवण सदैव ताजी राहील.

सरकारमावशी, तुमचा आदर्श आम्हा विद्यार्थ्यांसमोर नेहमी राहील.

तुमच्या मराठी लेखनाचा वारसा पुढे चालू ठेवण्याच्या कार्याची धुरा मी पत्करली आहे. ती अविरत चालू ठेवेन असे आश्वासन मी तुम्हाला देते.

आज तुम्ही प्रत्यक्ष आमच्यात नाही, पण तुमचे आशीर्वाद सदैव मागे असतील.

**– सुधा हुजूरबाजार–तुंबे**

sudha.tumbe@gmail.com

ग्रंथाली

# सफरनामा

## निवडक कलाकारांचा




**पल्लवी पंडित**

**मूल्य ५०० रुपये**
**सवलतीत ३०० रुपये**

कलेच्या इतिहासाचा अभ्यास करताना एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात व विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात दृश्यकलेमध्ये महत्त्वाचे बदल होत गेलेले आपणास ठळकपणे जाणवतात. या कालखंडातील कलावंतांनी आपल्या कलेमध्ये आधुनिक मूल्यांचा जाणीवपूर्वक पुरस्कार केलेला आपणास दिसतो; त्यातही आपल्या कलेद्वारा त्यांनी जीवनवादी मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केलेले आपल्याला दिसते. सुरुवातीच्या प्रागैतिहासिक काळ सोडला, तर एका बाजूला ग्रीक आणि रोमन संस्कृतीपासून तर्काधिष्ठित वास्तव चित्रणावर भर देणारा पाश्चात्त्य कलाविचार दिसतो तर दुसऱ्या बाजूला भारतीय, पौर्वात्य कलाविचार दिसतो, जो की अंतःप्रेरणेतून बाह्य जगाकडे पाहतो आणि काहीसा प्रतीकात्मकसुद्धा आहे. मात्र असे असले तरी कलाइतिहासाच्या त्या त्या टप्प्यांवर या कलाविचारांची सरमिसळ झालेली आपल्याला दिसते. रवीन्द्रनाथ टागोर, जमिनी राय, अमृता शेर–गील, कॅथे कोलविट्झ, फ्रिडा काहलो हे कलावंत त्याची प्रातिनिधिक उदाहरणे आहेत. हे कलावंत केवळ रंजनवादी कलावंत नव्हते; तर कलेत जीवनाचे प्रयोजनमूल्य अधोरेखित करणारे कलाविचारक होते.

'सफरनामा : निवडक कलाकारांचा' या पुस्तकातून मुळात चित्रकर्ती आणि कलाअभ्यासक असलेल्या पल्लवी पंडित यांनी जागतिक स्तरावरील अशाच काही कलाकारांच्या जीवनशैलीचा, त्यांच्या कलेचा आणि त्यामागील असलेल्या कलाविचारांचा धांडोळा अतीव चिकित्सकतेने व तितक्याच सूक्ष्मपणे घेतला आहे. कला आणि संस्कृतीच्या सर्वच अभ्यासकांना आणि जिज्ञासू वाचकांनाही हे पुस्तक मार्गदर्शन ठरेल असे मला वाटते.

**– प्रमोदकुमार अणेराव**




# ग्रंथपरिचय



**डॉ. निर्मोही फडके**
**९९२०१ ४६७११**

**संत तुकारामांचा संतविषयक दृष्टिकोन**
**डॉ. रवींद्र बेम्बरे**




'आकाशाएवढा तुका'. आजही आपल्याला वेगवेगळ्या स्वरूपांतून काही ना काही देतच आहे. संत तुकारामांचे किंवा त्यांच्या अभंगांचे भक्त, अभ्यासक, प्रेमी, त्यांच्या साहित्य-पालखीचे भोई आणि कदाचित काही टीकाकार ह्या सगळ्यांवरच 'तुकाराम' नावाचे गारूड पसरलेले दिसते. साधू आणि संत ह्यांच्याबद्दल तुकोबांनी केलेल्या चिंतनाचा वेध 'संत तुकारामांच्या अभंगातील संतमाहात्म्य' ह्या पुस्तकात लेखक डॉ. रवींद्र बेम्बरे ह्यांनी घेतला आहे.

सुप्रसिद्ध लेखक इंद्रजित भालेराव ह्यांनी ह्या पुस्तकाकरता लिहिलेल्या ब्लर्बमध्ये म्हटल्याप्रमाणे, 'या लेखनाला भावनेचा ओलावा असला तरी शास्त्रकाट्याची संशोधन कसोटी तंतोतंत पाळलेली दिसते.' म्हणूनच एक संदर्भ-पुस्तक म्हणूनही ते महत्त्वाचे वाटते. अभ्यासपूर्ण मुद्यांना योग्य तिथे रसपूर्ण, माहितीपूर्ण केल्यामुळे संतसाहित्यावरच्या लेखनात त्याबद्दल समतोल असल्याचे प्रत्ययास येते.

संत, साधू ह्या संकल्पनांचा मागोवा घेत ह्या पुस्तकातील मुख्य विषयाची सुरुवात होते. त्यामध्ये संस्कृत भाषेतील व्युत्पत्ती, महाभारतातील दाखले, कोशांमध्ये अंतर्भूत अर्थ इत्यादी मुद्यांचा समावेश आहे. मुळात आजच्या विज्ञानवादी, तंत्रज्ञानावर आधारित, वस्तुनिष्ठ विचारसरणींचा प्रभाव असलेल्या, बुद्धिनिष्ठ जगात 'संत' ही संकल्पना बुरसटलेली झाली असावी, नव्हे झालीच आहे. अशा 'आऊटडेटेड' संकल्पनेकरता कोणी, का इतके लिहावे? तेही साडेतीनशे वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या एका संताच्या दृष्टिकोनातून, असा प्रश्न निर्माण होणे साहजिकच आहे. ह्या प्रश्नाचे उत्तर ह्या पुस्तकाच्या वाचनात सापडत जाते. संत म्हणून ज्यांना उपाधी लावली गेली, त्या व्यक्तींनी आयुष्यभर ज्या ज्या नकारात्मक गोष्टींपासून समाजाला दूर करण्याचा प्रयत्न केला, त्या गोष्टी आजही तशाच आहेत, किंबहुना त्यांच्यामध्ये वाढ झाली आहे. म्हणूनच अशा संतविचारांकडे अभ्यासकांची, सर्जकांची आणि रसिकांचीही मने, विचार पुन्हा पुन्हा वळतात.

संत तुकाराम ह्यांचे अभंग म्हणजे मराठी साहित्यपटलावरची लखलखीत नक्षत्रे आहेत. त्यांचे देणे अमूप. प्रत्येक जण आपापल्या वकुबानुसार त्यातले काही कण ओंजळीत घेतो. ह्या पुस्तकात तुकोबांच्या संतविषयक दृष्टिकोनांबद्दल ऊहापोह करताना लेखकांनी आधी संतसाहित्यातले संतविषयक चिंतन अगदी थोडक्यात मांडले आहे. त्यामुळे वाचकांसमोर आपोआपच मुख्य विषयाची एक उत्तम पार्श्वभूमी तयार होते. त्यानंतर तुकोबांनी असंत असलेल्या व्यक्तींची जी वैशिष्ट्ये अभंगांमधून सांगितली आहेत, त्याबद्दल विवेचन केले आहे.

नव्हती ते संत करिता कवित्व।
संताचे ते आप्त नव्हती संत ।।
नव्हती ते संत करिता कीर्तन ।
सांगता पुराणें नव्हती संत ।।
किंवा
अनंत लक्षणे वाणिता अपार।
संतांचे ते घर सापडेना ।
जये घरी संत राहती आपण।
तें तुह्यां ठिकाण आतुडेना ।।

वरवर संतपणाची आभूषणे घालणारा किंवा समाजाकडून घालून घेणारा संत नसतो, ते का? ह्याबद्दल अनेक दाखल्यांसह असंत आणि असंताशी असंग करण्याविषयीच्या विचारांच्या दिशा, आशयाचे पदर वाचकांसमोर उलगडले जातात.

त्यानंतर लेखक आपल्यासमोर पुढचा मुद्दा मांडतात, 'संत तुकारामांच्या दृष्टिकोनातील संत'.

अंतरी निर्मळ वाचेचा रसाळ।
त्याचे गळा माळ असो नसो ।

संत कसा असावा किंवा कसा असतो, ह्याबद्दल तुकोबांचे अभंग आणि त्याबद्दल लेखकाने मांडलेले दीर्घ चिंतन हे वाचनीय आणि अभ्यसनीय आहे.

हे पुस्तक वाचताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते, ती अशी, की काही शतकांपूर्वीचा, तुकोबाच्या काळातील बहुतांश समाज अशिक्षित होता. भाबडा होता. नाडलेला होता. अशा वेळी समाजात वाढलेल्या भोंदूगिरीची जाणीव समाजाला करून देणे ही अवघड बाब होती. अर्थात ह्या संतांच्या शिकवणुकीमुळेच तर हा समाज, इथला इतिहास, लोकजीवन, साहित्य, विचार, कला इत्यादी तरले. इंद्रायणीतून तुकोबांच्या गाथा तरणे हे एक प्रतीकात्मक वास्तवच.

संत तुकारामांच्या संतचिंतनाची प्रासंगिकता ह्या मुद्द्यावर पुस्तकाच्या शेवटच्या भागात प्रस्तुत केलेले विचार वाचकांसमोर तुकोबांच्या संतविषयक रचनांचे नवे पैलू घेऊन येतात.

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगातही फसवेगिरीचे प्रमाण वाढलेले दिसत आहे. धार्मिक भोंदूगिरीमध्ये तंत्रज्ञानातील आधुनिक भोंदूगिरीचीही भर पडली आहे. तथाकथित सुशिक्षित समाज ह्या फसवेगिरीला बळी पडत आहे. म्हणूनच समाजशिक्षकाची भूमिका नैसर्गिकपणे पार पाडणाऱ्या तुकोबांसारख्या संतांची, त्यांच्या पारदर्शी आणि सत्याची धार असलेल्या विचारांची रुजवात होणे आवश्यक आहे. संतसाहित्य कालबाह्य नाही, तर समकालीन जीवनप्रवाहाला नितळ करणारे आहे, ह्या भाव-विचारांच्या संवेदना हृदय आणि बुद्धी ह्यांच्या एकत्रित मिलापातून ह्या पुस्तकातून स्पष्टपणे अधोरेखित होतात.


**'संत तुकारामांचा संतविषयक दृष्टिकोन'**
**डॉ. रवींद्र बेम्बरे**
पद्मगंधा प्रकाशन
मूल्य २६० रुपये

# ग्रंथपान



**चांगदेव काळे**
**९८६९२०७४०३**

**मित्रास्त**
**के.ज. पुरोहित**




**अस्ताचल समयीच्या सुवर्णरेखा**

''मराठी साहित्यात व्यक्तिचित्रांची परंपरा दीर्घ आणि समृद्ध आहे. स्वतंत्र लेखन प्रकार म्हणून अस्तित्वात असलेली म्हणजेच कोणत्याही प्रकारच्या अन्य लेखनाचा घटक नसणारी व्यक्तिचित्रे मराठीत विपुल आहेत. ही व्यक्तिचित्रे लेखकाच्या अनुभवाचा स्पर्श घेऊन साकार होत असतात. विशिष्ट नातेसंबंध, विशिष्ट भूमिका, विशिष्ट घटना, प्रसंग यासह लेखक त्या व्यक्तीकडे पाहत असतो. बाह्यरूपापासून अंतरंगापर्यंत त्या व्यक्तीला जाणून घेऊन शब्दबद्ध करत असतो. सापेक्ष आणि अन्यसापेक्ष अशा दुपदरी भूमिकेतून ती व्यक्ती लेखक शब्दबद्ध करत जातो. असे करताना त्या व्यक्तीच्या गुणदोषांची कधी अलवार तर कधी परखड चिकित्सा केली जाते. परिणामी त्या व्यक्तीचे मूल्यमापनही होते.''

सुप्रसिद्ध साहित्यिक के.ज. पुरोहित ऊर्फ शांताराम यांची १५ जून २०२३ रोजी जन्मशताब्दी झाली. याचे औचित्य साधून 'ग्रंथाली'ने एक सोहळा दिवसभरासाठी मुंबईत आयोजित केला आणि शांताराम यांच्या साहित्यासह एकूण मराठी साहित्याचा जागरोत्सव साजरा केला. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी आणि नियोजित अध्यक्ष भारत सासणे, नरेंद्र चापळगावकर आणि डॉ. रवींद्र शोभणे यांच्यासह डॉ. अभय बंग आणि इतर अनेक मान्यवर साहित्यिकांनी या उत्सवात सहभाग नोंदवला. या कार्यक्रमात शांताराम यांच्या 'मित्रास्त' या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मित्रास्त या पुस्तकाची सिद्धता व्हावी यासाठी डॉ. श्रीरंग पुरोहित, डॉ. रवींद्र शोभणे, डॉ. सुरेखा सबनीस आणि ग्रंथाली यांचा पुढाकार महत्त्वाचा ठरला. शांताराम यांनी लिहिलेले आणि त्याच्या हयातीत प्रसिद्ध झालेले लेख या पुस्तकात संकलित करण्यात आलेले आहेत. हे सर्व लेख त्यांच्या अनेक मित्रांपैकी काही निवडक एकवीस मित्रांवर प्रसंगपरत्वे, विशेषतः मृत्यूनंतर लिहिलेले लेख (मृत्युलेख नव्हेत) आहेत. साहित्यिक आणि समीक्षक डॉ. रा.भा. पाटणकर यांच्यावरील लेखास 'मित्रास्त' असे शीर्षक आहे, तेच या संग्रहास दिलेले आहे. त्यातून शब्दाच्या चपखलपणाचा परिचय होतो. डॉ. सुरेखा सबनीस यांनी वरीलप्रमाणे प्रस्तावनेत व्यक्त केलेले अभ्यासपूर्ण मत या पुस्तकातील सर्वच लेखांना लागू होते, तेही चपखलपणेच. पु.भा. भावे हे तसे पुरोहित यांच्यापेक्षा वयाने मोठे, नवकथेच्या शिल्पकारांपैकी एक सुप्रस्थापित कथाकार. तरीही त्यांना नवनवीन लेखकांच्या विषयी त्यांची ओळख असो वा नसो, निरनिराळ्या संपादकांकडे चांगले बोलण्याची सवय शेवटपर्यंत होती. त्यांच्याकडे प्रांजळपणाही होता; परंतु त्याचवेळी त्यांच्या ठायी व्रात्यपणा होता. पाणउतारा करण्यातही ते मागेपुढे पाहत नसत. त्यामुळे अनेक माणसे दुखावली गेली. अशावेळी दुखावलेली मने जोडण्यासाठी स्वतः पुढाकार घेत. स्वतःकडे लहानपण घेत. ते रोमांचवादी होते. अशी भावेंच्या स्वभावाची ओळख करून देताना के.ज. पुरोहित त्यांच्या अंतरंगाचा शोध घेतात. त्यासाठी त्यांचे वैयक्तिक आयुष्य, कौटुंबिक आयुष्य यांच्या तळाशी जातात. आवड, छंद यांच्या कलाने वेध घेतात आणि एक वाक्य लिहून जातात, 'भावे कसली तरी जखम नेहमीच उराशी बाळगून जगत होते असे मला वाटत आले आहे.'

कथारमण अरविंद गोखले एक मोठे कथाकार. फक्त कथा याच साहित्यप्रकाराची बांधिलकी असल्यासारखे कथालेखन करत राहिले. पण कथा समजावून घेणारा त्यांच्यासारखा मोठा वाचक निराळा, असे के.ज. पुरोहित त्यांचे वर्णन करतात. अरविंद गोखले यांची स्वभाववैशिष्ट्ये टिपताना ते लिहितात, 'अचानक बोलणे थांबवणे, अचानक रस्त्याला लागणे, या लकबीमुळे गोखले कायम रहस्यासारखे वाटत राहिले.'

सुप्रसिद्ध गझलकार सुरेश भट हे पुरोहित यांचे विद्यार्थी. सुरेश भटांचा गझललेखनाचा प्रवास त्यांना मिळालेले सन्मान यासाठी के.ज. पुरोहित यांनी घेतलेली मार्गदर्शकाची भूमिका महत्त्वाची आहे. तसेच, सुरेश भटांचा स्वभाव, त्यांच्या आवडी आणि देहबोली यांच्याविषयीदेखील अतिशय स्पष्टपणे लिहिलेले आहे. यातून एक व्यक्ती म्हणून आणि कवी म्हणून सुरेश भट दोन रूपात आपल्यासमोर उभे राहतात. गंगाधर गाडगीळ यांच्याशीदेखील के.ज. पुरोहित यांचा अतिशय जिव्हाळ्याचा आणि आत्मीयतेचा स्नेहबंध जुळलेला होता. साहित्य सहवासमध्ये येण्यापूर्वीचा आणि आल्यानंतरचा हा बंध अधिक दृढ होत गेला तसा तो या साहित्य सहवासामध्ये असलेल्या रा.भा. पाटणकर, मं.वि. राज्याध्यक्ष यांच्यासारख्या अनेक इतर साहित्यिकांशीदेखील त्याच तऱ्हेने जोडला गेलेला आहे. गंगाधर गाडगीळ यांचे साहित्यिक गुण, त्यांच्या नवलेखन विषयीची कल्पना आणि इतर लेखन याचा खूप सुंदर असा वेध पुरोहित यांनी घेतलेला आहे. वि.भि. कोलते, वामनराव चोरघडे, शरद्चंद्र मुक्तिबोध, अनंतराव कुलकर्णी, सीताकांत लाड, माधव मोहोळकर, नाना जोग, भारती, राजा बढे, डॉ. सुरेंद्र बारलिंगे, बा.भ. बोरकर, अशी सर्वच मंडळी थोर आणि आपापल्या क्षेत्रात लौकिक असलेली. त्यांच्यावरील लेखांचा यात समावेश आहे.

के.ज. पुरोहित यांचे हे लेख म्हणजे मित्रांविषयी असलेली ओढ, आत्मीयता, जवळीक, त्यांचे श्रेष्ठत्व, त्यांचे स्वभाव, स्वभावातील गुणदोष, या सगळ्यांचा ते तटस्थपणे नोंद घेतात.

के.ज. पुरोहित यांची शैली ही प्रसन्न आहे. आपण हे लेखन वाचत राहतो तेव्हा पूर्णपणे त्या लेखनाशी एकरूप होत जातो. मुखपृष्ठावर के.ज. पुरोहित यांचा प्रसन्न फोटो आहे, ती कल्पना देबज्योती कुंडू यांची आहे.

**मूल्य ३०० रुपये   सवलतीत २०० रुपये**

# ग्रंथपान

**रानभुलीचा प्रदेश**

**विजयालक्ष्मी मणेरीकर**




**गाणे उलगडत जाते तेव्हा**

''नक्षत्रांचे देणे प्रत्येकासाठी वेगळे असते. प्रेममय सहवास हाही नक्षत्रांचे देणे असतो. ब्रह्मांडातील अगणित तारे-तारका, ग्रहताऱ्यांचे समूह आकाशमंडळात दिसतात. त्यातील आपल्याला कोणते लाभते याची जाणीव आपल्याला नसते. नक्षत्रांच्या समूहात जसे अनेक ज्ञात-अज्ञात ग्रह आकाशात फिरत असतात तसे आपल्या आयुष्यातही अनेक ज्ञात-अज्ञातांचा कळत-नकळत आपल्यावर परिणाम होत असतो; पण आपले आयुष्य लखलखीत करणारे, आनंदवून टाकणारे एक असे नक्षत्र आपल्याला लाभलेले असते ते आपण ओळखले पाहिजे, आणि त्यासाठी प्रेमाने मनमुक्त गीत आपण गायले पाहिजे. नाहीतर 'माझ्यापास आता कळ्या आणि थोडी ओली पाने' अशीच आपली गत होते.''

पं. हृदयनाथ मंगेशकर यांची ओळख गायक आणि संगीतकार अशी सर्वज्ञात आहे. कुठेही, केव्हाही आपण त्यांना ऐकतो तेव्हा पटकन लक्षात येते हे पं. हृदयनाथ मंगेशकर आहेत. त्याचे कारण त्यांचा वेगळा आवाज, त्यात आरोहअवरोहाची वेगळी खुमारी आणि संगीतातून भावभावना, पार्श्वभूमीचे वातावरण, यांचे आपोआप नजरेसमोर उभे राहणारे दृश्य! तरी आपण फारसे खोलात जात नाही. कानांत रुंजी घालणारे गाणे मात्र सहजपणे गुणगुणत राहतो. परंतु त्यांच्या शिष्या, उत्तम गायिका आणि संगीताची उत्तम जाण असणाऱ्या कवयित्री विजयालक्ष्मी मणेरीकर यांनी पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या या गायन, संगीत आणि निवडलेली कविता (गाणी नव्हे) यांचा नातेसंबंध कसा आहे, याचा धांडोळा घेतलेला आहे. हा एक प्रयत्न म्हणजे एका गोडरम्य गुहेत प्रवेश करणे आणि तिच्यातून आपणास रमणीय भासणारे नाजूक पुष्प अलगदपणे आपल्या कोमल ओंजळीत घेऊन गुहेच्या बाहेर येण्यासारखा म्हणता येईल. यात उत्सुकता, कुतूहल, साहस आणि आनंद यांचा समावेश आहे. या गुहेला त्यांनी नाव दिले आहे, 'रानभुलीचा प्रदेश', त्याचे स्पष्टीकरण देताना त्या म्हणतात, 'पंडितजींची गाणी ऐकतो तेव्हा आपल्याला रानभूल पडते. हे प्रत्येक गाणं म्हणजे रानभुलीच्या चकव्यागत आहे.'

पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी गायलेली, संगीत दिलेली अशी एकूण गाण्यांची वर्गवारी आणि त्यांची संख्या लेखिकेने पुस्तकाच्या चौथ्या भागात दिलेली (पृ. क्र. ११४ ते १३७) आहे. या सगळ्याच गाण्यांच्या प्रदेशाविषयी चिंतनशील लेखन या पुस्तकात अपेक्षित नाही परंतु या पुस्तकाच्या पहिल्या भागात (पृ. क्र. ३ ते ८०) सुमारे वीस गाण्यांचा समावेश आहे. ते कवितेची निवड कशी करतात, तिचा भाव आणि त्यास अनुसरून येणारे वातावरण यांचा समन्वय चपखलपणे व्यक्त व्हावा यासाठी वाद्यांची निवड कशी करतात, आणि शेवटी दिलेली चाल कशी असेल, असे हे टप्पे आहेत. हे टप्पे म्हणजे एका गाण्याच्या जन्माची थोडक्यात सांगितलेली कहाणी म्हणता येईल. उदाहरणार्थ, 'ये रे घना ये रे घना....' ही १९६९ साली 'दिवेलागण' या संग्रहात प्रसिद्ध झालेली कविता. ही कविता आरती प्रभूंच्या वैयक्तिक जीवनाचे संदर्भ घेऊन आलेली कविता आहे. पंडितजी तिच्या तळाशी जातात आणि स्वररचनेच्या अशा छटा तिला बहाल करतात की आपण ऐकताना एका वेगळ्याच रानभुलीच्या प्रदेशात जातो. ही स्वररचना कशी आहे, पहिले आणि दुसरे कडवे यात काय फरक आहे, स्वर वेगळे कसे आहेत, यांचे मर्म लेखिका उघडून दाखवतात तेव्हा लक्षात येते, कविता गाणे होऊन येते तेव्हा ती एकटी नसते. कवी शब्दांतून व्यक्त होतो, गाणे स्वरांतून साकार होते आणि तिथे स्वररचना करणारा कलावंत परीसस्पर्श घेऊन तिच्या पाठीशी उभा असतो. लेखिका प्रत्येक गाण्याच्या प्रदेशाविषयी लिहितात. कवी, कविता, राग, आवश्यक तिथे स्वररचना, आरोहअवरोहातील बदल, असा संपूर्ण तपशील प्रत्येक लेखात दिलेला आहे. शांता शेळके यांची कोळीगीते, सुरेश भटांच्या गझला, आरती प्रभू, मंगेश पाडगावकर, वसंत बापट, भा.रा. तांबे यांच्या कवितांची येथे निवड केलेली आहे. या सगळ्यांच्या कवितांना लता मंगेशकर, आशा भोसले यांचा स्वरसाज लाभलेला आहे. ही सगळी गाणी अजरामर झाली परंतु त्यापाठी पं. हृदयनाथ मंगेशकर यांची मोठी तपश्चर्या आहे. जे सहज, सोपे, सरळ, रेषेतले आहे त्याचा स्वीकार न करता स्वतःच्या प्रतिभेने अनवट वाटा शोधून अवघड वाटावा अशा प्रदेशाचा हव्यास आहे. त्यासाठी स्वत:वरचा आत्मविश्वास आणि लाभलेले अलौकिक दैवी प्रतिभा, यांचा अद्भूत आविष्कार आहे. सुप्रसिद्ध संगीतकार दत्ता डावजेकर याविषयी लिहितात, 'हृदयनाथ यांच्या चाली शुद्ध तुपासारख्या शुद्ध आहेत. भारतीय शास्त्रीय संगीतातून स्फुरलेल्या चाली, पण पद्धत मात्र सर्वस्वी भिन्नभिन्नच! हाच त्यांच्या चालींचा आत्मा व सौंदर्य आहे!'

रा.ग. जाधव, राम शेवाळकर, शांता शेळके, अरुणा ढेरे, द.भि. कुलकर्णी, ग्रेस, अरविंद गजेंद्रगडकर, यांच्यासारख्या थोर साहित्यिक, विचारवंतांनी पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या प्रतिभेचे कौतुक कसे केलेले आहे, यांचेही संदर्भ लेखिकेने या लेखांमध्ये दिलेले आहेत.

'विजयालक्ष्मी मणेरीकर या कवयित्री आहेत. 'लक्ष्मीमंगेश' या टोपणनावाने 'हृदयरंग', 'क्षेमालागी जीव', 'लागीर', हे त्यांचे कवितासंग्रह प्रकाशित आहेत. नियतकालिकांतून त्यांचे लेखन नियमितपणे सुरू आहे. शिक्षणक्षेत्रात विविध पदांवर त्यांनी काम पाहिलेले आहे. पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या संगीतावर अभ्यास हा त्यांच्या संशोधनाचा विषय आहे. या पुस्तकातील सर्व लेख हे पूर्वप्रकाशित आहेत. त्यांना संशोधनाचा, पूर्णत्वाचा आकार प्राप्त झालेला आहे, त्यामागे हा अभ्यास आहे. त्यांच्या भाषेला संगीतासारखाच स्वतःचा साज आहे. नेमकेपणाने मांडणी केल्यामुळे आणि संदर्भांची त्यांना जोड दिल्यामुळे हे संपूर्ण पुस्तक संगीतक्षेत्रातील एका प्रतिभावान व्यक्तीचा सुंदर संगीतमय परिचय करून देते. पं. हृदयनाथ मंगेशकर, मिलिंद जोशी, शैलेंद्र तानपुरे, अच्युत गोडबोले यांचे अभिप्राय या पुस्तकाला लाभलेले आहेत. रानभुलीचे आशय सार्थ ठरवणारे मुखपृष्ठ महेश खरे यांनी सजवलेले आहे.

**मूल्य २५० रुपये सवलतीत १५० रुपये**

# ग्रंथपान

## चॉईसेस

**मृणाल कुलकर्णी**




**शोध नेमकेपणाचा**

''कलाकारावर एक फार महत्त्वाची जबाबदारी असते आणि ती म्हणजे अनेक अनेक प्रतिमा निर्माण करणे. अस्तित्वात नसलेल्या व्यक्तिरेखा आहेत, असा पक्का आभास! त्या प्रतिमा निर्माण करायला लागणारं साहित्य आसपास उपलब्ध असतं. आपण कसे जगतो, काय पाहतो, वाचतो, आपली निरीक्षणं आणि अनुभव यातूनच त्या प्रतिमा तयार होतात. पण सावधान! या प्रक्रियेत नटांनी आपल्या खाजगी आयुष्यात घडणाऱ्या घटनांना या प्रक्रियेपासून दूर ठेवणं आवश्यक असतं. वैयक्तिक राग, लोभ यांना बाजूला ठेवणंही तितकंच महत्त्वाचं. अशा कलाकारांच्या विचारमंथनातून, प्रतिमेतून ज्या प्रतिमा सहजपणे निर्माण होतील त्याच खऱ्या व्यक्तिरेखा!''

कलावंत हा कलेच्या आकाशातला एक चमकता तारा असतो. त्याच्याकडे पाहताना आपण रसिक म्हणून त्याच्या तेजाचे कौतुकच करत असतो, परंतु कलावंताला एकाच वेळी भास आणि वास्तव यांचा विस्तव सतत हाती घेऊन स्वतःला सिद्ध करण्याची अग्निपरीक्षा प्रत्येक प्रयोगागणीक द्यावी लागते. त्यातला महत्त्वाचा भाग असतो त्याचे तळपणे. परंतु त्याचवेळी तो एक कलावंताच्या आत माणूस असतो, सर्वसामान्य माणसांसारखा. कुटुंब, नाती, जबाबदारी या चक्राच्या गतीत सापडलेला. या दोन पातळ्यांवर तो कसा स्वतःला सिद्ध करतो, हे फक्त त्यालाच ठाऊक असते. रसिक म्हणून आपण त्याबाबत अनभिज्ञ असतो. म्हणूनच त्याच्याविषयी कौतुक असते तसे कुतूहलही असते. अनेक कलावंतांची चरित्रे–आत्मचरित्रे रसिकांकडून स्वागतास पात्र ठरतात ती याच भूमिकेतून! त्यातून कलावंत स्त्री असेल तर स्वागताच्या तोरणांमध्ये अधिक फुलांची भर पडलेली असते.

'चॉईसेस' हे लिव्ह उल्मन या पाश्चात्य अभिनेत्रीचे आत्मकथन! लिव्ह अभिनेत्री म्हणून नावलौकिकास पात्र ठरलेली, अनेक भूमिकांचा अनुभव गाठीशी असल्याने अभिनय, दिग्दर्शन त्यामागील वातावरण यांच्या कसदार अनुभवांनी समृद्ध झालेली. भूमिका साकारताना लागणारा कस आणि दिग्दर्शकाने त्यासाठी घ्यावयाची मेहनत याबाबत तिची जाण पराकोटीची आहे. त्यातच प्रसंगी लेखन करण्याची प्रतिभा असलेली. त्या दृष्टीने पाहिले तर लिव्ह ही अभिनय, दिग्दर्शन आणि लेखन यांचे वरदान लाभलेली गुणी, प्रतिभावान अभिनेत्री आहे. त्यामुळे याबाबतची तिची भूमिका आणि मते ठाम आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरील शिक्षण, स्वास्थ्य यासाठी कार्य करणारी 'युनिसेफ' ही संस्था. या संस्थेने सदिच्छादूत म्हणून लिव्हला आमंत्रित करणे हे तिच्यासाठी सामाजिक जबाबदारी पार पाडण्यासाठी एक मोठी संधी ठरते. तिची प्रसिद्धी आणि प्रतिभा यांचा योग्य वापर करण्याची कल्पकतादेखील स्तुत्यच म्हणायला हवी. अभिनयक्षेत्रात लिव्ह जितक्या मनापासून, समरसतेने स्वतःला झोकून देते त्याच तऱ्हेने वेगवेगळ्या देशातील गरजूंपर्यंत पोहोचण्याचे कार्य तळमळीने पार पाडण्यात ती कसूर ठेवत नाही. या सामाजिक कार्याने तिला स्वतःची एक वेगळी ओळखदेखील होत जाते.

वैयक्तिक आयुष्य हा तिचा हळवा कोपरा आहे. आपला जोडीदार एबेल आणि मुलगी लिन यांच्यावर तिचे उत्कट प्रेम आहे; परंतु त्यांच्या अपेक्षा आणि कल्पना यांच्याशी जुळवून घेणे तिच्यासाठी एक संकट ठरते. जोडीदाराने आपल्याला सोडून जाऊ नये यासाठी तिची धडपड, मुलीच्या भवितव्यासाठी तिला हॉस्टेलवर ठेवण्याचा निर्णय आणि स्वतःचे अभिनय व सामाजिक कार्य या सगळ्यात ती आंतरिक गुरफटली जाते, अस्वस्थ होत जाते. यातले नेमके कोणते निवडावे आणि आहे या सगळ्यांपासून वेगळे न होण्याची इच्छा असूनही असे सांभाळावे, हा पेच तिला सतत छळत राहतो. आवड आणि जबाबदारी अशा दोन ध्रुवांचा आस म्हणून ती उभी असलेली दिसून येते.

'चॉईसेस' या आत्मकथनात लिव्हचे जग वेगळे आहे. त्याच्या केंद्रस्थानी तीच आहे आणि त्यातून ती स्वतःचा शोध घेत आहे. स्वतःच्या जगण्याला ती जशी समजून आहे तशी ती तिच्या समोर असलेल्या व्यक्तीलाही त्याच्या अंतरंगाच्या तळाशी जात सम जून घेण्याचा प्रयत्न करते.

हे आत्मकथन असल्याने लिव्ह ही आपल्याशी संवाद साधते ते आत्मनिवेदनातून. परंतु हे निवेदन म्हणजे पारंपरिक सलग कथानक नाही, तर हे स्वचिंतन आहे. प्रत्येक व्यक्ती, घटना, प्रसंग व विचार यांच्याशी जोडलेले, त्यातून कधी वर्तमान तर कधी भूतकाळाशी जोडलेले, अनुभवांचे आयुष्यातील तुकडे, अशा तऱ्हेने. त्यातही चिंतनाचा भाग अधिक आहे. विचारांची झेप अधिक आहे. आणि त्याला जोडून इस्बेन, ब्रेख्त अशा थोर साहित्यिकांच्या विचारांची साथ आहे. हा सुंदर गोफ मोहून टाकणारा आहे. एक व्यक्ती स्वतःशी किती सुंदर संवाद करू शकते, स्वतःला तपासून पाहू शकते आणि विचारांचा गोफ कसा सुंदरपणे गुंफू शकते यांचा अनुभव हे आत्मकथन देते.


मृणाल कुलकर्णी प्रथम आपल्या परिचयाच्या झाल्या त्या 'स्वामी'मधील 'रमा'च्या शालीन भूमिकेतून. मग पुढे त्या भेटतच राहिल्या सुंदर गुणी अभिनेत्री, कुशल दिग्दर्शक आणि शैलीदार लेखक म्हणून, एक संवेदनशील, भावनाप्रधान, संस्कारित व्यक्ती म्हणून. त्या अर्थाने म्हणायचे तर एका गुणी, कुशल आणि कसदार अशा समृद्ध व्यक्तीने तिच्याच सर्व पैलूंशी समांतर असलेल्या लिव्ह उल्मनचा जीवनप्रवास तिच्याच शब्दात उत्तमपणे उलगडून दाखवलेला आहे. हे भाषांतर नाही तर स्वैर अनुवाद आहे. मृणाल कुलकर्णी या अशा लेखिका आहेत ज्यांची लेखनशैली मोहवणारी, प्रवाही आणि तितकीच संवादी आहे. मूळ संहितेला समजून, तिच्या कर्तीला नीट समजून, तिचा भावभावनांचा, संवेदनाचा संपूर्ण अर्क आपला आहे, असे समजून केलेले लेखन आहे; आणि ते पूर्णपणे मृणाल कुलकर्णी यांचे आहे.

सुप्रसिद्ध अभिनेते डॉ. मोहन आगाशे यांची प्रस्तावना या पुस्तकाला लाभलेली आहे. कला, साहित्य, रसिकता आणि अभ्यास यांचा सुंदर संगम म्हणजे ही प्रस्तावना. या आत्मकथनासाठी लिव्ह उल्मनची सुंदर बोलकी प्रतिमा मुखपृष्ठासाठी योजलेली आहे. सतीश भावसार यांची ही कल्पकता सुंदरच!

**मूल्य ३५० रुपये सवलतीत २०० रुपये**

# ग्रंथपान

**योग: कर्मसु कौशलम्**
**शिल्पा जितेंद्र खेर**




**समृद्ध स्वास्थ्याची गुरुकिल्ली**

'जीवनातील क्लेश ज्याद्वारे दूर होतात तो क्रियायोग. क्रियायोग म्हणजे श्वासाचे किंवा शरीराचे प्रकार नव्हेत, तर क्रियायोग म्हणजे दृष्टिकोनातील फरक आहे आणि यशस्वी आयुष्याकरता हा प्रत्येकाच्या जीवनात आवश्यक आहे. याकरता तप, स्वाध्याय आणि ईश्वर प्रणिधान म्हणजे प्रयत्न, चांगल्या लोकांची संगत आणि चांगल्या गोष्टींचे पुन्हा पुन्हा मनन, परमेश्वराठायी पूर्ण निष्ठा गरजेची असते. म्हणजेच आयुष्यात आलेल्या कुठल्याही प्रसंगावरून परमेश्वराला नावे न ठेवणे, तर जो प्रसंग आला आहे त्याला पुढे जाण्याकरता उपयोग करून घेणे.'

योग, कर्म आणि कौशल्य हे तीनही शब्द वेगळेवेगळे आहेत, त्यांना सूत्र या व्याख्येत बसवणे जास्त सयुक्तिक ठरते. आपले स्वास्थ्य (शारीरिक, मानसिक आणि सामाजिक) उत्तम राखायचे असेल तर या सूत्रांना पर्याय नाही; परंतु त्यांच्याशी आपला परिचय पूर्णपणे नसल्यामुळे जी अपूर्णत्वाची भावना निर्माण होते तिला कारण हेच. योग्य दिशेने मार्गदर्शन झाले, त्यांचा अर्थ नीट समजावून घेतला, योग्य – अयोग्य यातील फरक लक्षात आला तर योग, कर्म आणि कौशल्य यांचे महत्त्व आपोआपच सिद्ध होते. परंतु अशा सूत्रांचा अभ्यास विद्यापीठातून होत नसतो तर त्यासाठी संस्कृती, अध्यात्म आणि भगवद्गीतेसारख्या थोर ग्रंथांकडे आपल्याला आश्रय मागावा लागतो. असेही लक्षात येते की अनेक चुकीच्या समजूती आणि व्यर्थ कल्पनांमुळे यापासून दूर राहण्याचा प्रयत्न होतो. परिणामी आपण स्वतःचेच नुकसान करून घेत राहतो. अशा वागण्याला मूढ म्हटले जाते आणि असे मूढत्व आल्यास आपल्या ऱ्हासाला आपणच जबाबदार ठरतो. असे होऊ नये म्हणून नेहमी श्रीकृष्ण आणि अर्जुन यांचे युद्धावरील उदाहरण समोर ठेवले जाते. ते उदाहरण किती समर्पक आणि जीवनव्यापी आहे याचा अनुभव सर्व जग घेत आहे. शिल्पा खेर यांनी हेच सूत्र समोर ठेवून त्या मूढत्वाला दूर करण्याचा आणि ध्येयाला गवसणी घालण्याचा प्रयत्न व्हावा, या हेतूने या ग्रंथाची निर्मिती केलेली आहे.

'योगः कर्मसु कौशलम्' हे बोधवाक्य भगवद्गीतेमधील दुसऱ्या अध्यायातील ४८ ते ५० या तीन श्लोकातील आहे. भगवद्गीता 'कर्म' सूत्रावर अधिक भर देते आणि त्याच्या जोडीला योग आणि कौशल्य यांचे कोंदण उभे करते. यांचा अर्थ समजून घेणे वाटते तितके सोपे नाही; परंतु ते सोपे करून सांगणेही कठीण नाही, हे शिल्पा खेर यांच्या ग्रंथातून लक्षात येते. त्यांनी हा ग्रंथ साध्या आणि रसाळ पद्धतीने उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. यासाठी ग्रंथाची आठ विभागांत विभागणी केलेली आहे. पृष्ठ क्रमांक ४२ वर कर्म आणि कर्माचे प्रकार त्या समजावून सांगतात. कर्म म्हणजे कार्य. ते नैसर्गिक, अनुकरण करून केलेले ,मार्गदर्शनानुसार होणारे, गरजेपोटी होणारे, अशी त्यांची विभागणी होते. परंतु हे कार्य करत असताना आपण कोणत्या बाबी लक्षात घ्यायला हव्यात, हे महत्त्वाचे ठरते. यात आपली आवडनिवड हा महत्त्वाचा भाग ठरतो तसाच त्या कार्याचा हेतू आणि त्याचे मूल्यांकन व परिणाम पाहायला हवेत. लेखिका हा भाग उपदेशाच्या भूमिकेतून मांडत नाहीत तर आपल्या आतील मूळ अस्तित्वाला प्रकट करण्याच्या वर्तन व कृती यावर भर देतात.

योगांचे महत्त्व हे शारीरस्वास्थ्यासाठी आवश्यक आहे असे स्पष्ट करण्यासाठी लेखिका त्यांचे आठ प्रकार : (पृष्ठ क्रमांक ६४ पासून) यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधी आहेत, त्यांचे स्पष्टीकरण करताना त्याच्या प्रत्येक कृतीला कसा अर्थ आहे ते समजावून सांगतात. यांच्याच जोडीला क्रियायोग, पंचकोश संकल्पना, पंचमहाभूते संकल्पना, सर्व खल्विदं ब्रह्म, आणि अत्त दीप भव यांचेही महत्त्व त्या या ग्रंथात आपल्यासमोर ठेवतात.

हा ग्रंथ एक उत्तम, सोपासहज आणि रसाळ शैलीत लिहिलेला असून सहज आकलन होईल असा आहे. अनेकदा असे ग्रंथ भाषेतील पांडित्य आणि क्लिष्टता यामुळे वाचकांच्या अभिरुचीपासून दूर राहतात; परंतु संग्रही असावा असा संदर्भग्रंथ आहे. याचे कारण असे, की लेखिकेने केवळ श्लोकांचे अर्थ आणि शब्दांचे अर्थ स्पष्ट केलेले नाहीत, तर ते करत असताना आपल्या दैनंदिन व्यवहारातील अनेक उदाहरणे, दृष्टांत देऊन त्यांचे महत्त्व अधोरेखित केलेले आहे. आपले सर्व वेद, उपनिषदे, महाभारत, भगवद्गीता यांचा तौलनिक अभ्यास करून त्यांचे अनेक संदर्भ या ग्रंथात दिलेले आहेत. अनेक थोर संत आणि ऐतिहासिक व्यक्ती यांचे संदर्भ दिलेले आहेत. हा ग्रंथ साकारण्यासाठी त्यांनी वाचन, चिंतन आणि विचार या पातळीवर किती मेहनत घेतलेली आहे, याचा प्रत्यय हे संदर्भ वाचताना लक्षात येतो. त्याच जोडीला त्यांनी दिलेली सोपी सोपी सहज आकलन होतील अशी उदाहरणे आपल्याला थेट त्यांना जे सांगायचे आहे त्या ध्येयाच्या मुळाशी घेऊन जातात. बदकांच्या अंड्यात राजहंसाचे अंडे मिसळले तर, कोंबडीच्या अंड्यात गरुडाचे अंडे मिसळले तर त्यातून जन्माला आलेल्या पिल्लाचे वागणे इतरांच्या तुलनेत कसे राहील, त्यातून स्वतःकडे पाहण्यातला त्याचा न्यूनगंड कसा निर्माण होईल, आणि नंतर होणारा साक्षात्कार हा कसा असू शकतो, अशी उदाहरणे वाचत असताना त्या त्या क्रियेचा अर्थ अधिक सकसपणे आपल्या लक्षात येतो.

शिल्पा खेर या उत्तम लेखिका आहेत. देशप्रेम, शिक्षण आणि संस्कृती यांच्या आशयाशी जुळणारे त्यांचे साहित्य प्रकाशित झालेले आहे. त्या सामाजिक उत्तरदायित्वाचे भान जपणाऱ्या कार्यकर्त्या आहेत. 'भाग्यश्री' या त्यांच्या फाउंडेशनतर्फे त्या विविध स्तरांतील घटकांसाठी उपक्रम सातत्याने राबवत असतात. अनेक पुरस्कारांनी त्यांच्या या कर्तृत्वाची नोंद घेतली गेली आहे.

सुप्रीम कोर्टाचे माजी न्यायमूर्ती बी.एन. श्रीकृष्ण यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना या ग्रंथाला लाभलेली आहे. संपूर्ण ग्रंथाचे सार त्यांच्या या प्रस्तावनेत सामावलेले आहे. 'योगः कर्मसु कौशलम्' या श्लोकाचा अर्थ : कुठलेही कर्म पूर्ण कौशल्य पणाला लावून मेहनतीने केले पाहिजे, परंतु त्याच्या परिणामांच्या आसक्तीत गुंतता कामा नये, असा ते स्पष्ट करतात. सकारात्मक प्रसन्न ऊर्जा देणारे मुखपृष्ठ सुप्रसिद्ध चित्रकार सतीश भावसार यांनी साकारलेले आहे.

**मूल्य ३५० रुपये सवलतीत २०० रुपये**

सुरेश वाघे यांना 'माझा सन्मान'




कोशवाङ्मयनिर्मितीबद्दल सुरेश वाघे यांचा सन्मान करताना राज ठाकरे, अभिनेते जितेंद्र, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि 'एबीपी माझा'चे संपादक राजीव खांडेकर






'नदीष्ट' पुस्तकाला लाभलेल्या पुरस्कारानिमित्त लेखक मनोज बोरगावकर यांचा सत्कार करताना 'एबीपी माझा'चे संपादक राजीव खांडेकर. सोबत सुदेश हिंगलासपूरकर आणि 'एबीपी माझा'च्या सहसंपादक भारती सहस्रबुद्धे




'ग्रंथाली Listen' – पाच ऑडिओ बुकचे प्रकाशन. डॉ. मृण्मयी भजक, गणेश आचवल, प्राजक्ता दातार आणि मीना नाईक




'आत्ममग्न' काव्यसंग्रहाचे प्रकाशन – डॉ. मीनल ओक, मीरा पोतदार, विनायक गोखले, अरुण जोशी, सुदेश हिंगलासपूरकर, मृणाल ओक, कवी मंदार ओक, सुमेध वडावाला, मृदुला दाढे–जोशी, प्रमोद जोशी, दिलीप आम्रे आणि धनश्री धारप

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2022-2024
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.